# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, गुरुवार १८ जून २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ ८







## लाखोंच्या दानाच्या तयार केल्या 5 रुपयांच्या खोट्या पावत्या



**अयोध्या /वृत्तसंस्था :** अयोध्येतील राम मंदिरात येणारा प्रत्येक भाविक फक्त ५ रुपयेच दान करत आहे. ही वस्तुस्थिती श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या कागदपत्रांमधून समोर आली आहे. गेल्या ११ महिन्यांत मंदिराला जेवढे दान मिळाले, त्यापेक्षा जास्त तर बँकेत जमा असलेल्या निधीवर व्याज मिळाले आहे. हे देखील समोर आले की, गडबड फक्त दानापुरती मर्यादित नाही. ती ट्रस्टच्या काही सदस्यांनी केलेल्या अमर्याद खर्चांपर्यंतही गेली आहे. परंतु, ट्रस्टच्या सर्व पदसिद्ध पदाधिका-यांना कधीही पूर्ण माहिती दिली गेली नाही. ट्रस्टकडून सर्व बैठकांची सूचना वेळेवर दिली जात नव्हती. सदस्य बैठकीत उपस्थित राहिले असले तरी, त्यांना देणग्या आणि दानाचा संपूर्ण तपशील दिला गेला नाही. कधी किती रुपये कोणत्या बाबीवर खर्च केले गेले, हे सांगितले गेले नाही. ७ महिन्यांपूर्वी राम मंदिरात धर्मध्वजारोहण कार्यक्रमाच्या वेळी ट्रस्टने १० कोटींहून अधिक खर्च केले. परंतु, हे रुपये कोणत्या-कोणत्या बाबींवर खर्च केले गेले, हे सदस्यांना कधीही सांगितले नाही. राम मंदिरावर फडकणारा ध्वज अनेक किलोमीटर दूरून दिसतो. या आयोजनाच्या खर्चाबाबतही शंका व्यक्त केली जात आहे. श्रीराम मंदिर परिसरातील दानपेट्यांमधील देणग्यांच्या चोरी प्रकरणाच्या चौकशीदरम्यान ट्रस्टच्या मागील बैठकीशी संबंधित निधी आणि खर्चाची कागदपत्रे मिळाली. बैठक २१ मार्च २०२६ रोजी झाली होती. यात १ एप्रिल २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंतचा संपूर्ण हिशेब दिला आहे. तीर्थयात्री सुविधा केंद्राशी संबंधित सूत्रांनी सांगितले की, ट्रस्टने हीच कागदपत्रे बैठकीत सदस्यांसोबत शेअर केली होती.

**धर्मध्वज कार्यक्रमात ६ हजार पाहुणे सहभागी-** २२ जानेवारी २०२४ रोजी श्रीराम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळा हा सर्वात मोठा कार्यक्रम होता. या तुलनेत २५ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित धर्मध्वजा कार्यक्रम मर्यादित ठेवण्यात आला होता. या धर्मध्वजा कार्यक्रमात केवळ उत्तर प्रदेशातील विविध समाजातून आलेल्या साधू-संतांना आमंत्रित करण्यात आले होते. बाहेरून येणा-या पाहुण्यांसाठी ट्रस्टतर्फे राहण्याची व्यवस्थाही करण्यात आली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संघप्रमुख मोहन भागवत यांनी शिखरावर धर्मध्वजा फडकवली होती. या कार्यक्रमात सुमारे ६ हजार पाहुणे सहभागी झाले होते. कार्यक्रमात श्रीराम जन्मभूमी ट्रस्टने १०.१२ कोटी रुपये खर्च केले होते. म्हणजे, एका व्यक्तीवर सरासरी १६ हजार रुपये खर्च करण्यात आले. या पाहुण्यांपैकी सुमारे १५०० लोक बाहेरून आले होते. इतर पाहुण्यांमध्ये अयोध्या आणि आसपासचे लोक होते. ट्रस्टने हे १०.१२ कोटी रुपये वेगवेगळ्या प्रकारे कसे खर्च केले, याचा संपूर्ण तपशील ट्रस्टच्या सदस्यांनाही देण्यात आला नाही.

## महाराष्ट्रात 'ऑपरेशन टायगर'

# उद्धव ठाकरेंच्या ६ खासदारांचा स्वतंत्र गट

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठी उलथापालथ झाली असून, उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला (UBT) मोठा धक्का बसला आहे. शिवसेनेच्या (UBT) नउपैकी सहा खासदारांनी बंड पुकारत आपला स्वतंत्र गट स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या बंडखोर खासदारांनी दिल्लीत लोकसभा अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांची भेट घेउन आपण स्वतंत्र गट स्थापन करत असल्याचे पत्र सादर केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा सुरू होती. ही चर्चा अखेर सत्यात उतरताना दिसत असून, ठाकरे गटाचे सहा खासदार बंडखोरी करत दिल्लीत दाखल झाले. उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत या खासदारांनी लोकसभा अध्यक्षांकडे पत्र सोपवले. या पत्रावर सर्व बंडखोर खासदारांच्या सह्या घेण्यात आल्या असून, लोकसभा अध्यक्षांनी या स्वतंत्र गटाच्या स्थापनेला तत्त्वतः मंजुरी दिल्याचे समजते. सूत्रांच्या माहितीनुसार, हा स्वतंत्र गट लवकरच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत विलीन होण्याची शक्यता आहे.

**पक्षांतरबंदी कायदा आणि गणिते-** पक्षांतरबंदी कायद्यानुसार, कोणत्याही पक्षात फूट पाडून वेगळा गट स्थापन करण्यासाठी एकूण संख्याबळाच्या दोन तृतीयांश (२/३) खासदारांची गरज असते. ठाकरे गटाचे लोकसभेत एकूण नउ खासदार आहेत. यातील सहा खासदारांनी बंड केल्यामुळे हे आवश्यक संख्याबळ पूर्ण झाले आहे, ज्यामुळे या गटाचे विलीनीकरण कायदेशीर प्रक्रियेत सहज होउ शकते.



### यांचा बंडात सहभाग

1. खा.संजय जाधव- परभणी,लोकसभा
2. खा.संजय देशमुख यवतमाळ-वाशिम लोकसभा
3. खा. नागेश आष्टीकर हिंगोली, लोकसभा
4. खा. ओमराजे निंबाळकर धाराशिव,लोकसभा
5. खा. भाउसाहेब वाकचौरे शिर्डी, लोकसभा
6. खा. संजय दिना पाटील ईशान्य मुंबई,लोकसभा

### लोकसभा अध्यक्षांची मान्यता



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेले ऑपरेशन टायगर अखेर यशस्वी झाले असून, उद्धवसेनेतून फुटून बाहेर पडलेल्या सहा खासदारांनी आज आपला वेगळा गट स्थापन केला आहे. मंगळवारी रात्री घडलेल्या नाट्यमय घडामोडींदरम्यान, या सहा खासदारांनी दिल्ली गाठली. तसेच तिथे लोकसभा अध्यक्षांची भेट घेउन वेगळा गट स्थापन करण्यासंदर्भातील प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर लोकसभा अध्यक्षांनीही उद्धवसेनेतून फुटून बाहेर पडलेल्या उद्धवसेनेच्या सहा खासदारांच्या गटाला वेगळा गट म्हणून मान्यता दिली आहे.

### फुटीर खासदारांच्या गटाला मान्यता देउ नका : उद्धवसेनेची मागणी

उद्धवसेनेत पडलेल्या फुटीच्या पार्श्वभूमीवर उद्धवसेनेसोबत राहिलेले खासदार अरविंद सावंत, अनिल देसाई आणि राजाभाउ वाझे यांनी संजय राउत यांच्यासोबत मिळून लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतली. यावेळी उद्धवसेनेतून फुटून बाहेर पडलेल्या खासदारांच्या गटाला वेगळा गट म्हणून मान्यता देउ नका, अशी विनंती त्यांनी लोकसभा अध्यक्षांना केली.

## मध्यरात्रीची गुप्त खेळी आणि दोन खाजगी विमाने



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या राजकारणात 'ऑपरेशन टायगर'ने एक मोठा राजकीय भूकंप घडवून आणला आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या खासदारांच्या बंडखोरीचा हा प्रवास अत्यंत थरारक आणि नियोजनबद्ध ठरला आहे. या मोहिमेत एकनाथ शिंदे यांनी अत्यंत गोपनीय पद्धतीने हालचाली करत ठाकरे गटाला पूर्णपणे अंधारात ठेवले.

**मध्यरात्रीची गुप्त खेळी-** मंगळवारी रात्री एकनाथ शिंदे दिल्लीला जाणार असल्याची माहिती सर्वत्र पसरली होती, मात्र ही एक मोठी रणनीती होती. प्रत्यक्षात, त्यांनी अतिशय सावधगिरीने आपला मार्ग बदलला. दिल्लीला थेट जाण्याऐवजी, ते राजस्थानला पोहोचले आणि तिथे त्यांनी लोकसभा अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांची भेट घेतली. या भेटीत बंडखोर खासदारांच्या स्वतंत्र गटाच्या स्थापनेची कायदेशीर प्रक्रिया अंतिम करण्यात आली. त्यानंतर, शिंदे विमानाने दिल्लीत दाखल झाले आणि त्यांनी या मोहिमेची सूत्रे स्वतःच्या हातात घेतली.

**खाजगी विमानांची विशेष व्यवस्था-** ठाकरे गटाचे फुटीर खासदार ओमरजे निंबाळकर आणि त्यांच्या सोबतीला असलेल्या इतर खासदारांना दिल्लीत सुरक्षितपणे पोहोचवण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी विशेष खबरदारी घेतली होती. यासाठी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे सुपुत्र आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नावावर दोन खाजगी विमाने (Private Jets) सज्ज ठेवण्यात आली होती. पुणे विमानतळावरून पहाटे १ वाजण्याच्या सुमारास ही विमाने दिल्लीच्या दिशेने झेपावली, ज्यामुळे ठाकरे गटाला या हालचालींची कुणकुण लागण्याआधीच बंडखोर खासदारांना दिल्लीत पोहोचवणे शक्य झाले.

**दिल्लीतील निवासस्थान ठरले केंद्रबिंदू-** ऑपरेशन टायगरची संपूर्ण अंमलबजावणी ही श्रीकांत शिंदे यांच्या दिल्लीतील निवासस्थानावरून करण्यात आली. या मोहिमेत सक्रिय असलेल्या खासदारांना तिथेच सुरक्षितपणे ठेवण्यात आले होते. या खासदारांना स्वतंत्र गट स्थापन करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले आणि लोकसभा अध्यक्षांकडे सादर करावयाच्या पत्रावर सह्या पूर्ण करून घेण्यात आल्या.

**कायदेशीर प्रक्रियेला गती-** पक्षांतरबंदी कायद्याच्या तांत्रिक बाबींचा विचार करता, बंडखोर खासदारांच्या स्वतंत्र गटाला मान्यता मिळवण्यासाठी एकूण संख्याबळाच्या दोन तृतीयांश खासदारांची गरज होती. एकनाथ शिंदे यांनी हे संख्याबळ पूर्ण करण्यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून या खासदारांशी गुप्तपणे संवाद साधला होता. ठाकरे गटाने आपल्या खासदारांना रोखण्यासाठी मातोश्रीवर बैठका घेतल्या आणि दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला, मात्र शिंदेंच्या या चपळ आणि गुप्त खेळीपुढे ठाकरे गटाचे हे सर्व प्रयत्न फोल ठरले.

### आता राडा होणारच खा.संजय राउत

मुंबई : खासदारांनी आमच्या समोर शपथ घेतल्या, कोणी आई, कोणी मुलीची तर कोणी साईबाबांची शपथ घेतली. पण अर्ध्या रात्री गायब झाले. आता गद्दार खासदारांना सोडणार नाही, राज्य आता गप्प बसणार नाही. जे खासदार उद्धव ठाकरेंच्या चेह-यावर आणि मशाल चिन्ह्यावर निवडणून आले त्यांना अशा बेईमानी करण्याचा अधिकार नाही. त्यांना असं सोडून जाणं ते सोपं नाही. उद्धव ठकारेंना सोडून जाणा-यांच्या रक्तात बेईनामी असल्याचं राउत म्हणाले.

## नागपूरच्या रस्त्यावर उतरला विद्यार्थ्यांचा महासागर!

**नागपूर/प्रतिनिधी :** हजारो विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, हातात संविधानाच्या प्रती, शिक्षण वाचविण्याचे फलक, घोषणांचा प्रचंड गजर आणि चलो दिल्लीच्या गर्जनांनी मंगळवारी संविधान चौक अक्षरशः दणाणून गेला. शिक्षणव्यवस्थेतील कथित गैरव्यवहार, नीट आणि सीबीएसई परीक्षांतील गोंधळ, विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या आणि शिक्षणक्षेत्रातील धोरणांविरोधात विद्यार्थ्यांसह तरुणांनी तीव्र आक्रोश व्यक्त केला. या आंदोलनाचे नेतृत्व काक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी केले. देशातील विद्यार्थ्यांमध्ये व्यवस्था बदलण्याची ताकद आहे. ही चळवळ कोणत्याही एका व्यक्तीची नसून संपूर्ण देशातील विद्यार्थ्यांची आहे. आम्हाला शिक्षणव्यवस्थेसह देश बदलायचा आहे, असे प्रतिपादन करत दीपके यांनी केंद्र व राज्य सरकारवर निशाणा साधला.




आंदोलनात सत्यपाल महाराज, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) नितेश कराळे, विविध विद्यार्थी संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि हजारो युवक-युवती सहभागी झाले होते. अभिजित दीपके म्हणाले, मी मुख्यमंत्र्यांच्या स्वगृही येउन त्यांच्याविरोधात बोलत आहे. माझ्यावर कितीही केसेस टाकल्या, दबाव आणला, तरी मी मागे हटणार नाही. विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी ही लढाई अखेरपर्यंत सुरू राहील.

जयपूर येथे विद्यार्थ्यांचे प्रश्न, 'नीट' आणि सीबीएसई परीक्षांतील कथित गैरव्यवहाराचा मुद्दा उपस्थित केल्यामुळे आपल्यावर हल्ला झाल्याचा आरोप करत त्यांनी गेल्या १० ते १२ वर्षांपासून देशात हिंदू-मुस्लिमांच्या नावावर राजकारण सुरू असल्याची टीका केली. विद्यार्थ्यांनी धर्माच्या राजकारणात अडकण्याऐवजी शिक्षण आणि भविष्याच्या प्रश्नांसाठी (पान २ वर)

## मुंबई ते अमरावती विशेष गाडी धावणार

**अकोला :** प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वेद्वारे छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस ते अमरावती दरम्यान विशेष एकेरी गाडी चालविण्याचा निर्णय घेतला आहे. या विशेष रेल्वे गाडीमुळे सुट्टीच्या काळात प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. गाडी क्रमांक ०११५५ एकेरी विशेष १८ आणि १९ जून रोजी छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस येथून ००.२० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी अमरावती येथे १२.३० वाजता पोहोचेल. या विशेष गाडीच्या दोन सेवा होतील. या विशेष गाडीला दादर, ठाणे, कल्याण, नाशिक रोड, मनमाड, जळगांव, भुसावळ, मलकापूर, शेगांव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा येथे थांबा देण्यात आला आहे. दोन वातानुकूलित तृतीय, आठ शयनयान, सहा सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन अशी गाडीची संरचना राहील.

## मी मोदींसारखा नाही-ट्रम्प



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान मोदी पदावर असताना भारतावर जर हल्ला झाला, तर आम्ही भारताच्या मदतीसाठी धावून येउ, असे विधान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केले आहे. फ्रान्समधील जी-७ शिखर परिषदेत पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष ट्रम्प जवळपास १६ महिन्यानंतर पहिल्यांदाच समोरासमोर आले. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये द्वीपक्षीय बैठक पार पडली. या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत ट्रम्प यांना भारताशी असलेल्या सामरिक संबंधांबाबत प्रश्न विचारला गेला. त्यावर ट्रम्प यांनी भारताला पाठिंबा दर्शवला.होर्मुझच्या सामुद्रधुनीबद्दल बोलताना पंतप्रधान मोदी यांनी या जलमार्गाचे खुले राहणे जागतिक अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक असल्याचे म्हटले. तसेच या मार्गात शांतता कायम राहिल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ट्रम्प यांच्याकडून पंतप्रधान मोदींची प्रशंसा-या बैठकीत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदी यांचे कौतुक केले. पंतप्रधान मोदी यांचे वाटाघाटी करण्याचे कौशल्य उत्तम असल्याचे त्यांनी म्हटले. तुम्ही या व्यक्तीकडे बघा. तो एका देवदुतासमान दिसतो. (पान २ वर)

## 'नीट' प्रश्नपत्रिकांची वायूदलाच्या हेलिकॉप्टरने वाहतूक

### अकोल्यात कडेकोट सुरक्षेत प्रश्नपत्रिका दाखल

**अकोला/प्रतिनिधी :** राष्ट्रीय परीक्षा एजन्सीद्वारे (NTA) वैद्यकीय शिक्षणाची राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा २१ जून रोजी होणार आहे. या परीक्षेसाठी लागणा-या प्रश्नपत्रिकांचे संच विशेष सुरक्षा व्यवस्थेत अकोल्यातील शिवणी विमानतळावर दाखल झाले. भारतीय वायुदलाच्या विशेष हेलिकॉप्टरने या प्रश्नपत्रिका अकोल्यात आणण्यात आल्या आहेत. पोलीस, महसूल व शिक्षण विभागाच्या अधिका-यांच्या पाहणीत अत्यंत चोख बंदोबस्तात प्रश्नपत्रिका सुरक्षितस्थळी हलविण्यात आल्या आहेत.



**देशभरात २१ जूनला नीटची परीक्षा-** देशभरात 'नीट' परीक्षा पेपरफुटी प्रकरणाने मोठी खळबळ उडाली होती. ३ मे रोजी झालेल्या नीट परीक्षेचा पेपर फुटल्याने ती परीक्षा रद्द करण्यात आली होती. या प्रकरणाचे धागेदोरे महाराष्ट्रात देखील पोहचले आहेत. या प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाकडून तपास केला जात आहे. देशातील नीट परीक्षा आता पुन्हा घेतली जाणार असून, यासाठी २१ जून २०२६ ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार होउ नये आणि प्रश्नपत्रिका पुन्हा फुटण्याचे प्रकार होउ नये, यासाठी यंत्रणा अधिक सतर्क झाली आहे. परीक्षेची गोपनीयता राखण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी सरकारने अनेक कठोर निर्णय देखील घेतले आहेत. सुरक्षा व्यवस्था (पान २ वर)

## राज्यात उकाड्याने नागरिक त्रस्त

**मुंबई :** पश्चिम भारतात मान्सूनची वाटचाल संथ गतीने होत असल्याने, मुंबईत नैऋत्य मोसमी पावसाच्या आगमनासाठीची प्रतीक्षा आणखी लांबणार आहे. हवामान तज्ज्ञांनी पावसाच्या अपेक्षित आगमनाची तारीख पुन्हा एकदा पुढे ढकलली आहे.भारतीय हवामान विभागाने आता मुंबईत मान्सूनच्या आगमनासाठीची तारीख सुधारित केली असून, ती शहरात मान्सूनच्या सामान्य आगमनाच्या तारखेपेक्षा जवळपास दोन आठवडे उशिराची आहे. खासगी हवामान संस्था स्कायमेटने असे संकेत दिले आहेत की, जर सध्याची वातावरणीय स्थिती कायम राहिली, तर हा विलंब आणखी वाढू शकतो. आता २० जूननंतर पावसाच्या सरी बरसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.दक्षिण आणि पूर्व भारतातील काही भागांत मान्सूनने सुरु वातीला वेगाने प्रगती केल्यानंतर आता त्याचा वेग मंदावला आहे. ज्यामुळे त्याच्या पुढील वाटचालीस विलंब होत आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, या मंदावलेल्या गतीचे मुख्य कारण म्हणजे अरबी समुद्राकडून येणा-या आर्द्रतायुक्त वा-यांचा अभाव, हे वारे मान्सूनला कोकण किनारपट्टीवरून उत्तरेकडे नेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असतात.

## चिमुरडीच्या मृत्यूनंतरही तिच्या शवावर अत्याचार

**पुणे/प्रतिनिधी-** नसरापूर येथे आरोपी भीमराव कांबळे याने चिमुरडीचे अपहरण करून, तिचा विनयभंग केला आणि तिच्यावर अनैसर्गिक अत्याचार करून तिची हत्या केली. आरोपी इतके करूनच थांबला नाही, तर त्याने चिमुरडीच्या मृत्यूनंतरही तिच्या शवावर अत्याचार केले, असा दावा विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी मंगळवारी खटल्याच्या सुनावणीदरम्यान केला. यासाठी ॲड. मिसर यांनी चिमुरडीच्या शवविच्छेदनानंतर ससून रुग्णालयाने दिलेला अहवाल न्यायालयात वाचून दाखवला व वैद्यकीय पुरावा न्यायालयासमोर सिद्ध केला. ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास आल्यानंतर न्यायालयाने देखील याची अत्यंत गंभीर दखल घेतली. भोर तालुक्यातील नसरापूर येथे तीन वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिचा खून केल्याची धक्कादायक घटना १ मे रोजी घडली होती.









# रुरल इन्स्टिट्यूट येथील पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका अभ्यासक्रमाला 'अ' दर्जा प्राप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-**

श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित रुरल इन्स्टिट्यूट, अमरावती (ग्रामीण शिक्षण संस्था) येथील पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका अभ्यासक्रमाला महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, (MAFSU) अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये निम्न शिक्षण विभागाअंतर्गत अमरावती विभागातील १४ घटक महाविद्यालयामधून या एकमेव महाविद्यालयाला 'अ' दर्जा (Grade A) बहाल करण्यात आला आहे. या बहुमानामुळे संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये पुन्हा एकदा मानाचा तुरा रोवला गेला आहे.

अकोला येथील महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत पशुवैद्यकीय व पशु विज्ञान महाविद्यालय, तज्ञ निरीक्षण समितीने महाविद्यालयाची तपासणी केली होती. यामध्ये महाविद्यालयातील आधुनिक प्रयोगशाळा, समृद्ध ग्रंथालय, अनुभवी प्राध्यापक वृंद तसेच विविध प्रकल्प जसे दूध उत्पादन, दुग्धजन्य पदार्थ निर्मिती, (पनीर, खवा इ.), शेळी पालन, कुक्कुट पालन (मांसल पक्षी प्रकल्प), अंडी उत्पादन



प्रकल्प, गावरान कुकुट प्रकल्प, अंडी उबवणी प्रकल्प, गांडूळ खत प्रकल्प तसेच विविध चारा पिके या सर्व बाबींची पूर्तता झाली असल्यामुळे विद्यापीठाने या महाविद्यालयाला 'अ' दर्जा प्रदान केला.

अभ्यासक्रमाला 'अ' दर्जा मिळाल्यामुळे चालू शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील विद्यार्थ्यांना शासकीय व खाजगी सुरू करण्यासाठी दुग्ध व्यवसाय क्षेत्रात नोकरीच्या उत्तम संधी मिळतील तसेच पशुधन व्यवस्थापन क्षेत्रात स्वतःचा उद्योग उभारण्यास विद्यार्थ्यांना मोठी मदत होणार आहे. याद्वारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख आणि दर्जेदार शिक्षण देणे हेच संस्थेचे ध्येय आहे हे अधोरेखित झाले आहे. या दैदिप्यमान यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा संपूर्ण कार्यकारणी द्वारे महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# अजय देशमुख : कर्तृत्व, नेतृत्व आणि समाजभान यांचा प्रेरणादायी प्रवास

'ज्यांच्या विचारात समाजहित, कृतीत प्रामाणिकपणा आणि नेतृत्वात सर्वसमावेशकता असते, त्यांचे कार्य काळाच्या पलीकडे जाऊन प्रेरणेचा दीपस्तंभ बनते.'

१८ जून हा दिवस महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाचे सन्माननीय अध्यक्ष अजय बळवंत देशमुख अर्थात सर्वांच्या लाडक्या अजय भाऊंचा वाढदिवस. हा दिवस केवळ एका व्यक्तीचा जन्मदिन नसून संघर्ष, नेतृत्व, कर्तृत्व, समाजभान आणि संघटनशक्ती यांच्या अद्वितीय संगमाचा गौरव करण्याचा दिवस आहे.



काही व्यक्ती पदामुळे मोठ्या होत नाहीत; त्यांच्या कार्यामुळे पदालाच प्रतिष्ठा प्राप्त होते. अजय भाऊ हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. मित्रप्रेमी स्वभाव, सहकाऱ्यांप्रती जिव्हाळा, अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द, असामान्य संघटन कौशल्य, प्रभावी वक्तृत्वशैली आणि सर्वांना आपलेसे करणारे व्यक्तिमत्त्व यामुळे त्यांनी महाराष्ट्रातील विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मनात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे.

अजय भाऊंचा जीवनप्रवास हा सहजसोप्या यशाचा नव्हे, तर अथक परिश्रम, संघर्ष आणि चिकाटीचा इतिहास आहे. सन १९९० मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात दैनिक वेतनिक कर्मचारी म्हणून त्यांनी सेवेला सुरुवात केली. त्या काळात आर्थिक स्थैर्य नव्हते, भविष्याची शाश्वती नव्हती आणि अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र परिस्थितीपुढे हार न मानता त्यांनी प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम सुरू ठेवले.

सन १९९६ मध्ये ते विद्यापीठाच्या नियमित सेवेत रुजू झाले. कामावरील निष्ठा, सहकाऱ्यांशी सुसंवाद आणि संघटनात्मक जाण यामुळे ते अल्पावधीतच कर्मचाऱ्यांच्या विश्वासास पात्र ठरले. त्यांनी स्वतःच्या संघर्षातून मिळवलेले अनुभव कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांच्या समाधानासाठी वापरले आणि हळूहळू नेतृत्वाच्या केंद्रस्थानी पोहोचले.

सन २०११ मध्ये अमरावती विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. ही निवड केवळ एका पदाची नव्हती; ती कर्मचाऱ्यांनी त्यांच्या नेतृत्वावर व्यक्त केलेल्या विश्वासाची पावती होती.

अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर त्यांनी संघटनेला नवी दिशा दिली. संघर्ष आणि संवाद यांचा योग्य समन्वय साधत त्यांनी कर्मचारी प्रश्न सोडविण्याचा आदर्श निर्माण केला.

कर्मचाऱ्यांच्या वेतन, पदोन्नती, सेवा अटी, निवृत्तीविषयक प्रश्न आणि विविध प्रशासकीय अडचणी सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

सलग पाच वेळा अध्यक्ष म्हणून निवडून येणे हे त्यांच्या लोकप्रियतेचे नव्हे तर त्यांच्या कार्यक्षमतेचे प्रमाण आहे. कर्मचाऱ्यांना त्यांनी कधीच मतदार म्हणून पाहिले नाही; तर कुटुंबाचा भाग मानून त्यांच्यासाठी कार्य केले.

संघटनेतील त्यांच्या कार्याची दखल घेत सन २०१३ मध्ये महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाच्या कार्याध्यक्षपदी त्यांची एकमताने निवड करण्यात आली. राज्यभरातील विद्यापीठ कर्मचाऱ्यांचा विश्वास संपादन करणे हे सहज शक्य नसते; मात्र आपल्या समन्वयक वृत्तीने आणि प्रभावी नेतृत्वाने त्यांनी हे यश संपादन केले.

आज ते महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली महासंघाने राज्यातील विविध विद्यापीठांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न शासन दरबारी प्रभावीपणे मांडले आहेत. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला आहे.

अजय भाऊंच्या कार्याचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांचे समाजभान. त्यांनी संघटनात्मक नेतृत्वाला समाजसेवेची जोड दिली.

कोरोना महामारीच्या अभूतपूर्व संकटात अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असताना त्यांनी पुढाकार घेत सुमारे ८०० गरजू कुटुंबांना अन्नधान्याचे वाटप केले. वृत्तपत्र विक्रेत्यांना मास्क उपलब्ध करून दिले. संकटसमयी मदतीचा हात देणे हीच खरी समाजसेवा असल्याचे त्यांनी कृतीतून दाखवून दिले.

त्यांच्या या कार्याची दखल घेत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघाला शासनाकडून 'कोरोना योद्धा' हा सन्मान प्राप्त झाला.

अजय भाऊंच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात मोठा गुण म्हणजे माणसांबद्दलची संवेदनशीलता.

संघटनेच्या माध्यमातून त्यांनी मतीन भोसले यांच्या 'प्रश्नचिन्ह' संस्थेला आर्थिक व तांत्रिक मदत केली. पद्मभूषण शंकरबाबा पापळकर यांचा विद्यापीठात गौरव करून त्यांच्या अनाथ आश्रमासाठी मदत उभी केली.

संत गाडगेबाबांच्या दशसूत्रीचा प्रभाव अजय भाऊंच्या कार्यात स्पष्टपणे दिसून येतो. स्वच्छता, सेवा, शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि मानवतेची मूल्ये त्यांनी आपल्या कार्यपद्धतीत रुजवली आहेत.

आज अजय भाऊंचे नेतृत्व केवळ अमरावती विद्यापीठापुरते मर्यादित नाही. महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी ते सातत्याने कार्यरत आहेत.

सध्या ते महाराष्ट्र विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर सेवक संयुक्त कृती समितीचे अध्यक्ष म्हणून सुमारे ३० हजार कर्मचाऱ्यांचे नेतृत्व करत आहेत. शासन, विद्यापीठ प्रशासन, शिक्षक संघटना, विद्यार्थी संघटना, सामाजिक संघटना आणि पत्रकार यांच्याशी त्यांनी जपलेले स्नेहपूर्ण संबंध त्यांच्या व्यापक स्वीकारार्हतेची साक्ष देतात.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करताना अभिमान वाटतो. संघर्षातून उभा राहिलेला हा प्रवास असंख्य कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणेचा स्रोत आहे.

ईश्वर त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, अखंड ऊर्जा आणि समाजहितासाठी कार्य करण्याची अधिक शक्ती देवो, हीच प्रार्थना. अजय भाऊ यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा..

**-नितीन तसरे** (गो. सी. टोम्पे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूर बाजार)

## १ व १० वरिल उर्वरित

### मी मोदींसारखा नाही

यांच्यासारखे खूप कमी लोक असतात. लोक म्हणतात की, ते (मोदी) चांगले व्यक्ती आहेत. पण मी म्हणेण की, ते तेवढेच कणखर व्यक्ती आहेत. ते एक उत्तम वाटाघाटी करणारे व्यक्ती आहेत. त्यांच्या मनात भारतीयांबद्दल खूप प्रेम आहे. तेवढेच प्रेम अमेरिकेबद्दलही त्यांना वाटते, असेही ट्रम्प म्हणाले. मोदी शांत, संयमी आणि जबरदस्त कामगिरी करणारे किलर व्यक्ती आहेत. मी मोदींसारखा नाही, असेही ट्रम्प यावेळी म्हणाले.

### नागपूरच्या रस्त्यावर उतरला

एकत्र यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

**शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा घ्या-** 'नीट' परीक्षेतील कथित घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर देशभरात आंदोलने झाली, मात्र केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी अद्याप राजीनामा दिलेला नसल्याचा आरोप करत दीपके यांनी २० जूनपासून नवी दिल्लीतील जंतर-मंतरवर देशव्यापी बेमुदत आंदोलनाची घोषणा केली. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणा-यांना आता उत्तर द्यावेच लागेल. २० जूनपासून जंतर-मंतरवर निर्णायक लढाई छेडली जाईल. नागपूरसह देशभरातील विद्यार्थ्यांनी दिल्लीत पोहोचावे, असे आवाहन दीपके यांनी यावेळी केले.

### 'नीट' प्रश्नपत्रिकांची वायूदलाच्या

अधिक वाढविण्यात आली. त्यासाठी सैन्य दलाची मदत घेतली जात आहे.

वाहतुकीदरम्यान विशेष खबरदारी-नीट प्रश्नपत्रिका फुटीनंतर आता २१ जूनला परीक्षा होत आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीदरम्यान कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये, यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली आहे.

### अमरावती स्थानिक प्राधिकारी

केंद्रावर ६९ मतदार (३३ पुरुष, ३६ स्त्री), मोर्शी केंद्रावर ८१ मतदार (४३ पुरुष, ३८ स्त्री), दर्यापूर केंद्रावर ६० मतदार (३० पुरुष, ३० स्त्री), तिवसा-भातकुली केंद्रावर ३८ मतदार (१८ पुरुष, २० स्त्री), अमरावती केंद्रावर ९५ मतदार (४८ पुरुष, ४७ स्त्री) आणि चांदूर रेल्वे मतदान केंद्रावर ६६ मतदार (३३ पुरुष, ३३ स्त्री) आपले मत नोंदवतील. ही केंद्रे अनुक्रमे तहसील कार्यालय धारणी, उपविभागीय अधिकारी कार्यालय अचलपूर, तहसील कार्यालय मोर्शी, तहसील कार्यालय दर्यापूर, उपविभागीय अधिकारी तिवसा-भातकुली कार्यालय कॅम्प रोड अमरावती, ७/१२ संगणकीकरण कक्ष, अमरावती तहसील कार्यालय आणि तहसील कार्यालय, चांदूर रेल्वे येथे स्थापन करण्यात आली आहेत.सातही मतदान केंद्रांवर प्रक्रिया पार पाडण्यासाठी केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, सूक्ष्म निरीक्षक व शिपाई असे एकूण ४२ अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच पोलीस अधीक्षक व पोलीस आयुक्त यांच्या स्तरावरून चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. १८ जून रोजी मतदान प्रक्रिया आटोपल्यानंतर सर्व मतपेट्या चोख सुरक्षेत नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथील सुरक्षा कक्षामध्ये ठेवल्या जातील. त्यानंतर सोमवार, दिनांक २२ जून २०२६ रोजी नियोजन भवन येथेच मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे.

### आज 'ड्राय डे'

आहे. या शासकीय आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या किंवा अंमलबजावणीत कुचराई करणाऱ्या मद्यविक्रेत्यांवर कडक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. नियम मोडणाऱ्यांवर 'महाराष्ट्र दारूबंदी कायद्या'न्वये कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे आवाहन जिल्हाधिकारी येरेकर यांनी केले आहे.

### सरपंच अपात्रतेच्या आदेशावर उच्च

तत्त्वांचे उल्लंघन झाल्याचा दावा करण्यात आला. तसेच, लोकनियुक्त सरपंचाला योग्य सुनावणीची संधी न देता पदावरून दूर करणे अन्यायकारक असल्याचा मुद्दाही न्यायालयासमोर मांडण्यात आला. दोन्ही बाजूंचा प्राथमिक युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने संबंधित प्रतिवादींना नोटीस बजावण्याचे आदेश दिले.महत्त्वाचे म्हणजे, पुढील सुनावणी होईपर्यंत अतिरिक्त आयुक्तांनी दिलेल्या अपात्रतेच्या आदेशाला स्थगिती देण्यात आली आहे. तसेच उर्वरित प्रतिवादींना नियमित व खासगी पद्धतीने नोटीस बजावण्याची परवानगीही न्यायालयाने दिली आहे. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे तुळजापूर जहागीर ग्रामपंचायतीच्या राजकारणात नव्या घडामोडींना वेग आला असून, समर्थक आणि विरोधक या दोन्ही गटांचे लक्ष आता २५ जून रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीकडे लागले आहे. या सुनावणीत न्यायालय कोणती भूमिका घेते, यावर पुढील राजकीय समीकरणे अवलंबून राहणार असल्याची चर्चा परिसरात रंगू लागली आहे.

### शेतकरी नेते रविकांत तुपकर

च्या लाभार्थ्यांना उचित लाभ नाही. आयकर भरणाऱ्यांचे विनाकारण प्रश्न उभे केले आहेत. अटी व शर्तींचा डोंगर उभा केला आहे. शेतकऱ्याला मारायच्या प्रत्येक वळणावर प्रयत्न चालला असल्याचे स्पष्ट झाले आहे. या सर्व त्रुटीवर मात करून कर्जमाफी योजना २०२६ पुढे यावी. अर्थात कर्जमाफी विनाअट असावी . सदर आंदोलनामध्ये महाराष्ट्र राज्य किसान सभा ,भारतीय खेत मजदूर युनियन, मराठा सेवा संघ, अखिल भारतीय नवजवान सभा, आम आदमी पार्टी, किसान पुत्र आंदोलन या संघटनांचे प्रतिनिधींचा समावेश होता.

आंदोलनात कॉ.अशोक सोनारकर (निमंत्रक) डॉ. ओमप्रकाश कुटेमाटे ,प्रकाश साबळे, महेश देशमुख सुनील घटाळे जयेंद्र भोगे ,अश्विनजी चौधरी, डॉ प्रफुल्ल गुडदे ,प्रा.साहेबराव विधळे, लता सोनारकर, सागर दुर्योधन, लक्ष्मणराव धाकडे ,अशोकराव राऊत, प्रा. विजय रोडगे ,चंद्रकांत मोहिते ,संतोष राऊत ,अरविंद गावंडे जीवन दुर्योधन, प्रकाशराव राऊत, लक्ष्मण गौर, दिगंबर नगेकर ,श्रीकांत तसरे , विठ्ठल तसरे, प्रफुल्ल तसरे आदींचा सहभाग होता.

वृत्त संकलन: अशोक सोनारकर निमंत्रक ९४२२८४०५५६

### शाळा सुरू होण्यापूर्वीच पाठ्यपुस्तके

इयत्ता तिसरी, चौथी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांमध्ये पुस्तकांचा अभाव अधिक जाणवत आहे.या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत शिंदी बु.च्या माजी सदस्या भारती गाठे यांनी प्रशासनाकडे ठोस मागणी केली आहे.

'शासनाने शाळा सुरू होण्याची तारीख पुढे ढकलून ३० जून केली आहे, ही विद्यार्थ्यांसाठी दिलासा देणारी बाब आहे. मात्र या कालावधीत सर्व पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली पाहिजेत. अन्यथा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) कडून पाठ्यपुस्तकांचे वितरण सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच शाळांना तात्पुरत्या स्वरूपात राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्या 'सेतू पुस्तिका'चा वापर करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.मात्र या पुस्तिका ऑनलाइन स्वरूपातच उपलब्ध असल्याने ग्रामीण भागातील शाळांना त्याची छपाई करावी लागत आहे. तसेच इतर माध्यमांच्या विद्यार्थ्यांसाठी योग्य साहित्याचा अभावही जाणवत आहे.

एकूणच, शासनाने दिलेल्या वाढीव कालावधीचा योग्य उपयोग करून ३० जूनपूर्वी सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके उपलब्ध करून द्यावीत, जेणेकरून नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात सुरळीत होईल आणि विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### शिवसेनेच्या कार्यकर्त्यावर लोखंडी

लोखंडी रॉडने त्यांच्यावर हल्ला चढविला .

हल्लेखोरांनी 'आज तुला जिवंत सोडणार नाही' अशी धमकी देत त्यांचा पाठलाग करुन मारहाण केली. हल्लेखोर तोंडावर कपडा बांधून होते मात्र चव्हाण यांनी आरडा ओरडा केल्याने आरोपी घटनास्थळावरुन पसार झाले. या हल्ल्यात त्यांच्या दोन्ही पायांना जबर दुखापत झाली असून त्यांच्यावर उमरखेड येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत . रमेश चव्हाण यांच्या तक्रारी वरुन या प्रकरणी उमरखेड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५३७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता ( बी एन एस ) कलम १०९(१), २९६, १२६(२) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हल्लेखोर आरोपींचा शोध सुरु असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक व्यंकट गंगलवाड करीत आहेत .

### चांदूर बाजारात वादळी पावसाचा

येथील प्रतिष्ठित शेतकरी भैयासाहेब चुनडे यांच्या गावालगतच्या शेतामधील दोन गाई मृत्युमुखी पडल्या आहेत.

मोजा इमामपूर येथे शेत सर्वे नंबर१०/२ संजय उत्तमराव चुनडे यांच्या शेतात दुपारी ६ वाजता गाय व वासरू यांचा अंगावर वीज पडल्यामुळे मृत्यू झालेल्या आहे.

मौजा शिरजगाव कसबा भाग २ येथिल मांगीया गावात झालेल्या वादळ वारा व पावसामध्ये नामदेव झगुजी निखाडे रा.मागिया यांच्या घरासमोरील बांधलेला बैल अंदाजे ५.१५ च्या सायंकाळ चे सुमारास विज पडून मरण पावला. मौजा जालनापूर अंतर्गत येणाऱ्या इमामपूर येथील आज झालेल्या वादळामुळे दोन घरावरील टीन पत्रे उडून गेले आहे.

### शेतकरी संघटनेने केले

आहे. बुधवारी शेतकरी संघटनेने सरसकट कर्जमाफीची जोरदार मागणी करत जिल्हाधिकारी कार्यालयावर मुख्यमंत्र्यांच्या पुतळ्याचे दहन केले. संघटनेच्या वतीने राज्य सरकारच्या धोरणांविरोधात तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मुख्यमंत्री यांच्या पुतळ्याचे दहन करून सरकारचा निषेध नोंदविण्यात आला. यावेळी संघटनेने रविकांत तुपकर यांच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दर्शविला. कोणत्याही अटी-शर्तींशिवाय राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, ही संघटनेची प्रमुख मागणी आहे. सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास यापेक्षाही अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

### कोणार्क कंपनी विरोधात सफाई

प्रभागात स्वच्छता व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मनपाचा स्वच्छतेचा कंत्राट कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीकडे आहे. मात्र या कंपनीमार्फत कार्यरत असलेल्या सफाई कर्मचाऱ्यांनी वेतनासह विविध मागण्यासाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. कर्मचाऱ्यांच्या या आंदोलनाला नगरसेवक गुड्डू धर्माळे यांनी पाठिंबा दिला आहे. या संदर्भात त्यांनी मनपा आयुक्त वर्षा लढ्ढा यांच्याशी चर्चा सुद्धा केली. ४५ दिवस झाल्या नंतरही कर्मचाऱ्यांना वेतन नाही मिळाले. यामुळे कामगारांमध्ये तीव्र नाराजी आहे. कंपनी विरोधात वेगवेगळ्या प्रभागातील कामगार नाराजी व्यक्त करत आहे. यामुळे स्वच्छता व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. कंपनीकडे तक्रार करूनही ते कर्मचाऱ्यांच्या समस्येकडे लक्ष द्यायला तयार नाही. मानधन नाही मिळत आहे. यामुळे काम बंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. आंदोलनात महिला सफाई कर्मचाऱ्यांचाही सहभाग असून महिला कर्मचाऱ्यांनाही मानसिक त्रास दिला जात असल्याचा आरोप केला आहे. कामगारांना न्याय द्यावा यासह विविध मागण्या आंदोलन करणाऱ्यांनी केल्या आहे. संतप्त कर्मचाऱ्यांनी जो पर्यंत मागण्या मान्य नाही होत तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे. नगरसेवक गुड्डू धर्माळे यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन कर्मचाऱ्यांशी चर्चा केली आणि मनपा आयुक्तांना त्यांच्या अडचणी सांगितल्या. या आंदोलनाला त्यांनी आपला पाठिंबा दिला आहे. आंदोलनामुळे स्वच्छता व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

### खाजगी कोचिंग संस्थांकडून होणारी

आकाश एज्युकेशन सर्विस लिमिटेड कोचिंग संस्था कायद्याला न जुमानता विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळत आहे. संस्थेकडून अवाजवी व अपारदर्शक फी आकारणी केली जात आहे.नीट साठी दोन ते चार लाख पर्यंत फी आकारली जात आहे. यामुळे पालकांना जबरदस्तीने शिक्षण कर्ज घ्यावे लागत आहे. आर्थिक परिस्थिती कमकुवत असलेल्या पालकांना संस्थेच्या ऑफिसमध्ये बसलेल्या बँक एनबीएफसी एजंट मार्फत कर्ज घेण्यास भाग पाडले जात आहे. आधी फॉर्म भरा कर्ज आम्ही करून देतो असे म्हटले जात आहे. भ्रामक व दिशाभूल करणारी जाहिरात प्रसारित केली जात आहे. १००% सिलेक्शनची गॅरंटी, अमरावतीचा टॉप रँक आमचाच, शाळा कॉलेजला जाऊ नका, खोट्या जाहिराती, प्रत्यक्षात दरवर्षी ५०० पैकी ५-१० मुलांचे सिलेक्शन होतात. ग्राहकांची अशी फसवणूक होत आहे. शाळा कॉलेजमधील शिक्षकांना मोठे मानधन देऊन शाळेत कमी शिकवा मुलं आमच्याकडे येतील असा प्रत्यक्ष दबाव खाजगी शिकवणी वर्गामधून दिला जात आहे.फी न भरल्यास विद्यार्थ्याला वर्गातून बाहेर काढणे टेस्ट ला बसू न देणे तू फेल होशील असे म्हटले जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांना मानसिक त्रास होत आहे. आकाश संस्थेची फी रचना, जीएसटी नोंदणी तातडीने संयुक्त चौकशी करून अहवाल पंधरा दिवसाच्या आत सार्वजनिक करा. भ्रामक जाहिरातीवर त्वरित बंदी आणा व दंड आकारा, चौकशी होईपर्यंत नवे प्रवेश तात्पुरते बंद करा आदी मागण्या करण्यात आल्या आहे. यावेळी बंटी रामटेके, गणेश मारोडकर, विक्रम जाधव, शेषराव धुळे आदि उपस्थित होते.

### उपवर्गीकरणाविरोधात संयुक्त

तात्काळ रद्द करा. न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल सार्वजनिक करा.

मोर्चामध्ये खासदार बळवंत वानखडे, गुणवंत देवपारे, डॉ. देविलाल आठवले, प्रा. डॉ. प्रफुल्ल गवई, रविकांत गवई, संजय आठवले, मदन गायकवाड, नयन मोढे, प्रा. प्रकाश बोरकर, भिक्खु सुखतानंद, भंते गिरिमानंद, डॉ. कमल राउत, अशांत रंगारी, गणपतराव तिडके, पद्माकर मांडवधरे, उपस्थित होते

### चांदूर बाजारात ५.३२ लाखांचा

सौदागर, मोहम्मद हाफीज सौदागर, शेख अमीन, सय्यद जुनेद जब्बार आणि विक्रम उर्फ विकी मंगलानी यांचा सहभाग असल्याची माहिती समोर आली. या प्रकरणी ब्राह्मणवाडा थडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून संबंधिताविरुद्ध अन्नसुरक्षा आणि मानके कायदा तसेच इतर लागू कायद्या नुसार कार्यवाही करण्यात येत आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर अधीक्षक दत्ता तोटेवार, उपविभागीय अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक प्रशांत जाधव आणि पथकाने यशस्वीरित्या ही कारवाई पार पाडली.

**श्रीमती रोहिणी वि.मनोरे दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तिवसा,**
**जि.अमरावती यांचे न्यायालय**
**जाहीरनामा**

**आर.एम.जे.सी.क्र.७४/२०२६** **ने.ता.१९.०६.२०२६**

**अर्जदार -** **१.सुमन शंकर दिघडे,** वय ७८ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
**२.नितिन शंकर दिघडे,** वय ४८ वर्षे, व्यवसाय - मजूरी
**३.प्रविण शंकर दिघडे,** वय ४१ वर्षे, व्यवसाय - मजूरी
सर्व रा. वार्ड नं. १, निंभोरा (देलवाडी),ता.तिवसा,जि.अमरावती
**४.कविता कैलाशराव कोकाटे,** वय ४८ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा. ब्राम्हणवाडा गोविदपुर, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** **निरंक**

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **सुमन शंकर दिघडे व इतर** यांनी दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर), तिवसा यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता **मुंबई रेग्युलेशन अधिनियम** Viii **१८२७ चे कलम २ अन्वये** अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **शंकर बाबाराव दिघडे** यांचा मृत्यू दिनांक ३०.०७.२०१६ रोजी राहते घरी निंभोरा (देलवाडी),ता.तिवसा,जि.अमरावती येथे झालेला आहे. चंद्रभागा बाबाराव दिघडे यांचा मृत्यू ब-याच वर्षापूर्वी झालेला आहे. अर्जदार यांचेशिवाय मयतांचे ईतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.

वरीलप्रमाणे सदरहू **शंकर बाबाराव दिघडे** मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दि.०८ माहे एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, (क.स्तर), तिवसा
शिक्का

**महाराष्ट्र शासन**
**धर्मादाय सह आयुक्त कार्यालय**
**अमरावती विभाग, अमरावती**

जा.क्र./धसआ/अधि/३७६७/ २०२६ दिनांक १६/०६/२०२६

**जाहीर नोटीस**

**अर्ज क्र.०१४/कलम ४७/ २०२६**
**श्री मारोती देवस्थान (संस्थान),थिलोरी (लखापुर), ता.दर्यापूर, जि.अमरावती**
**नो.क्र.ए.-३२०/अमरावती**
**अर्जदार :-श्री प्रफुल्ल रावसाहेब धर्माळे + ६**
**विरुध्द**
**गैरअर्जदार :- निरंक**

सर्व संबंधित लोकांना कळविण्यात येते की, मा. धर्मादाय सह आयुक्त, अमरावती यांचे दिनांक ०९/०६/२०२६ रोजीचे आदेशान्वये वरील नमुद न्यासात महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४७ प्रमाणे नविन विश्वस्तांची नेमणुक करावयाची आहे. सदरच्या न्यासात विश्वस्त होण्यासाठी खालील लोकांनी मा.धर्मादाय सह आयुक्त अमरावती यांच्याकडे अर्ज केला आहे.

१. श्री प्रफुल्ल रावसाहेब धर्माळे, २. श्री शशांक शंकरराव धर्माळे, ३. श्री अविनाश माणिकराव धर्माळे, ४. श्री अमोल शालिकग्राम धर्माळे ५. श्री प्रविण जयसिंगराव धर्माळे, ६. श्री रामेश्वर किसनराव नारे, ७. श्री रंजीत अशोकराव धर्माळे रा.थिलोरी (लखापुर), ता.दर्यापूर, जि.अमरावती

सदरच्या न्यासात जर कोणालाही विश्वस्त होण्याची ईच्छा असेल तसेच वरील चौकशी प्रकरणांमध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा दयावयाचा असेल त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती या पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व चौकशी पुर्ण करुन अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.धर्मादाय सह आयुक्त, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १६.०६.२०२६ रोजी काढण्यात आली.

**सही /-**
**अधीक्षक,(न्याय)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती
शिक्का

**जाहीर नोटीस**

माझे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन तसेच पुरविलेल्या दस्तऐवजावरुन या प्रकाशनाव्दारे सर्व आम जनतेस जाहिररित्या कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांना सामुहिक **१) मौजा- सुरळी,** ता.चांदूर बाजार, जि.अमरावती हददीतील **भुमापन क्रमांक ४१८** भोगवाटदार वर्ग १ खाते क्रमांक ९७८, **मोहम्मद शोहब मोहमद इस्माईल** यांच्या मालकीचे **० हे ८२ आर व पो.ख.० हे ०७ आर असे एकुण ० हे ९३ आर,** आकार रु. ४.४३, शेत व याच ७/१२ मधील खाते क्रमांक ९७९, **मोहम्मद इदरीस मोहमद इस्माईल** यांच्या मालकीचे **० हे ८३ आर व पो.ख. ० हे ०७ आर असे एकूण ० हे ९४ आर,** याचा आकार रु. ४.४९, शेत यात असलेला संत्रा झाडे व बोरवेल सहित इतर झाडे झुडूपासह या दोन्ही शेताची सामाईक चर्तुसिमा :- पूर्वेस - मो.काशीक मो.इस्माईल यांचे शेत, पश्चिम- सिंधुताई ऊ. निर्गुळे यांचे शेत, उत्तर :- पांदण रस्ता, दक्षिण :- नाला याप्रमाणे **२) मौजा- सुरळी,** ता.चांदूर बाजार, जि.अमरावती हददीतील **भुमापन क्रमांक ४२०**, भोगवाटदार वर्ग १ खाते क्रमांक १०००, **मोहम्मद काशिफ मोहमद इस्माईल** यांच्या मालकीचे **० हे ८१ आर** , आकार रु. ४.२४, शेत. शेताची सामाईक चर्तुसिमा :- पूर्वेस - शैला देशमुख यांचे शेत, पश्चिम- सिंधुताई ऊ. निर्गुळे यांचे शेत, उत्तर :- पांदण रस्ता, दक्षिण :-नाला याप्रमाणे या तिनही शेतीचा/क्षेत्रफळाचा, खरेदी-विक्रीचा व्यवहार करावयाचा आहे तरी सदर तीनही मालमत्तेचा व्यवहारा संबंधित कोणास काही हित संबंध/वारसाहक्क/आक्षेप/म्हणणे/तक्रार/आपत्ती असल्यास माझे पक्षकारासोबत नोटीस प्रकाशनाच्या आठ दिवसांचे आतं संपर्क करुन माहिती द्यावी अन्यथा कोणाचीही कुठलीही हरकत नसल्याचे समजून पुढील व्यवहार करण्यात येईल व त्यापुढील उद्भवणा-या कारणास माझे पक्षकार जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

करिता ही जाहीर नोटीस.

**दिनांक १७/०६/२०२६**

स्वाक्षरी/-
अॅड.एस.पी.पोकळे
पत्ता- गवळी कॉम्प्लेक्स, चांदूर बाजार
जि.अमरावती

**संपर्क मो.क्र.-८६००९११९००३**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ गुरुवार, १८ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# शहनाईचे सूर थांबले... आणि सेवाधर्म जिंकला!

## लग्नाच्या वरातीतून थेट रुग्णसेवेसाठी धावले डॉ. सुमित कराळे

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

आयुष्यातील प्रत्येक व्यक्तीसाठी लग्नाचा दिवस हा अविस्मरणीय आणि आनंदाचा क्षण असतो. शहनाईचे मंगल स्वर, नातेवाईकांची लगबग, मित्रांचा जल्लोष आणि नव्या संसाराची स्वप्ने... अशाच आनंदमय वातावरणात तेल्हारा तालुक्यातील युवा वैद्यकीय अधिकारी डॉ. सुमित कराळे यांची वरात निघाली होती. मात्र, याच क्षणी एका रुग्णाच्या जीवासाठी आलेली हाक त्यांच्यासाठी सर्वकाही ठरली आणि त्यांनी स्वतःच्या आनंदावर कर्तव्याला प्राधान्य देत थेट रुग्णालयाची वाट धरली.

वरातीत उत्साहाचे वातावरण शिगेला पोहोचले असताना अचानक रुग्णालयातून तातडीचा फोन आला. एका रुग्णाची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळताच डॉ. कराळे यांनी क्षणाचाही विलंब न करता निर्णय घेतला. नवऱ्याच्या वेशात, डोक्यावर फेटा आणि अंगावर लग्नाचा पोशाख असतानाच त्यांनी रुग्णालय गाठले.



रुग्णालयात पोहोचताच त्यांनी संबंधित रुग्णाची तपासणी करून आवश्यक उपचार सुरू केले. वेळेवर उपचार मिळाल्यामुळे रुग्णाला दिलासा मिळाला. एका बाजूला स्वतःच्या आयुष्यातील सुवर्णक्षण आणि दुसऱ्या बाजूला मृत्यूशी झुंज देणारा रुग्ण... अशा प्रसंगी डॉ. कराळे यांनी मानवतेची बाजू निवडली. या घटनेची माहिती परिसरात वाऱ्यासारखी पसरताच नागरिकांनी त्यांच्या सेवाभावी वृत्तीला सलाम केला.

'डॉक्टर म्हणजे देवदूत असतात' ही भावना अनेकांनी व्यक्त केली. वैद्यकीय व्यवसाय हा केवळ नोकरी नसून समाजसेवेचा वसा आहे, याचे जिवंत उदाहरण डॉ. कराळे यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

ग्रामीण भागातील रुग्णांसाठी सदैव तत्पर असलेले डॉ. सुमित कराळे हे आपत्कालीन परिस्थितीतही उपलब्ध राहतात. त्यांच्या या कृतीमुळे वैद्यकीय क्षेत्राचा मान उंचावला असून तरुण पिढीसमोर कर्तव्यनिष्ठा, संवेदनशीलता आणि सेवाभावाचा आदर्श निर्माण झाला आहे. आज स्वार्थ आणि स्पर्धेच्या युगात स्वतःच्या आनंदाच्या क्षणालाही बाजूला ठेवून एका अनोळखी रुग्णासाठी धाव घेणारा हा डॉक्टर खऱ्या अर्थाने समाजासाठी प्रेरणास्थान ठरला आहे. तेल्हारा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणारी ही घटना अनेकांच्या डोळ्यांत अभिमानाचे अश्रू आणणारी ठरली आहे.

## सकल माहेश्वरी समाजाची महेश नवमी आयोजित

**अकोला :** सकल माहेश्वरी समाजाचा वंशोत्पती दिवस म्हणून महेश नवमी राष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात येते. या वर्षी ही मंगळवार दिनांक २३ जून रोजी महानगरातील सकल माहेश्वरी समाज महेश नवमी उत्सव साजरा करणार आहे. या उत्सव पर्वावर स्थानीय माहेश्वरी भवनात दिनांक १९ जून ते २३ जून पर्यंत माहेश्वरी समाज ट्रस्टच्या वतीने व माहेश्वरी महिला मंडळ, प्रगती मंडळ,नवयुवती मंडळ, वरिष्ठ नागरिक प्रकोष्ठ तथा वरिष्ठ नागरिक महिला प्रकोष्ठच्या सहकार्याने विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती माहेश्वरी समाज ट्रस्टच्या वतीने बुधवारी माहेश्वरी भवनात आयोजित पत्रकार परिषदेत ट्रस्ट चे प्रधानमंत्री विजयकुमार राठी व महेश उत्सव प्रमुख नरेश बियाणी यांनी दिली.यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष विजयकुमार तोष्णिवाल, महिला मंडळ अध्यक्षा सौ. वंदना हेड़ा, सुरज काबरा, कु नंदनी बजाज, सुरेश माहेश्वरी, सौ प्रमिला लाहोटी प्रामुख्याने उपस्थित होते.

# स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती थांबवा

## राजू चौधरी यांचे महावितरणला निवेदन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील वीज ग्राहकांना मोठ्या प्रमाणात विद्यमान मीटर बदलून स्मार्ट मीटर बसविण्याबाबत संदेश पाठविण्यात येत आहेत. मात्र केवळ संदेश पाठवून नागरिकांना विश्वासात न घेता, पुरेशी माहिती न देता व प्रक्रिया स्पष्ट न करता मीटर बदलण्याची घाई सुरू आहे. त्यामुळे स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती करु नये, अशी मागणी वाशीम जिल्हा काँग्रेस अध्यक्ष तथा वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष राजू चौधरी यांनी वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

वाशीम जिल्ह्यात स्मार्ट विद्युत मीटर बसविण्याची सक्ती करण्यात येत आहे. ग्राहकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसविण्यात येऊ नये, असे विद्यमान न्यायालयाचे आदेश असतांनाही महावितरण कंपनीकडून स्मार्ट मीटर बसविण्यात येत आहेत. यामुळे ग्राहकांत तीव्र रोष व्यक्त होत आहे. जुने मीटर व स्मार्ट मीटर यामध्ये मोठी तफावत दिसून येत आहे. त्यामुळे वीज ग्राहकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार आहे. महावितरण कंपनीकडून ग्राहकांना मोबाईल नंबवर संदेश पाठवून ४८ तासात मीटर बसविण्याची सक्ती केली जात आहे. विद्यमान न्यायालयाने ग्राहकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसवू नये, असे स्पष्ट आदेश दिले असतांना महावितरण कंपनीकडून ग्राहकांना सक्तीने मीटर बसविण्यास भाग पाडण्यात येत आहे.

स्मार्ट मीटर हे ग्राहकांसाठी डोकेदुखी असून, मीटर बसविण्याचा खर्च ग्राहकांकडून वसूल केल्या जात असल्याचा आरोपही निवेदनातून केला आहे.

एकीकडे ग्राहकांना विद्युत पुरवठा सुरळीत मिळत नाही. रिडींग न घेता मनमानी वीज बिलाची आकारणी होत असतांना आता स्मार्ट मीटर सक्तीचे केले आहे. या विरोधात काँग्रेस व वीज ग्राहक संघटनांनी आक्रमक पवित्रा घेत तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. निवेदन देतांना काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजू चौधरी यांच्यासह वीज ग्राहकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




**ग्राहकांना मिळालेला संदेश**

भारत सरकारने जारी केलेल्या राजपत्र अधिसूचनेनुसार, जर तुमचे मीटर 'स्मार्ट मीटर' नसेल, तर हा संदेश मिळाल्यापासून ४८ तासांनंतर महावितरण किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींद्वारे तुमचे सध्याचे मीटर बदलून त्याऐवजी 'स्मार्ट मीटर' बसविण्यात येणार आहे. स्मार्ट मीटरमुळे मानवी हस्तक्षेपाशिवाय अचूक बिलिंग होते. मोबाईल ॲपद्वारे तुम्ही तुमच्या विजेचा वापर आणि बिल यांवर लक्ष ठेवू शकता. घरगुती ग्राहकांना सौरऊर्जा उपलब्ध असलेल्या वेळेत प्रति युनिट ८५ पैशांची सवलत मिळेल. मीटर बदलण्याची प्रक्रिया पूर्णपणे मोफत आहे, असे संदेशात नमूद आहे.

## खाजगी हवामान तज्ञांचे अंदाज बेभरोशाचे

### मानोऱ्यातील अनेक संत्रा बागा करपल्या



**मानोरा :** तालुक्यातील शेतकरी व फळबागायतदार मानोरा येथे सक्रिय असलेल्या व दररोज सकाळ-दुपार-संध्याकाळ हवामान अंदाज व्यक्त करणाऱ्या स्वनामधन्य खाजगी तज्ञांमुळे अडचणीत आले आहेत.

उपरोक्त फोटोत दिसणारी वाळलेली संत्रा बाग ही खोट्या अंदाजाची साक्ष देत आहे. 'पाऊस होईल' या बेभरवशा अंदाजावर विश्वास ठेवून पाणी न दिल्याने बागायतदारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

बेलोरा येथील प्रगतिशील शेतकरी मुंगशीराम उपाध्ये यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे.

उठसूट हवामान अंदाज व्यक्त करणाऱ्या खाजगी तज्ञांवर चाप लावावा. शेतकऱ्यांनी केवळ शासकीय यंत्रणेच्या अधिकृत अंदाजावर विश्वास ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ग्रामीण युवक - युवतींसाठी परसबागेतील कुक्कुटपालनावर तीन दिवसीय प्रशिक्षण

■ प्रतिनिधी | वाशिम ■

ग्रामीण भागातील युवक-युवतींमध्ये स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने कृषी विज्ञान केंद्र वाशिम यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या आर्या – कृषी क्षेत्राकडे युवकांना आकर्षित करून त्यांना कृषी व पूरक व्यवसायांमध्ये स्थिर ठेवण्याचा प्रकल्पांतर्गत परसबागेतील कुक्कुटपालन या विषयावर १० ते १२ जुन तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या प्रशिक्षणादरम्यान कृषी विज्ञान केंद्राचे पशुविज्ञान विषय विशेषज्ञ मयूर देशमुख यांनी सखोल व प्रात्यक्षिक आधारित मार्गदर्शन केले. यामध्ये परसबागेतील कुक्कुटपालनाचे महत्त्व, सुधारित कुक्कुट जातींची निवड, निवारा व्यवस्थापन, संतुलित आहार, आरोग्य व्यवस्थापन, लसीकरण, जैवसुरक्षा उपाययोजना तसेच कुक्कुटपालनातून उत्पन्न निर्मितीच्या संधी याबाबत शास्त्रोक्त माहिती देण्यात आली. समारोप प्रसंगी कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. रविंद्र काळे यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करत ग्रामीण युवकांनी शेतीपूरक व्यवसायांचा स्वीकार करून आर्थिक सक्षमीकरणाकडे वाटचाल करावी, असे आवाहन केले. यावेळी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषी विज्ञान केंद्राचे कर्मचारी राम देशमुख व दत्ता काळे यांनी मोलाचे सहकार्य केले.



प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामीण युवकांना कृषी व पूरक व्यवसायांकडे आकर्षित करून शाश्वत रोजगार निर्मितीसाठी कृषी विज्ञान केंद्र वाशिम सातत्याने प्रयत्नशील आहे.


# अपघाताचे आसोला, कारपा डागापूर पांदण रस्ता ठरतोय कारण!

## डागडुजीच्या मागणीकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील तीर्थक्षेत्र असोला खुर्द येथील नागरिक युवराज रंगराव राठोड यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभागीय अभियंता मानोरा यांच्याकडे लेखी निवेदन देऊन असोला खुर्द-कारपा-डागापूर पांदन रस्त्याची तातडीने डागडुजी करण्याची मागणी केली आहे.

अर्जात म्हटले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील हा रस्ता मागील अनेक वर्षांपासून दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहे.



रस्त्यावर नाली-बंधारा नसल्याने पावसाचे पाणी साचते. पावसाळ्यात चिखल, बैल-ट्रॅक्टर रुतणे, घसरून पडण्याच्या घटना रोज घडतात. झाडे-झुडपांनी रस्ता निम्मा खाऊन टाकला आहे. वेळेवर शेतात न पोहोचल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत आहे.'आम्ही शेतकरी आहोत, भिक मागत नाही. आमच्या हक्काचा रस्ता मागतोय' असे राठोड यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# पंढरपूर वारी मार्गाची तातडीने दुरुस्ती करा; वारकऱ्यांसाठी सुविधा उपलब्ध करा



## विश्व वारकरी सेनेची प्रशासनाकडे मागणी

**वारकऱ्यांच्या सोयींना प्राधान्य द्या : गणेश महाराज शेटे**

'अकोट परिसर हा संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेला आहे. या भागातून पंढरपूरकडे जाणाऱ्या दिंड्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शेतकरी, शेतमजूर, सर्वसामान्य भाविक तसेच महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. त्यामुळे प्रशासनाने वारी मार्गावर आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून वारकऱ्यांचा प्रवास सुरक्षित व सुखकर करावा,' असे ह.भ.प. गणेश महाराज शेटे यांनी सांगितले.

■ प्रतिनिधी | अकोट ■

आगामी आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूरकडे जाणाऱ्या पायदळ वारी दिंड्यांचा प्रवास सुरक्षित व सुलभ करण्यासाठी वारी मार्गावरील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, तसेच वारकऱ्यांसाठी आरोग्य, सुरक्षा, पिण्याचे पाणी, वाहतूक नियंत्रण व अन्य आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी विश्व वारकरी सेनेचे राज्याध्यक्ष तथा योगयोगेश्वर संस्थान, वरूळ जऊळका येथील अध्यक्ष ह.भ.प. गणेश महाराज शेटे यांनी केली आहे.

आषाढी एकादशी सोहळ्यासाठी अमरावती विभागातून दरवर्षी मोठ्या संख्येने वारकरी पायदळ दिंड्यांमधून पंढरपूरकडे प्रस्थान करतात. अकोट-अकोला-शेगाव मार्गे जाणाऱ्या या दिंड्यांमुळे मार्गावर भक्तिमय वातावरण निर्माण होत असते. विविध गावांमधील भाविकांकडून पालखीचे पूजन करून दिंड्यांचे स्वागत केले जाते. यंदा अकोट परिसरातून २० जूनपासून मोठ्या प्रमाणात पायदळ वारी दिंड्यांचे प्रस्थान होणार असल्याने प्रशासनाने पूर्वतयारी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, पंढरपूर वारीबरोबरच शेगाव येथेही दर गुरुवारी हजारो भाविक दर्शनासाठी ये-जा करीत असतात. मात्र अकोट-शेगाव मार्गाची अवस्था अत्यंत खराब झाली असून अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडल्याने प्रवाशांना व वारकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या मार्गाचीही तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावर्षी अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने उष्णतेचा प्रभाव कायम राहण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत पायदळ वारी करणाऱ्या वारकऱ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेऊन मार्गावर पिण्याचे पाणी, वैद्यकीय पथके, विश्रांती केंद्रे व सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा विश्व वारकरी सेनेने व्यक्त केली आहे.

# सेवा सहकारी सोसायट्यांच्या बळकटीकरणासाठी तरुण शेतकऱ्यांनी पुढे यावे : डॉ. जयराज कोरपे

## आगर येथे नवीन सेवा सहकारी सोसायटी कार्यालयाचे उद्घाटन

■ प्रतिनिधी | अकोला ■

ग्रामीण भागातील सेवा सहकारी सोसायट्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून अधिक सक्षम, लोकाभिमुख आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनले पाहिजे. तसेच तरुण शेतकऱ्यांनी सहकार क्षेत्रात सक्रिय सहभाग नोंदवून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा बनावे, असे आवाहन अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे यांनी केले.

आगर येथे बुधवारी आयोजित सत्कार समारंभ तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या सेवा सहकारी सोसायटीच्या कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सेवा सहकारी सोसायटी पाळोदी, खांबोरा, नवथळ खेकडी, बादलापूर, लोणाग्रा, ग्रामपंचायत आगर, जनता एज्युकेशन सोसायटी तसेच महात्मा फुले विद्यालय सेवकांची सहकारी पतसंस्था यांच्या वतीने डॉ. कोरपे यांचा सत्कार करण्यात आला.



डॉ. कोरपे म्हणाले की, ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात सेवा सहकारी सोसायट्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. बदलत्या काळानुसार डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, पारदर्शक प्रशासन आणि युवकांचा वाढता सहभाग यामुळे सहकार क्षेत्र अधिक मजबूत होऊ शकते. सोसायट्यांच्या सक्षमीकरणासाठी जिल्हा बँक विविध योजनांद्वारे सातत्याने कार्यरत असून संपूर्ण व्याजमाफी योजना, सूर्यधर योजना आणि सोसायटी इमारत अर्थसहाय्य योजना यांसारख्या उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील संस्थांना बळ मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

नवीन कार्यालयीन इमारतीमुळे सोसायटीच्या कामकाजाला अधिक गती मिळणार असून सभासद, खातेदार आणि शेतकऱ्यांना अधिक दर्जेदार व आधुनिक सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीष धोत्रे होते. यावेळी राजेंद्र काळणे आणि विष्णुपंत वारकरी यांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती ज्ञानेश्वरराव महल्ले, अकोला व वाशिम जिल्हा प्राथमिक कृषी सहकारी पत संस्थांच्या संघाचे संचालक अंबादास तेलगोटे, निळकंठराव खेळकर, सुरेश सनगाळे, गजानन पारधी, सरपंच सुशिलाबाई खोले, अभिमन्यू वक्ते, ज्ञानेश्वर काळणे, किशोर महाराज खोले आदी उपस्थित होते. कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, पदाधिकारी, संचालक मंडळ सदस्य, सभासद शेतकरी व खातेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक बँकेचे उपमुख्याधिकारी रविंद्र थोरात यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन आशुतोष काळणे यांनी केले.

## पुरस्कारांचा वाढता बाजार की खऱ्या कार्याचा सन्मान? समाजात निर्माण झालेले प्रश्नचिन्ह

■ प्रतिनिधी | कारंजा ■

आज-काल विविध संस्था, संघटना, मंच, प्रतिष्ठाने आणि सामाजिक समूहांकडून मोठ्या प्रमाणावर पुरस्कार वितरण सोहळ्यांचे आयोजन केले जात आहे. सामाजिक कार्य, शिक्षण, पत्रकारिता, आरोग्य, साहित्य, उद्योग, कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रांतील व्यक्तींना गौरविण्याच्या उद्देशाने हे पुरस्कार दिले जात असल्याचा दावा केला जातो. मात्र अशा पुरस्कारांच्या निवड प्रक्रियेबाबत आणि पारदर्शकतेबाबत समाजामध्ये अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

अनेक ठिकाणी पुरस्कारासाठी पात्र व्यक्तींची निवड नेमक्या कोणत्या निकषांवर केली जाते, याची कोणतीही स्पष्ट माहिती दिली जात नाही. काही ठिकाणी अर्ज शुल्क, नोंदणी शुल्क, प्रायोजकत्व किंवा इतर आर्थिक व्यवहारांच्या माध्यमातून पुरस्कार मिळत असल्याच्या चर्चा समाजात रंगत आहेत. या चर्चांमध्ये कितपत तथ्य आहे, याची स्वतंत्र पडताळणी आवश्यक असली तरी त्यामुळे पुरस्कारांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

## डोंगरकिन्हीत गोठ्याला भीषण आग



# तीन बैलांचा मृत्यू, एक गंभीर जखमी

## शॉर्ट सर्किटमुळे दुर्घटना; शेतकऱ्याचे साडेसहा लाखांचे नुकसान, तातडीच्या मदतीची मागणी

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

डोंगरकिन्ही येथील शेतकरी बाळासाहेब ऊर्फ निळकंठराव वामनराव देशमुख यांच्या शेतातील गुरांच्या गोठ्याला सोमवारी (दि. १५ जून) दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास शॉर्ट सर्किटमुळे आग लागून मोठी दुर्घटना घडली. या आगीत तीन बैल होरपळून जागीच मृत्युमुखी पडले, तर एक बैल गंभीररीत्या जखमी झाला. तसेच गोठा आणि शेतीसाठीचे साहित्य जळून खाक झाल्याने शेतकऱ्याचे सुमारे साडेसहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

मालेगाव–मेहकर मार्गावरील गट क्रमांक ३२० मध्ये देशमुख यांचा गुरांसाठी व शेती साहित्य ठेवण्यासाठी मोठा गोठा आहे. सोमवारी दुपारी अचानक लागलेल्या आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केले. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी दाखल होऊन आग विझविण्याचे प्रयत्न करण्यात आले. मात्र तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते.

या आगीत तीन बैल, स्प्रिंकलर संच, शेतीची औजारे, सोयाबीन कुटार, टिनपत्रे, शेणखत, ड्रिप संच, पेट्रोल फवारणी पंप, लोखंडी अँगल तसेच लाकूडफाटा आदी साहित्य जळून खाक झाले. प्राथमिक पंचनाम्यानुसार नुकसान सुमारे साडेसहा लाख रुपयांच्या घरात असल्याचे सांगण्यात आले.

घटनास्थळी ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी भेट देऊन पंचांसमक्ष पंचनामा केला. ऐन पेरणीच्या तोंडावर ही दुर्घटना घडल्याने शेतकरी देशमुख यांच्यासमोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे. शेतीच्या कामासाठी अत्यावश्यक असलेले बैल दगावल्याने आगामी पेरणी कशी करावी, असा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाला आहे.

त्यामुळे शासनाने या बाधित शेतकऱ्याला तातडीने आर्थिक मदत देऊन दिलासा द्यावा, अशी मागणी ग्रामस्थ व परिसरातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २०१ ■ गुरुवार, १८ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

### चला वारीला, माऊलीच्या भेटीला...

# भोजाजी महाराजांच्या पालखीचे २० जूनला आजनसराहून पंढरपूरकडे प्रस्थान

## २७ व्या पदयात्रा सोहळ्याची जय्यत तयारी

**आजनसरा आजनसरा :** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर विठ्ठलभक्तांमध्ये पंढरीच्या भेटीची आस लागली असून श्री संत भोजाजी महाराज संस्थान, आजनसरा येथून निघणारा २७ वा पालखी पदयात्रा सोहळा यंदाही भक्तिमय वातावरणात पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. ज्ञानोबा-तुकाराम आणि भोजाजी महाराज की जय च्या अखंड गजरात शनिवार, दि. २० जून रोजी ही पालखी विठुरायाच्या भेटीसाठी मार्गस्थ होणार आहे.



पहाटे ब्राह्ममुहूर्तावर काकड आरती, अभिषेक आणि महापूजेनंतर श्री संत भोजाजी महाराजांच्या समाधी मंदिरातून पालखीची ग्रामप्रदक्षिणा काढण्यात येईल. त्यानंतर श्रींच्या पादुकांसह पालखी पंढरपूरकडे रवाना होईल. टाळ, मृदुंग आणि वीणेच्या सुरावटींनी दुमदुमणाऱ्या वातावरणात शेकडो वारकरी या पायी वारीत सहभागी होणार आहेत. कपाळी बुक्का, गळ्यात तुळशीमाळ, अंगावर शुभ्र वस्त्र आणि हाती भगवी पताका अशी वारकऱ्यांची पारंपरिक वेशभूषा संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून टाकणार आहे.

ही दिंडी पहिला मुक्काम सोकरामाता देवस्थान येथे करणार असून त्यानंतर यवतमाळ, हिंगोली, परभणी, बीड, धाराशिव आणि सोलापूर या जिल्ह्यांमधून मार्गक्रमण करणार आहे. सुमारे महिनाभराचा प्रवास पूर्ण करून दि. २० जुलै रोजी पालखी पंढरपूर नगरीत दाखल होईल. मार्गातील प्रत्येक गावात दिंडीचे स्वागत करण्यात येणार असून भजन, कीर्तन, भारूड, प्रवचन आणि रिंगण सोहळ्यांमुळे भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.

वारी हा केवळ प्रवास नसून भक्ती, समर्पण, शिस्त आणि समाजप्रबोधनाचा उत्सव मानला जातो. दिंडीचे विणेकरी ह.भ.प. विठ्ठलराव धुर्वे महाराज यांच्या संतवाणीचा लाभ भाविकांना मिळणार आहे. त्यांच्या कीर्तनातून संतांच्या विचारांचा प्रसार होणार असून वारकरी संप्रदायाची परंपरा अधिक दृढ होणार आहे.

दिंडी मार्गावर विविध गावांतील भाविकांकडून अन्नदान, जलसेवा, निवास व्यवस्था आणि चरणसेवा करण्यात येणार आहे. सेवाभाव आणि समतेचा संदेश देणारी ही वारी सामाजिक ऐक्याचेही प्रतीक मानली जाते. वारीत सहभागी होणाऱ्या भाविकांनी श्वेत वस्त्र, तुळशीमाळ आणि टाळ घेऊन सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थानतर्फे करण्यात आले आहे.

वारीसाठी नोंदणी १६ ते १९ जून दरम्यान देवस्थान कार्यालयात करण्यात येणार असून आधारकार्ड, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो व वैद्यकीय प्रमाणपत्र आवश्यक राहणार आहे. पदयात्रेची सांगता झाल्यानंतर दि. ३ ऑगस्ट रोजी आजनसरा येथे दिंडी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या भक्तिमय सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन विठ्ठलनामाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानकडून करण्यात आले आहे.

### मोदी सरकारचा गजर पण हिंगणघाट चा विकास कुठे

# रस्त्यांचे भूमिपूजन अन् आश्वासनांचा पाऊस; पण विद्यार्थ्यांच्या भविष्याचे काय

## १२ वर्षांच्या कारभारावर आमदार कुणावरांना जनतेचा रोष

### शासकीय अभियांत्रिकी-पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या मागणीने पुन्हा पेटला विकासाचा मुद्दा




**हिंगणघाट जनमाध्यम :** केंद्रातील मोदी सरकारच्या कामगिरीचा गौरव करणाऱ्या आमदार समीर कुणावर यांच्यासमोर आता हिंगणघाटमधील विद्यार्थी, पालक आणि सुजाण नागरिकांनी विकासाच्या संकल्पनेवरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे. शासकीय अभियांत्रिकी व पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या मागणीसाठी विद्यार्थी-पालकांनी लिहिलेल्या खुल्या पत्रामुळे स्थानिक राजकारणात नवी चर्चा सुरू झाली आहे.

गेल्या बारा वर्षांत हिंगणघाटमध्ये अनेक रस्ते, सिमेंट रस्ते आणि नाल्यांची कामे झाली. मात्र केवळ रस्ते बांधणे म्हणजे विकास नव्हे अशी भावना आता नागरिकांमधून व्यक्त होत आह, शिक्षण, आरोग्य, रोजगार, उद्योग, क्रीडा आणि तांत्रिक शिक्षण यांसारख्या मूलभूत क्षेत्रांमध्ये अपेक्षित प्रगती का झाली नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

विशेष म्हणजे आमदारांना केवळ रस्ते आणि नाल्यांसाठीच निधी मिळत नाही. शिक्षण, कौशल्य विकास, सार्वजनिक सुविधा आणि विविध विकासकामांसाठी शासनाकडून निधी उपलब्ध होत असतो. मग हा निधी प्रामुख्याने रस्ते आणि नाल्यांवरच का खर्च केला जातो, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे. हिंगणघाटसारख्या मोठ्या शहरात आजही शासकीय अभियांत्रिकी किंवा पॉलिटेक्निक महाविद्यालय नसणे ही विकासाच्या दाव्यांवर प्रश्न उपस्थित करणारी बाब असल्याचे बोलले जात आहे.

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी अभियांत्रिकी महाविद्यालयाबाबत दिलेले आश्वासन आजही कागदावरच असल्याचा आरोप खुल्या पत्रातून करण्यात आला आहे. परिणामी, गरीब शेतकरी, कामगार आणि मध्यमवर्गीय कुटुंबांतील विद्यार्थ्यांना उच्च तंत्रशिक्षणासाठी आर्वी, वणी, वरोरा किंवा बुट्टीबोरी येथे जावे लागत असून त्याचा मोठा आर्थिक फटका पालकांना सहन करावा लागत आहे. रस्ते झाले, नाले झाले पण विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणाऱ्या शैक्षणिक संस्था कधी उभ्या राहणार हा प्रश्न आता जनतेच्या चर्चेचा विषय बनला आहे. पावसाळी अधिवेशनात हिंगणघाटसाठी शासकीय अभियांत्रिकी व पॉलिटेक्निक महाविद्यालय मंजूर करण्यासाठी आमदारांनी ठोस पाठपुरावा करावा, अशी मागणी विद्यार्थी आणि पालकांनी केली आहे.

हिंगणघाटच्या विकासाचा खरा आलेख केवळ सिमेंटच्या रस्त्यांनी नव्हे, तर शिक्षण, रोजगार आणि संधींच्या निर्मितीने ठरणार असल्याचे मतही नागरिकांमधून व्यक्त होत आहे. त्यामुळे आता विकासाच्या घोषणांपेक्षा प्रत्यक्षात विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी काय उभे राहते, याकडे संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

# अतिउष्णतेचा फटका; संत्रा-मोसंबीच्या बागा होरपळल्या

### नुकसानग्रस्त बागांचे पंचनामे व भरपाईची मागणी

**कारंजा जनमाध्यम :** यंदाच्या उन्हाळ्यातील विक्रमी उष्णतेमुळे कारंजा तालुक्यातील संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. वाढत्या तापमानामुळे हजारो झाडांची पाने करपून गळून पडली असून अनेक बागा पूर्णपणे वाळल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने बुधवारी तहसीलदार निनावे यांना निवेदन देऊन नुकसानग्रस्त बागांचे पंचनामे करून तातडीने भरपाई देण्याची मागणी करण्यात आली.

शेतकऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे की, उन्हाळ्यात तापमानाने उच्चांक गाठल्याने संत्रा व मोसंबीच्या झाडांवर विपरीत परिणाम झाला. अनेक ठिकाणी लहान-मोठी झाडे जळाल्याने वर्षानुवर्षे जोपासलेल्या बागा उद्ध्वस्त झाल्या आहेत. परिणामी शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून आर्थिक संकट अधिक गडद झाले आहे.

दरम्यान, अतिउष्णतेमुळे तालुक्यात चाऱ्याचीही तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. जनावरांच्या संगोपनाचा प्रश्न गंभीर बनत असल्याने प्रशासनाने तातडीने चारा डेपो सुरू करावेत, अशी मागणीही करण्यात आली. शासनाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

निवेदन देताना शेतकरी संघर्ष समितीचे पदाधिकारी, सदस्य आणि तालुक्यातील संत्रा-मोसंबी उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भूमिहीन शेतमजुराची गळफास घेऊन आत्महत्या

### बोरी (कोकाटे) गावात शोककळा



**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील बोरी (कोकाटे) येथे एका भूमिहीन शेतमजुराने घरासमोरील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून परिसरात शोककळा पसरली आहे.

मृत व्यक्तीचे नाव सुधाकर नत्थुजी आत्राम (वय ५०) असे आहे. ते भूमिहीन असून मजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. मंगळवारी सकाळी त्यांनी घरासमोरील झाडाला गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. ही बाब लक्षात येताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली आणि तातडीने सेलू पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून विविध अंगांनी तपास सुरू आहे. सुधाकर आत्राम यांच्या आकस्मिक निधनाने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावकऱ्यांनीही शोक व्यक्त केला आहे. या घटनेने बोरी (कोकाटे) गावातील नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

# पालोतीत अवैध मोहादारू भट्टी उद्ध्वस्त; २.७३ लाखांचा सडवा जागीच नष्ट

**वर्धा जनमाध्यम :** अवैध दारू निर्मितीविरोधात सावंगी (मेघे) पोलिसांनी मंगळवारी पहाटे धडक कारवाई करत पालोती परिसरातील गावठी मोहादारूच्या भट्टीचा पर्दाफाश केला. या कारवाईत तब्बल २ लाख ७३ हजार रुपयांचा मोहा सडवा रसायन व साहित्य जप्त करून जागीच नष्ट करण्यात आले. पोलिसांच्या धाडीची चाहूल लागताच आरोपी घटनास्थळावरून पसार झाला.



सावंगी (मेघे) पोलीस गस्त घालत असताना मुखबिरामार्फत पालोती येथील प्रवीण दखणे हा नाल्याच्या काठावरील निर्जन जागेत मोठ्या प्रमाणात गावठी मोहादारू तयार करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी पंचांसह घटनास्थळी धाड टाकली. पोलिसांचे पथक जवळ पोहोचताच आरोपीने तेथून पळ काढला.

पंचांसमक्ष केलेल्या पाहणीत १३ मोठ्या लोखंडी ड्रममध्ये साठवून ठेवलेले १ हजार ३०० लिटर कच्चे मोहा सडवा रसायन आढळून आले. या रसायनाची किंमत २ लाख ६० हजार रुपये तर ड्रमची किंमत १३ हजार रुपये असून एकूण २ लाख ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अवैध दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे हे रसायन पर्यावरण व नागरिकांच्या आरोग्यास घातक ठरण्याची शक्यता असल्याने ते जागीच नष्ट करण्यात आले.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद गिरी यांच्या पथकाने ही कारवाई केली. आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा शोध सुरू आहे. या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# कारमधून दारूची तस्करी उघड

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; १२.५० लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** अवैध दारू विक्री व वाहतुकीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत सिंदी (रेल्वे) परिसरात देशी व विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला. या कारवाईत होंडा सिटी कारसह १२ लाख ५० हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे १६ जून रोजी चिचघाट पुरा नाल्याजवळ सापळा रचण्यात आला. संशयित होंडा सिटी कार क्रमांक एमएच ४९ बी ९२७७ अडवून तपासणी केली असता वाहनात १२ खोक्यांमध्ये विदेशी दारू व सहा खोक्यांमध्ये देशी दारू आढळून आली.

याप्रकरणी सचिन उर्फ सोनू कतलकर, रोहित उर्फ राकेश परखड, अभिजित घोडे यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत दारूचा माल प्रणय डंभारे याचा असल्याचे निष्पन्न झाले. विदेशी दारू मध्य प्रदेशातून आणण्यात आली होती, तर देशी दारू सावंगी (आसोला) येथून खरेदी करण्यात आल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी दारूसाठा व कार असा १२.५० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पाच आरोपींविरुद्ध सिंदी (रेल्वे) पोलीस ठाण्यात दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

# अवैध रेती वाहतुकीवर पोलिसांचा हातोडा; ३८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**समुद्रपूर जनमाध्यम :** जिल्ह्यात अवैध रेती वाहतुकीविरोधात सुरू असलेल्या कारवाईदरम्यान समुद्रपूर पोलिसांनी दोन स्वतंत्र कारवायांत रेतीसह तब्बल ३८ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या धडक कारवाईमुळे रेती माफियांचे धाबे दणाणले असून संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

आरंभा-परडा शिवारात पोलिस गस्तीदरम्यान एमएच-३२ एजे-७१३७ क्रमांकाचा १६ चाकी ट्रक संशयास्पदरीत्या आढळून आला. पोलिस हवालदार प्रमोद थुल व त्यांच्या पथकाने वाहनाची तपासणी केली असता ट्रकमध्ये सुमारे १० ब्रास रेती आढळली. चालक जुनेद मोहम्मद खान (रा. पेठ अहमदपूर, ता. आष्टी) याच्याकडे रेती वाहतुकीचा कोणताही वैध परवाना नसल्याने ट्रकसह एक लाख रुपयांची रेती असा एकूण ३१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दुसऱ्या कारवाईत खंडाळा-नारायणपूर मार्गावर नाकाबंदी दरम्यान गोपनीय माहितीच्या आधारे एका ट्रॅक्टरची तपासणी करण्यात आली. वाकसुर येथील वणा नदीपात्रातून विना परवाना रेती वाहतूक होत असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी अजय गजानन कुमरे, अनिल मारोतराव आत्राम तसेच ट्रॅक्टर मालक समीर मुडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी ट्रॅक्टर, ट्रॉली व रेती असा ७ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

ठाणेदार दीपक वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. जिल्ह्यातील अवैध रेती उत्खनन आणि वाहतुकीविरोधात पोलिसांची मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# निंबाच्या झाडाला गळफास घेऊन युवकाची आत्महत्या

### रामपूर परिसरात हळहळ

**विरुळ आकाजी जनमाध्यम :** विरुळजवळील रामपूर येथे १७ वर्षीय युवकाने निंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून परिसरात शोककळा पसरली आहे.

युवराज सोनू गवते (वय १७, रा. रामपूर) असे मृत युवकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, युवराज याने मंगळवारी रात्री रामपूर शिवारातील निंबाच्या झाडाला गळफास घेऊन जीवन संपविले. सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली व पोलिसांना माहिती देण्यात आली.

माहिती मिळताच पुलगाव पोलीस स्टेशनचे अमोल जिंदे व गीतेश देवघरे यांनी घटनास्थळी भेट देऊन प्राथमिक पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला.

आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप समोर आले नसून पुलगाव पोलीस अधिक तपास करीत आहेत. अल्पवयीन युवकाच्या आकस्मिक मृत्यूमुळे रामपूर गावात शोककळा पसरली असून नागरिकांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# सिझेरियनच्या व्रणातील दुर्मिळ गर्भधारणेवर यशस्वी उपचार

### बहुविद्याशाखीय तज्ज्ञांच्या समन्वयातून गर्भाशय वाचविण्यात यश

**वर्धा जनमाध्यम :** पूर्वी सिझेरियन शस्त्रक्रिया झालेल्या महिलेच्या गर्भाशयावरील व्रणात विकसित झालेल्या दुर्मिळ आणि जीवघेण्या गर्भधारणेवर वर्ध्यातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने यशस्वी उपचार केले आहेत. वेळेवर निदान, आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान आणि विविध तज्ज्ञांच्या समन्वयामुळे मोठी शस्त्रक्रिया टाळून गर्भाशय सुरक्षित राखण्यात यश आल्याने या उपचाराची वैद्यकीय क्षेत्रात चर्चा होत आहे.

सिझेरियन स्कार प्रेग्नन्सी हा एक्टोपिक गर्भधारणेचा अत्यंत दुर्मिळ आणि गंभीर प्रकार मानला जातो. या स्थितीत गर्भ पूर्वीच्या सिझेरियन शस्त्रक्रियेच्या व्रणामध्ये वाढू लागतो. वेळेत निदान न झाल्यास अतिरक्तस्राव, गर्भाशय फुटणे आणि मातेला जीवघेणा धोका निर्माण होऊ शकतो.



या रुग्णावर उपचार करताना प्रथम युटेराईन आर्टरी एम्बोलायझेशन ही अत्याधुनिक प्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर अल्ट्रासाऊंडच्या मार्गदर्शनाखाली गर्भधारणेचे इव्हॅक्युएशन करण्यात आले. या उपचारपद्धतीमुळे लॅपरोटॉमी किंवा लॅप्रोस्कोपीसारख्या मोठ्या शस्त्रक्रियेची आवश्यकता भासली नाही. परिणामी रुग्णेचे गर्भाशय सुरक्षित राहिले आणि भविष्यातील मातृत्वाची शक्यताही कायम राखता आली.

या जटिल प्रकरणाचे व्यवस्थापन स्त्रीरोग व प्रसूतीतज्ज्ञ डॉ. नीमा आचार्य आणि फीटल अल्ट्रासाऊंड तज्ज्ञ डॉ. दीपाली साबळे यांनी केले. इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजिस्ट डॉ. पंकज बनोडे यांनी युटेराईन आर्टरी एम्बोलायझेशन प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. तर भूलतज्ज्ञ डॉ. व्ही. चाकोले आणि डॉ. एस. निनावे यांनी उपचारादरम्यान महत्त्वपूर्ण सहकार्य केले.

जटिल प्रसूतीविषयक आपत्कालीन परिस्थितींमध्ये आधुनिक इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजी तंत्रज्ञान किती प्रभावी ठरू शकते याचे हे उत्तम उदाहरण असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले. वेळेवर निदान आणि बहुविद्याशाखीय उपचारपद्धतीच्या माध्यमातून रुग्णांचे प्राण वाचविण्यासोबतच त्यांची भविष्यातील प्रजनन क्षमता जपणे शक्य होत असल्याचे या यशस्वी उपचारातून अधोरेखित झाले आहे.

# सिकलसेल आजाराच्या रुग्णांना मोफत उपचारासह विविध सुविधा

### उद्या जागतिक सिकलसेल दिन

**वर्धा जनमाध्यम :** सिकलसेल आजार हा शरीरातील हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी होऊन गोल असणा-या लाल रक्तपेशी विळ्याच्या आकाराच्या होतात. सामान्य मानसांच्या रक्तपेशी १२० दिवस पर्यंत जिवंत राहतात. परंतु सिकलसेल रोगग्रस्तांच्या ३० ते ४० दिवस पेशी जिवंत असतात. हा आजार अनुवंशिक आहे. जिल्ह्यामध्ये १ हजार २२५ रुग्ण असून ७ हजार ९७२ वाहक आहेत. सिकलसेल आजारावर मोफत उपचार असून शासनाच्यावतीने रुग्णांना विविध सुविधा व योजनेचा लाभ देण्यात येतो.

सिकलसेल आजाराचे आजारी व्यक्ती व सिकलसेल वाहक व्यक्ती असे दोन प्रकार असून वारंवार ताप येणे, छातीत दुखणे, श्वास घेण्यास त्रास होणे, निस्तेजपणा वाटणे, पोटदुखी, सांधेदुखी, डोके दुखी, धाप लागणे, असह्य वेदना आणि दृष्टीदोष ही लक्षणे आहे. या आजाराच्या रुग्णांना हायड्राक्सी युरीया व फोलीक ?सीड गोळ्या मोफत पुरविण्यात येतात. रुग्णांना वेदनानाशक औषधी पुरविण्यात येतात. गुंतागुंतीच्या रुग्णांना वैद्यकीय महाविद्यालयात उपचार करण्यात येतात. सिकलसेल रुग्णांना टेलीमेडीसीन अंतर्गत तज्ञांना दाखविण्यात येते. रुग्णांना रक्त कमी झाल्यास रक्त देण्यात येते.सिकलसेल रुग्णांनी घ्यावयाची काळजी : समतोल व प्रथीनयुक्त आहार घ्यावा, भरपुर पाणी प्यावे, भरपूर आराम करावा. अतिकाम व चिंता करु नये, नियमित तपासणी व डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, जंतुसंसर्ग झाल्यास त्वरीत डॉक्टरांना भेटावे. प्रथम तिमाहीमध्ये निदान झालेल्या वाहक व रुग्ण मातांच्या जोडीदाराची तपासणी करुन घ्यावी. त्यात जर जोडीदार वाहक किंवा रुग्ण आढळल्यास या मातांना गर्भजल चाचणी परिक्षण करण्याकरीता नागपूर येथील एम्स व अरिहंत हॉस्पीटल येथे पाठविण्यात येते. या ठिकाणी मोफत तपासणी करण्यात येते. जर चाचणीमध्ये बाळ आढळले तर गर्भपाताकरीता समुपदेशन करायचे आहे.

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर L5125875 वरील माझे SHEKH FAIM SHEKH MEHMUD SHEKH असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील FAIM MAHEMUD SHEIKH नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :- मदिना मस्जिद जवळ आर्वी नाका वर्धा ४४२००१

# ४० वर्षांचे जुने अतिक्रमण जमीनदोस्त, पांदण रस्ते मोकळे

## तहसीलदार पुष्पा सोळंके यांची धडाकेबाज कारवाई

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

तालुक्यातील शेतकऱ्यांच्या दळणवळणाचा मोठा प्रश्न मार्गी लावत अंजनगाव सुर्जीच्या तहसीलदार पुष्पा सोळंके यांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी धडाकेबाज अतिक्रमणविरोधी मोहीम राबवली आहे. तब्बल ३५ ते ४० वर्षांपासून रखडलेले पांदण रस्त्यांवरील अतिक्रमण हटवून त्यांनी शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. या धाडसी कारवाईमुळे तालुक्यातील शेतकरी वर्गातून तहसीलदार सोळंके यांच्यावर



कौतुकाचा वर्षाव होत आहे.

तुरखेड येथील टी-पॉइंट ते आडगाव गट क्रमांक १७/२ वर गेल्या ३५ ते ४० वर्षांपासून काही स्थानिकांनी अतिक्रमण केले होते. हा महत्त्वाचा पांदण रस्ता बंद असल्याने शेतकऱ्यांना शेतात ये-जा करणे कठीण झाले होते. तहसीलदार पुष्पा सोळंके यांनी महसूल पथकासह घटनास्थळी पोहोचून हे जुने अतिक्रमण पूर्णपणे निष्कासित केले. अतिक्रमण निघाल्यामुळे या पांदण रस्त्याने जणू मोकळा श्वास घेतला आहे. यामुळे आता शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातील पिके कोणत्याही अडथळ्याविना सुरक्षित घरी आणता येतील, तसेच शेतीची मशागतही योग्य वेळी करणे शक्य होणार आहे.दुसऱ्या एका मोठ्या कारवाईत अंजनगाव-अकोट राज्य महामार्गाला लागून असलेल्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर अंतर्गत शेत रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्यात आले. यामध्ये आडगाव खाडे, नवापूर ते चौसाळा चिचोणा या शेत रस्त्याचा समावेश आहे. हा रस्ताही अतिक्रमणाच्या विळख्यात सापडल्याने शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. महसूल विभागाने या मार्गावरील सर्व अडथळे दूर करून रस्ता वहिवाटीसाठी खुला केला आहे.

तालुक्यातील या दोन्ही अत्यंत महत्त्वाच्या शेत रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवल्यामुळे परिसरातील शेकडो शेतकऱ्यांची मोठी अडचण दूर झाली आहे. ऐन शेतीच्या हंगामात रस्ते मोकळे झाल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. महसूल प्रशासनाचा धाक निर्माण करत शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेणाऱ्या तहसीलदार पुष्पा सोळंके यांचे संपूर्ण अंजनगाव सुर्जी तालुक्यातून विशेष आभार मानले जात आहेत.

सेवानिवृत्तीनिमित्त

# अजय देशमुख:एक आदर्श व्यक्तिमत्व

'कर्तृत्वाचा दशदिशांत पसरावा दरवळ आणि त्यातून उमलावी चैतन्याची सळसळ,' या उक्तीला साजेसे, चिरतरुण आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणजे मा. अजय बळवंत देशमुख. अत्यंत प्रतिकूल आणि हलाखीच्या परिस्थितीतून संघर्ष करत त्यांनी आपल्या जिद्दी, प्रामाणिकपणा आणि कर्तृत्वाच्या बळावर राज्यस्तरीय नेतृत्वाची उंची गाठली.संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात शिक्षकेतर कर्मचारी संघटनेला सुगीचे दिवस निर्माण करणारा नेता म्हणून ज्या नेतृत्वाकडे पाहिल्या जाते ते नेतृत्व म्हणजे अजय देशमुख. त्यांच्या कार्यक्षम नेतृत्वामुळे कर्मचारी संघटनांमध्ये त्यांची स्वतंत्र आणि प्रभावी ओळख निर्माण झाली. ऑक्टोबर २०१३ मध्ये विद्यापीठ कर्मचारी महासंघाचे कार्याध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली आणि २०२१ मध्ये महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाच्या अध्यक्षपदाची धुरा त्यांनी समर्थपणे सांभाळली. आज महाराष्ट्रातील विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नेतृत्वाची धुरा ते समर्थपणे सांभाळत आहे.

या जबाबदाऱ्यांना पूर्ण न्याय देत त्यांनी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांचा सखोल अभ्यास केला आणि अनेक प्रश्न न्यायिक मार्गाने सोडवले. कर्मचारी हितासाठी सातत्याने संघर्ष करत त्यांनी कर्मचाऱ्यांचा आवाज बुलंद केला. विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीचा लढा त्यांनी अत्यंत निकराने लढविला. तसेच १२ व २४ वर्षांच्या सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजना पूर्ववत करण्यासाठी त्यांनी यशस्वी प्रयत्न केले.

'वैष्णव जन तो तेणे कहिये, जो पीड पराई जाणे रे' या प्रार्थनेचा खरा अर्थ त्यांनी आपल्या जीवनातून जपला.कर्मचाऱ्यांच्या दुःखाशी एकरूप होत त्यांच्यासाठी सदैव



तत्पर राहणे, हा त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव बनला. विद्यापीठ अधिसभेवर कुलगुरू नामित सदस्य म्हणून त्यांची कारकीर्द अत्यंत गौरवास्पद राहिली.

शासनाच्या सेवा प्रवेश नियम समितीवर सदस्य म्हणून कार्यरत असताना त्यांनी कर्मचारी हिताच्या मुद्यांना अग्रक्रम देत अनेक प्रश्न सोडविले. महाराष्ट्रातील विविध विद्यापीठीय समित्यांवर कार्यरत राहून त्यांनी विद्यापीठ आणि संघटनेचे नाव उंचावले.

संघटनात्मक आणि प्रशासकीय कार्याबरोबरच सामाजिक जीवनातही त्यांनी आपला अमीट ठसा उमटविला आहे. अंध, अपंग आणि विशेषतः पारधी समाजाच्या उत्थानासाठी त्यांनी सातत्याने कार्य केले. वस्त्यांवर जाऊन मदत करणे, आर्थिक सहकार्य करणे आणि त्यांच्या समस्यांशी बांधिलकी ठेवणे, हे त्यांचे कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे. कोरोना काळात संपूर्ण समाज संकटात असताना त्यांनी मित्रमंडळीसह आणि वैयक्तिक पातळीवर मदतीचा हात पुढे करून आपले सामाजिक उत्तरदायित्व निष्ठेने पार पाडले.

परमेश्वरावर असलेली त्यांची निस्सीम श्रद्धा आणि समाजकार्यातील सातत्य हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेपण आहे. श्री गजानन महाराजांचे मंदिर निर्माणकार्य , प्रकटदिन उत्सव तसेच विविध सामाजिक उपक्रम त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक वर्षांपासून यशस्वीपणे सुरू आहेत. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि सेवाभावी कार्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व सर्वदूर परिचित आणि प्रेरणादायी ठरले आहे.

'माणसाने माणसाशी माणसासम वागावे,' या उक्तीचा प्रत्यय त्यांच्या प्रत्येक कृतीतून येतो. अर्ध्या रात्री अडचणीत असणाऱ्याच्या मदतीला धावून जाणे, लोकांना योग्य संधी उपलब्ध करून देणे आणि माणसं जपणे ही त्यांची खास ओळख आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आकाशाएवढी भव्यता असली तरी त्याला नम्रतेची सुंदर किनार लाभलेली आहे. सद्भाव, सद्विचार आणि सेवाभाव ही त्यांच्या जीवनाची खरी ओळख आहे.

आज त्यांची सेवापूर्ती होत असली तरी ती केवळ शासकीय सेवेतून आहे; समाजसेवा आणि जनसेवेतील त्यांचा प्रवास मात्र अखंड सुरूच राहणार आहे. एक उत्तम कर्मचारी, प्रभावी नेता, संवेदनशील कार्यकर्ता, जिवलग मित्र, सहकारी आणि आदर्श कुटुंबवत्सल व्यक्ती म्हणून त्यांनी प्रत्येक क्षेत्रात यश संपादन केले आहे.त्यांच्या पुढील आयुष्यातही त्यांनी प्रगतीची नवनवी शिखरे सर करीत समाजासमोर आदर्श निर्माण करावा,हीच सदिच्छा. त्यांना निरोगी, सुखी, समृद्ध आणि दीर्घायुष्य लाभो,ही श्री गजानन चरणी प्रार्थना.

**जयंत निखारे**
आर.डी.आय.के. कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

## शेतकरी जागृती व कृषी निविष्ठा वितरण कार्यक्रम

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

आयसीएआर-केंद्रीय कापूस संशोधन संस्था (सीआयसीआर), नागपूरतर्फे अनुसूचित जमाती उपयोजना (डीएपीएसटी) अंतर्गत अक्की ता. चिखलदरा येथे शेतकरी जागृती व कृषी निविष्ठा वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात ७२ शेतकरी, त्यापैकी ५० पुरुष व २२ महिला शेतकरी सहभागी झाले.

कार्यक्रमास सहाय्यक कृषी अधिकारी गणेश टोटे, राकेश भुसुंग, बीटीएम गजानन राठोड व सरपंच इंद्रायणी जावरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. शिवाजी थुबे यांनी कापूस व मका पिकातील एकात्मिक कीड व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. तांत्रिक अधिकारी अब्दुल वसीम यांनी उत्पादन तंत्रज्ञान, तर रत्नदीप रामटेके यांनी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाविषयी माहिती दिली. वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. शैलेश गवांडे यांनी कापूस पिकातील रोग व्यवस्थापन तसेच उच्च घनता लागवड पद्धतीचे महत्त्व स्पष्ट केले. बीटीएम गजानन राठोड यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती देऊन शेतकऱ्यांना लाभ घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी शेतकऱ्यांना तूर बियाणे, ट्रायकोडर्मा, टॉर्च,भाजीपाला बियाणे किट, सिंचन पाईप, विद्राव्य खते व कीटकनाशकांचे वितरण करण्यात आले.

## महाराष्ट्र कामगार मंडळाच्या गुणवंत कामगार पुरस्कारांची घोषणा

### जिल्ह्यातून संदीप शेंडे, वैशाली अग्निहोत्री आणि माधुरी धर्माळे यांची निवड

**अमरावती/का.प्र.**



महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार २०२४ साठी अंतिम निवड यादी मंगळवारी जाहीर करण्यात आली असून अमरावती जिल्ह्यातून प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी दैनिक पुण्यनगरीचे संदीप शेंडे, तसेच महावितरण विभागातील लालखडी उपकेंद्रात सिनियर टेकनिशियन पदावर कार्यरत माधुरी धर्माळे व विद्युत भवन येथे कनिष्ठ लिपीक पदावर कार्यरत असलेल्या वैशाली अग्निहोत्री यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ अंतर्गत कामगार कल्याण निधी भरणाऱ्या कामगार व कर्मचाऱ्यांनी साहित्य, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा आणि विविध क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. मंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाकडून १६ जून रोजी यासंदर्भातील अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात आली. सन २०२४ साठी राज्यभरातून एकूण ५१ जणांची निवड करण्यात आली आहे.

---

**महाराष्ट्र शासन**
**तहसीलदार, चांदूर बाजार यांचे कार्यालय**
**(जन्म-मृत्यू प्रमाणपत्र)**
Email tah.chandurbz@gmail.com

क्र./स.म.अ./कावी ४३१/२०२६ दिनांक १६.०६.२०२६

**जाहीरनामा**

अर्जदार :- दिलीप दादाराव ढाकुलकर यांच्या आजी चंद्रभागा बापुराव ढाकुलकर, रा.करजगांव,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
- विरुध्द-
गैरअर्जदार :- निबंधक जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत करजगांव ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**याव्दारे गावातील सर्वत्र लोकांना जाहीरपणे कळविण्यात येते की,** दिलीप दादाराव ढाकुलकर यांच्या आजी चंद्रभागा बापुराव ढाकुलकर,रा.करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती **यांनी स्वतःचे आजी दिनांक** ०९.०५.२००२ **चा राहत्या घरी झाला. परंतु त्यांचे जन्माची कार्यालय ग्रामपंचायत करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे नोद करण्यात आली नाही. जन्माची नोंद जन्म मृत्यू कार्यालय ग्रामपंचायत करजगाव पंचायत समिती चांदूर बाजार, जि.अमरावती हददीमध्ये झालेला असल्यामुळे जन्म नोंदणी करण्याबाबतचा अर्ज व ग्रामपंचायत करजगाव यांचा प्रस्ताव या कार्यालयात दाखल केलेला आहे.**

**वरील जन्माची नोंद करुन देण्यास कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस कोणाला काही आक्षेप अथवा हरकती असतील तर त्यांनी जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन १० दिवसाच्या आत आपला आक्षेप अथवा हरकती लेखी स्वरुपात या कार्यालयामध्ये दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप अथवा हरकती ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोद घ्यावी. सदर जाहिरनामा आज दिनांक २१.०६.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी प्रसिध्दी करण्यात येत आहे.**

शिक्का
स्वाक्षरी/-
तहसीलदार
तथा तालुका दंडाधिकारी
चांदूर बाजार

---

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**
**चौकशीची जाहीर नोटीस**

**फेरफार अहवाल/अर्ज क्र.: 139/22/2024**
**सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक - महाराष्ट्र स्टेट वेटरन अक्वॅटिक असोसिएशन, अमरावती, एफ- ५८१२**
**अर्जदार - श्री संजय श्रीकृष्णराव शेळके**
**गैरअर्जदार - १. श्री शरदकुमार नारायणराव जाधव**
**२. सौ.सुनिता दत्तात्रय वाकचोर**

या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, मा.सहायक धर्मादाय आयुक्त-१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहे.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-१, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १२.०५.२०२६ रोजी दिली.

शिक्का
**सही/-**
**अधीक्षक,**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**अमरावती विभाग, अमरावती**

---

**महाराष्ट्र शासन**
**तहसीलदार, चांदूर बाजार यांचे कार्यालय**
**(जन्म-मृत्यू प्रमाणपत्र)**
Email tah.chandurbz@gmail.com

**क्र./स.म.अ./कावी ४३४/२०२६** **दिनांक १७.०६.२०२६**

**जाहीरनामा**

**अर्जदार :- शिल्पत मारोतराव नवले, रा.खरवाडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**
**- विरुध्द-**
**गैरअर्जदार :- निबंधक जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत खरवाडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**

याव्दारे गावातील सर्वत्र लोकांना जाहीरपणे कळविण्यात येते की, **शिल्पत मारोतराव नवले,रा.खरवाडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** यांनी त्यांच्या आईचे मृत्यू दिनांक **०५.०८.२०१०** त्यांच्या राहत्या घरी झाला. परंतु त्यांचे मृत्यूची कार्यालय ग्रामपंचायत खरवाडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे नोद करण्यात आली नाही. मृत्यू नोंद जन्म मृत्यू कार्यालय ग्रामपंचायत खरवाडी पंचायत समिती चांदूर बाजार, जि.अमरावती हददीमध्ये झालेला असल्यामुळे मृत्यू नोंदणी करण्याबाबतचा अर्ज व ग्रामपंचायत खरवाडी यांचा प्रस्ताव या कार्यालयात दाखल केलेला आहे.

वरील जन्माची नोंद करुन देण्यास कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस कोणाला काही आक्षेप अथवा हरकती असतील तर त्यांनी जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन १० दिवसाच्या आत आपला आक्षेप अथवा हरकती लेखी स्वरुपात या कार्यालयामध्ये दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप अथवा हरकती ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोद घ्यावी. सदर जाहिरनामा आज दिनांक १७.०६.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी प्रसिध्दी करण्यात येत आहे.

शिक्का
स्वाक्षरी/-
तहसीलदार
तथा तालुका दंडाधिकारी
चांदूर बाजार

---

**कामगार न्यायालय, अमरावती**
**श्री.ग.वि.देशपांडे, न्यायाधीश, कामगार न्यायालय, अमरावती**

जावक क्र.४०७/२०२६
**कामगार न्यायालय, अमरावती**
**जिल्हा व सत्र न्यायालय, जुनी ईमारत**
**दुरध्वनी क.०७२१-२६६२२०२**
दिनांक १७.०६.२०२६

वकील - एम.के.रोकडे

**केस नंबर डब्ल्यूसीए अ ०५/२०२६** **पुढील तारीख २९.०७.२०२६**

**अर्जदार :** Samiksha Raghuvirsingh Bais

**-- विरुध्द --**

**प्रतिवादी :** Nil

इस सुचना के द्वारा अवगत किया जाता है कि, उपर दिए गए आवेदकने **Raghuvir Kamalsingh Bais** का काम करते समय **दि.०२.०३.२०२६** को दुर्घटना से निधन हो गया और उनके निधन के पश्चात यह सब आवेदक इनके कानुनन वारिस है और इस न्यायालय में अर्जी दाखील किए है. इस कंपनीने रक्कम धनादेश के द्वारा श्रमिक भरपाई आयुक्त, अमरावती में जमा किया गया है. नुकसान भरपाई की रक्कम **रु.१७,६२,०३६/- (सतरा लाख बासस्ट हजार छत्तीस मात्र)** इतनी रकम उपरोक्त आवेदक ने श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालय अमरावती में जमा की गयी उनको वितरण करने के लिए अर्जी दाखील की है.

अतः इस सुचना तहत अवगत किया जाता है, कि इस न्यायालय में जमा की गयी नुकसान भरपाई रकम फावेदको को प्रदान करने पर अगर किसी भी वा व्यक्तियों को आपत्ती है या उसे विरोध है तो उस प्रकार की सुचना प्रकाशित होने के ३० दिन के भीतर न्यायालयमें दाखल करे. ३० दिन की अवधी समाप्त होने के पश्चात प्राप्त विरोध या सूचना पर विचार नही किया जाएगा. इससे संबंधित लोग ध्यान रखे.

सुनवाई की तारीख २९.०७.२०२६
शिक्का
आदेशानुसार,
**न्यायालय लिपिक,**
**कामगार न्यायालय,**
**अमरावती**

---

**कामगार न्यायालय, अमरावती**
**श्री.ग.वि.देशपांडे, न्यायाधीश, कामगार न्यायालय, अमरावती**

जावक क्र.४०५/२०२६
**कामगार न्यायालय, अमरावती**
**जिल्हा व सत्र न्यायालय, जुनी ईमारत**
**दुरध्वनी क.०७२१-२६६२२०२**
दिनांक १७.०६.२०२६

वकील - एम.के.रोकडे

**केस नंबर डब्ल्यूसीए अ ०५/२०२६** **पुढील तारीख २९.०७.२०२६**

**अर्जदार :** Shashikala Raghuvirsingh Bais

**-- विरुध्द --**

**प्रतिवादी :** Nil

इस सुचना के द्वारा अवगत किया जाता है कि, उपर दिए गए आवेदकने **Raghuvir Kamalsingh Bais** का काम करते समय **दि.०२.०३.२०२६** को दुर्घटना से निधन हो गया और उनके निधन के पश्चात यह सब आवेदक इनके कानुनन वारिस है और इस न्यायालय में अर्जी दाखील किए है. इस कंपनीने रक्कम धनादेश के द्वारा श्रमिक भरपाई आयुक्त, अमरावती में जमा किया गया है. नुकसान भरपाई की रक्कम **रु.१७,६२,०३६/- (सतरा लाख बासस्ट हजार छत्तीस मात्र)** इतनी रकम उपरोक्त आवेदक ने श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालय अमरावती में जमा की गयी उनको वितरण करने के लिए अर्जी दाखील की है.

अतः इस सुचना तहत अवगत किया जाता है, कि इस न्यायालय में जमा की गयी नुकसान भरपाई रकम फावेदको को प्रदान करने पर अगर किसी भी वा व्यक्तियों को आपत्ती है या उसे विरोध है तो उस प्रकार की सुचना प्रकाशित होने के ३० दिन के भीतर न्यायालयमें दाखल करे. ३० दिन की अवधी समाप्त होने के पश्चात प्राप्त विरोध या सूचना पर विचार नही किया जाएगा. इससे संबंधित लोग ध्यान रखे.

सुनवाई की तारीख २९.०७.२०२६
शिक्का
आदेशानुसार,
**न्यायालय लिपिक,**
**कामगार न्यायालय,**
**अमरावती**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७९८/२०२६
**श्रीमती वनिता अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.१९.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Vanita Madhukar Dongare, Age 54 Yrs. Occu.: Household
2. Shubham Madhukar Dongare, Age 30 Yrs. Occu.: Labour
   1 & 2 R/o Kishor Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati
3. Priyanka Kranti Dhok, Age 31 Yrs. Occu.: Household
   R/o Hanuman Nagar, Nagpur, Tq. Dist. Nagpur

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत नर्मदा तुळशिराम डोंगरे** हे दिनांक 09.01.2010 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **वनिता अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **वनिता अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९२२/२०२६
**श्री.दुर्योधन अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.१६.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Duryodhan Dnyaneshwar Patil, Age 36 Yrs. Occu.: Farmer
   R/o Ganoja, Tq.Chandur Bazar, Dist. Amravati.
2. Amardip Arunrao Patil, Age 34 Yrs. Occu.: Farmer
   R/o Pusda, Tq. Dist. Amravati
3. Prabha Subhash Chaware, Age 62 Yrs. Occu.: Household
   R/o Mozari, Tq. Tiosa, Dist. Nagpur

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत कलुबाई @ कलावती अर्जुन बोरकर** हे दिनांक 09.01.2010 रोजा पुसदा, **ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **दुर्योधन अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **दुर्योधन अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**कामगार न्यायालय, अमरावती**
**श्री.ग.वि.देशपांडे, न्यायाधीश, कामगार न्यायालय, अमरावती**

जावक क्र.४०९/२०२६
**कामगार न्यायालय, अमरावती**
**जिल्हा व सत्र न्यायालय, जुनी ईमारत**
**दुरध्वनी क.०७२१-२६६२२०२**
दिनांक १७.०६.२०२६

वकील - एम.के.रोकडे

**केस नंबर डब्ल्यूसीए अ ०५/२०२६** **पुढील तारीख २९.०७.२०२६**

**अर्जदार :** Sejal Raghuvirsingh Bais

**-- विरुध्द --**

**प्रतिवादी :** Nil

इस सुचना के द्वारा अवगत किया जाता है कि, उपर दिए गए आवेदकने **Raghuvir Kamalsingh Bais** का काम करते समय दि.०२.०३.२०२६ को दुर्घटना से निधन हो गया और उनके निधन के पश्चात यह सब आवेदक इनके कानुनन वारिस है और इस न्यायालय में अर्जी दाखील किए है. इस कंपनीने रक्कम धनादेश के द्वारा श्रमिक भरपाई आयुक्त, अमरावती में जमा किया गया है. नुकसान भरपाई की रक्कम रु.१७,६२,०३६/- (सतरा लाख बासस्ट हजार छत्तीस मात्र) इतनी रकम उपरोक्त आवेदक ने श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालय अमरावती में जमा की गयी उनको वितरण करने के लिए अर्जी दाखील की है.

अतः इस सुचना तहत अवगत किया जाता है, कि इस न्यायालय में जमा की गयी नुकसान भरपाई रकम फावेदको को प्रदान करने पर अगर किसी भी वा व्यक्तियों को आपत्ती है या उसे विरोध है तो उस प्रकार की सुचना प्रकाशित होने के ३० दिन के भीतर न्यायालयमें दाखल करे. ३० दिन की अवधी समाप्त होने के पश्चात प्राप्त विरोध या सूचना पर विचार नही किया जाएगा. इससे संबंधित लोग ध्यान रखे.

सुनवाई की तारीख २९.०७.२०२६
शिक्का
आदेशानुसार,
**न्यायालय लिपिक,**
**कामगार न्यायालय,**
**अमरावती**

---

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन** - जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुजी, मौजे मुऱ्हा बु. येथील भूमापन गट नं.१०१ याचे एकुण क्षेत्र ०० हे.९८ आर यापैकी लिहून देणार **१) विनोद महादेव पांडे** यांचे मालकीचे क्षेत्र ०० हे.९८ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वादद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अमरावती
दिनांक १७.०६.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
ॲडव्होकेट के.डी.शिराळे,
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

---

**जाहीर नोटीस**

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.३५१/२०२६ ने.ता.२३.०६.२०२६

**अर्जदार -**
१. मोहम्मद अय्युब कचरु मोहम्मद, वय ५९ वर्षे, धंदा - मजुरी
२. मोहम्मद इकबाल मोहम्मद कचरु, वय ५७ वर्षे, धंदा - मजुरी
३. मोहम्मद युनूस कचरु मोहम्मद, वय ५३ वर्षे, धंदा - मजुरी
   सर्व रा.मोर्शी ता.मोर्शी, जि.अमरावती
४. नाजेमाबी जमील अहेमद, वय ५१ वर्षे, धंदा - घरीकाम
   रा.अंबाडा. ता.मोर्शी, जि.अमरावती
५. सलमा बी मोहम्मद मोहसीन, वय ५० वर्षे, धंदा - घरकाम
   रा.पाळा, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदारचे वडील **कचरु मोहम्मद रंगारी नूर मोहम्मद रंगारी** हे दि.**२०.११.२०११** रोजी **मोर्शी,** ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १३.०५.२०२६

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

**जाहीर नोटीस**

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.३५१/२०२६ ने.ता.२३.०६.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती अनुसया झोलाजी इंगळे, वय ८२ वर्षे, धंदा - घरकाम
२. श्री.नरेंद्र झोलाजी इंगळे, वय ५३ वर्षे, धंदा - शेती
   दोघेही रा.इशमपूर, पो.नया वाठोडा, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. सौ.कल्पना नंदू चोपडे, वय ५७ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.देलवाडी, ता.आष्टी, जि.वर्धा

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडील **झोलाजी नागोजी इंगळे** हे दि.**१४.११.२०२४** रोजी **हाशमपूर,** ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १६.०६.२०२६

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## शांतता नांदणार?

पश्चिम आशियातील प्रदीर्घ आणि विनाशकारी संघर्ष संपुष्टात आणण्याच्या दृष्टीने अमेरिका आणि इराण यांच्यात ६० दिवसांची शस्त्रसंधी करणाऱ्या प्राथमिक करारावर शुक्रवारी स्वित्झर्लंड येथील जिनेव्हा येथे अधिकृत स्वाक्षरी होण्याची शक्यता आहे. जागतिक शांततेसाठी आणि विशेषतः जागतिक अर्थव्यवस्थेसाठी यातील सर्वांत मोठी बाब म्हणजे होर्मुझची सामुद्रधुनी कोणत्याही अडथळ्यांशिवाय व्यापारी वाहतुकीसाठी खुली होणार आहे. परिणामी, खनिज तेल आणि वायूचा पुरवठा सुरळीत होऊन अर्थचक्र पुन्हा गतिमान होईल. भारतासारख्या प्रचंड मोठ्या इंधन आयातदार देशासाठी याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कराराच्या घोषणेनंतर कच्च्या तेलाच्या भावात ७ ते ८ टक्के घसरण झाली. जगभरातील भांडवली बाजारांप्रमाणेच भारतीय शेअर बाजारही वधारला; पण अद्यापही गुंतवणूकदार सावध भूमिकेत आहेत. कारण, इराण आणि अमेरिकाच्या नेत्यांकडून केली जाणारी विधाने. 'सीएनएन'ला दिलेल्या मुलाखतीत अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हान्स यांनी म्हटले आहे की, इराणवर लादलेल्या निर्बंधांमध्ये अमेरिका किंवा आमच्या आखाती मित्रराष्ट्रांनी अद्याप कोणतीही सूट दिलेली नाही. तसेच इराणची गोठवलेली अब्जावधी डॉलर्सची संपत्तीदेखील जारी केलेली नाही. भविष्यात इराणने मसुद्यातील सर्व अटी पूर्ण केल्या, तरच त्यांना निर्बंधांतून मोठी सवलत मिळू शकते. करारातील अनेक तांत्रिक आणि महत्त्वाचे मुद्दे अजून निश्चित झालेले नाहीत आणि आगामी ६० दिवसांच्या वाटाघाटींमध्ये त्यावर अंतिम निर्णय घेतला जाईल. डोनाल्ड ट्रम्प यांनीही हीच भूमिका मांडली. अमेरिकेतील रिपब्लिकन नेत्यांनी या कराराला पूर्णपणे मान्यता दिलेली नाही. या शांतता करारातून अमेरिकेला नेमका काय फायदा होणार, इराणला कोणत्या सवलती मिळतील आणि भविष्यात याचे संभाव्य राजकीय व सुरक्षाविषयक परिणाम काय असू शकतात, या गोष्टी त्यांना जाणून घ्यायच्या आहेत. इराणमधील कट्टरपंथी गटही या करारावर नाराज आहेत. अधिक कठोर भूमिका घ्यायला हवी होती, असे त्यांना वाटते. अनेक महत्त्वाचे मुद्दे अनिर्णित असल्यामुळे होर्मुझमधील संकट टळले आहे, असे मानण्यास जग तयार नाही. इस्रायलचा सहभाग नसणे ही या कराराची सर्वांत मोठी उणीव. लेबनॉनमधील युद्ध थांबवून या प्रदेशात शांतता प्रस्थापित करण्याचे अभिवचन देण्यास इस्रायल बिलकूल तयार नाही. त्यामुळे शुक्रवारनंतरच्या ६० दिवसांच्या कालावधीत इस्रायलची कोणतीही आक्रमक कारवाई या शांतता कराराला सुरुंग लावू शकते. खरे म्हणजे, इस्रायल हाच या खेळातील मुख्य खेळाडू आहे. फेब्रुवारीच्या अखेरीस सुरू झालेल्या या संघर्षाची बीजे ऑक्टोबर २०२३ मध्ये हमास या संघटनेकडून इस्रायलवर झालेल्या भीषण हल्ल्यामध्ये दडलेली आहेत. इराण-इस्रायल शत्रुत्वाला प्रदीर्घ इतिहास असून तो बहुकोनीय आहे. तथापि, इराण अण्वस्त्रांचा कार्यक्रम पूर्णपणे बंद करणार आहे, ही इस्रायलसाठी सर्वांत महत्त्वाची बाब आहे, अन्यथा ते कधीही उद्ध्वस्त होण्याचा धोका होता, असे सांगत ट्रम्प यांनी बेंजामिन नेतान्याहूंच्या नकाराला कस्पटासमान लेखले. अर्थात, तसे करणे ही त्यांची राजकीय गरज आणि अपरिहार्यता आहे. कारण, ट्रम्प यांना कोणत्याही परिस्थितीत या संघर्षातून बाहेर पडायचे आहे. अत्यंत आक्रमकपणे त्यांनी या युद्धात उडी घेतली होती; परंतु केवळ लष्करी बळावर इराण जिंकणे अशक्य असल्याचे वास्तव त्यांना अंतिमतः स्वीकारावेच लागले. जागतिक महासत्ता म्हणून अमेरिकेची ही सर्वांत मोठी नामुष्की आहे. ती लपवण्यासाठी ट्रम्प आता 'इराण झुकला' अशा पोस्ट करत आहेत. यातून त्यांना आत्मसमाधान लाभत असेलही; पण गेल्या १०० हून अधिक दिवसांत इराणचा सर्वनाश करण्याच्या धमक्या त्यांनी किती वेळा दिल्या आणि त्यानंतर इराणने त्यातील हवा कशी काढून घेतली हे जगाने पाहिले. इराणकडून झालेला ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर आणि असिमेट्रिकल वॉरफेअर पाहता आताच्या युगात कोणतेही युद्ध पारंपारिक पद्धतीने पूर्णपणे जिंकणे जगातील महासत्तेलाही शक्य नाही, हे स्पष्ट झाले आहे. म्हणूनच प्रत्यक्ष युद्धाच्या मैदानावरील हिंसेपेक्षा टेबलवरील चर्चा आणि राजनैतिक तडजोड हाच पश्चिम आशियात शांतता राखण्याचा एकमेव शाश्वत मार्ग असल्याची उपरती ट्रम्प यांना झाली. ओपन सोर्स इंटेलिजन्स, अल अरेबिया आणि जेरुसलेम पोस्टच्या संयुक्त अहवालानुसार इराणचे या संघर्षात सुमारे १४० ते १४५ अब्ज डॉलरचे आर्थिक नुकसान झाले. अडीच हजारांहून अधिक सैनिक व नागरिक ठार झाले. इराणमधील एक लाखाहून अधिक निवासी घरे आणि २३ हजार ५०० व्यावसायिक आस्थापने नष्ट झाली. पेंटागॉनच्या अधिकृत आकडेवारीनुसार, अमेरिकेला ५८ अब्ज डॉलरचा थेट लष्करी फटका बसला; मात्र सीएसआयएस आणि अर्थतज्ज्ञांच्या मते हा एकूण खर्च २०० अब्ज डॉलरहून अधिक आहे. हा खर्च डोईजड होत चालल्यामुळेच ट्रम्प यांना युद्धातून सन्मानजनक एक्झिट हवी होती. प्रत्यक्षात जागतिक राजकारणातील सर्वांत मोठे सौदेबाज म्हणून शेखी मिरवणाऱ्या ट्रम्प यांची इराणसोबतच्या करारातील अगतिकता बरेच काही सांगून जाणारी ठरली. इराणने होर्मुझवर ताबा मिळवल्यामुळे आखाती देशांतील व्यापारी जहाजांची वाहतूक ठप्प झाली होती. युद्धापूर्वी या मार्गावरून दररोज १०० जहाजे जात असत; मात्र १८ मे ते ७ जून २०२६ या २० दिवसांत केवळ १२७ जहाजेच या मार्गावरून प्रवास करू शकली. या तणावामुळे ब्रेंट क्रूड तेलाचे दर प्रतिबॅरेल ८० डॉलरवरून थेट १०० डॉलरच्या पार गेले आणि आशिया खंडात मोठे ऊर्जा संकट उभे राहिले. याचा परिणाम म्हणजे, जागतिक बँकेने जगातील दोन तृतीयांश देशांच्या विकासदराचा अंदाज घटवला. यामुळे सर्वच देश हा संघर्ष कायमचा थांबावा आणि तेलवाहू जहाजांची वाहतूक पूर्ववत व्हावी, यासाठी प्रयत्नशील होते. प्राथमिक कराराने ही अपेक्षा पूर्ण होताना दिसत आहे; पण अनेक गंभीर आणि गुंतागुंतीचे मुद्दे अनिर्णीत आहेत, ही यातील चिंतेची बाजू आहे. इराणने युरेनियमचे शुद्धीकरण थांबवण्यास स्पष्ट नकार दिला, तर आर्थिक निर्बंध पूर्णपणे उठवण्याच्या प्रक्रियेत पुन्हा अडथळे येऊ शकतात. याशिवाय, हिजबुल्ला आणि हमास यांसारख्या इराणच्या छुप्या सशस्त्र संघटनांना हिंसेचा मार्ग सोडायला लावणे आणि त्यांना राजकीय मुख्य प्रवाहात आणणे हे अमेरिकेसमोरील मोठे आव्हान असेल. इस्रायलनेही या शांतता प्रक्रियेला सकारात्मक प्रतिसाद द्यावा आणि संपूर्ण प्रदेशात स्थैर्य प्रस्थापित व्हावे, हीच जगाची अपेक्षा आहे. 'साठा उत्तराची कहाणी' ही अपेक्षा सुफळ संपूर्ण करणार का, हे पाहायचे!

# शेतकऱ्यांना कायमचे कर्जमुक्त करणे का शक्य होत नाही?

**कर्जमाफी नको, कर्जापासून मुक्ती द्या! कर्जमाफी म्हणजे शेतकऱ्यावर उपकार नाही, ती एक राजकीय भूल आहे. खरा उपाय म्हणजे कर्जमुक्ती आणि ती येते फक्त शाश्वत उत्पन्न, कमी खर्च आणि बळकट पायाभूत सुविधांच्या विकासातूनच.**

महाराष्ट्र सरकारने नुकतीच ३६,५८५ कोटी रुपयांची शेतकरी कर्जमाफी जाहीर केली. राज्यभर जल्लोष झाला, नेत्यांनी स्वत:च स्वत:ची पाठ थोपटून घेतली. पण हा जल्लोष ओसरण्याआधीच एक प्रश्न विचारायला हवा- हे उपकार आहेत की निवडणुकीपूर्वीची भावनिक लाच? कारण ही घोषणा नवीन नाही. गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्रात तीन वेळा कर्जमाफी झाली. २०१७ मध्ये ३४,०००कोटी, २०१९ मध्ये २०,००० कोटी आणि आता ३६,५८५ कोटी. म्हणजे दहा वर्षांत जवळपास ९० हजार कोटींहून अधिक फक्त कर्जमाफीत उधळले. आणि तरीही शेतकरी सुखी झाला का?

एनसीआरबीच्या नोंदीनुसार, १९९५ ते २०२३ या २८ वर्षांत भारतात ३.९ लाखांहून अधिक शेतकरी व शेतमजुरांनी आत्महत्या केल्या. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील आत्महत्यांचा दर राष्ट्रीय सरासरीपेक्षा अडीच पट अधिक आहे. २०२३ मध्ये देशभरात १०,७८६ शेतकरी व शेतमजुरांनी आत्महत्या केल्या. यापैकी ३८.५ टक्के म्हणजे सर्वाधिक प्रकरणे एकट्या महाराष्ट्रातल होती. म्हणजे महाराष्ट्रात रोज ११ शेतकरी आयुष्य संपवतात. एकट्या मराठवाड्यात २०२३ मध्ये १,०८८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. बीड जिल्ह्यात २६९ मृत्यू नोंदवले गेले. हे कुणाचे बाप होते तर कुणाचे भाऊ होते. या पार्श्वभूमीवर प्रश्न पडतो की दहा वर्षांत ९० हजार कोटी कर्जमाफीत गेले, तरी हे आकडे का कमी झाले नाहीत?

### कर्जमाफी : न संपणारे दुष्टचक्र

'आउटलूक इंडिया'च्या एका अहवाला नुसार २०१७ च्या ३४,००० कोटी कर्जमाफीत पहिल्या वर्षी केवळ २२ टक्के शेतकऱ्यांनाच लाभ मिळाला, कारण वगळण्याच्या चुका झाल्या. ज्यांना खरोखर गरज होती त्यांची नावे यादीतच नव्हती. 'कॅग'च्या अहवालानुसार, २००८ च्या देशव्यापी कर्जमाफीतील जवळपास निम्मी रक्कम अपात्र शेतकऱ्यांकडे गेली. म्हणजे भ्रष्टाचार, गळती आणि राजकीय पक्षपात हे कर्जमाफीचे अटळ साथीदार आहेत.

इंडिया रेटिंग्सच्या मते, २०१७ मध्ये ३०,००० कोटींच्या कर्जमाफीमुळे महाराष्ट्राचा वित्तीय तोटा उएअ्ज च्या १.५३ टक्क्यांवरून थेट २.७ टक्क्यांवर जाण्याचा धोका निर्माण झाला. म्हणजे हे पैसे कुठून येतात? रस्ते, दवाखाने, शाळा यांच्या भांडवली खर्चाला कात्री लावून. थोडक्यात शेतकऱ्याचे कर्ज माफ करताना, त्याच्या मुलाची शाळा, त्याच्या गावाचा रस्ता आणि त्याच्यासाठीचा दवाखाना आपण मागे ढकलत असतो.

### शेतकरी कर्जात का बुडतो?

बीटी कापसाच्या प्रसारानंतर शेतकऱ्यांचा निविष्ठा खर्च प्रचंड वाढला आणि उत्पादनाचे आश्वासन पोकळ ठरले. वाढता खर्च आणि अनिश्चित उत्पन्न यामुळे शेतकरी कर्जाच्या विळख्यात अडकला. भारताची धान्य उत्पादकता प्रति हेक्टर ३.५ मेट्रिक टन आहे, तर चीनची ६.३ आणि ब्राझीलची ४.९ मेट्रिक टन. दर्जेदार बियाणे वेळेवर न मिळणे, यंत्रसामग्रीचा अभाव आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा कमी वापर यामुळे उत्पादकता कमी राहते. सहा महिने राब राब राबून शेतकरी माल पिकवतो. पण साठवण नाही, वाहतूक नाही, थेट बाजार नाही. दलाल आणि व्यापारी मधोमध उभे असतात. शेतकरी घाम गाळतो, नफा दुसऱ्याच्या खिशात जातो.

जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्रख्यात अर्थतज्ज्ञ प्रभात पटनाईक यांनी या प्रश्नाचे मूळ अनेक वर्षांपूर्वीच सांगितले होते. प्रभात पटनाईक यांच्या मते, किमान आधारभूत किंमत (एमएसपी), सरकारी खरेदी आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे कमकुवत होणे शेतकऱ्यांच्या असुरक्षिततेचे एक महत्त्वाचे कारण आहे. पटनाईक यांनी स्पष्टपणे सांगितले की, विकसित देश भारतासारख्या परिघावरील देशांनी अन्नधान्यातील स्वयंपूर्णता सोडावी असे डब्ल्यूटीओच्या माध्यमातून सांगत आहेत, कारण स्वतःच्या अतिरिक्त उत्पादनाला बाजार हवा आहे. थोडक्यात, हा केवळ आर्थिक प्रश्न नाही हा साम्राज्यवादी बाजारपेठेचा



राजकीय डाव आहे, असे पटनाईक सांगतात.

### डब्ल्यूटीओचा सापळा : नियम सारखे, न्याय वेगळा

डब्ल्यूटीओच्या कृषी करारानुसार शेती अनुदानाचे वर्गीकरण केले जाते. 'अॅम्बर बॉक्स' म्हणजे उत्पादनाशी थेट निगडित अनुदाने जी व्यापार-विकृत मानली जातात. विकसनशील देशांसाठी ही मर्यादा कृषी उत्पादनाच्या १० टक्के आहे तर विकसित देशांसाठी पाच टक्के आहे. एमएसपी आधारित सार्वजनिक खरेदी देखील याच बॉक्समध्ये मोजली जाते. वरवर हे न्याय्य वाटते. पण वास्तव वेगळे आहे. अमेरिका, युरोप हे पायाभूत सुविधा, संशोधन, विमा, ग्रामीण विकास यावर अब्जावधी डॉलर ओततात. हे डब्ल्यूटीओ मर्यादेबाहेर आहे. लहान शेतकऱ्यांना मोठ्या कॉर्पोरेट्सशी असमान अटींवर स्पर्धा करण्यास भाग पाडले जात आहे. बाजारपेठेत कॉर्पोरेटचा विस्तार होत असताना सार्वजनिक हिताकडे दुर्लक्ष होते आहे.

पाच टक्के मर्यादा युरोप, अमेरिकेसाठी आणि १० टक्के भारतासाठी हे आकडे न्याय दिसत असले तरी, त्यांच्या मागील आर्थिक वास्तवात प्रचंड तफावत आहे. अमेरिकेचे वार्षिक कृषी उत्पादन सुमारे ५०० अब्ज डॉलर्स असल्याने त्याचे ५ टक्के म्हणजे २५ अब्ज डॉलर्स इतकी मदत अमेरिकेच्या एकूण लोकसंख्येच्या दोन टक्के शेतकरी लोकसंख्येवर खर्च होते. त्यामुळे प्रति शेतकरी सरासरी मदत साडेबारा हजार डॉलर्सपर्यंत पोहोचते. दुसरीकडे, भारताचे कृषी उत्पादन सुमारे ५५० अब्ज डॉलर्स असल्याने त्याचे १० टक्के म्हणजे ५५ अब्ज डॉलर्स इतकी मदत देशातील ४०-४५ टक्के लोकसंख्येशी निगडित असलेल्या प्रचंड शेतकरी वर्गात विभागली जाते. परिणामी प्रति शेतकरी सरासरी मदत केवळ ४५८ डॉलर्स इतकी राहते, जी अमेरिकेतील शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मदतीच्या तीन टक्क्यांपेक्षाही कमी आहे.

### भारत कुठे मागे आहे?

भारत खरोखर कुठे मागे आहे, तर ते 'ग्रीन बॉक्स' गुंतवणुकीत. डब्ल्यूटीओच्या नियमांनुसार पायाभूत सुविधा, सिंचन, संशोधन, तंत्रज्ञान, साठवणूक आणि कृषी विस्तार सेवांवरील खर्चाला कोणतीही मर्यादा नाही. तरीही भारत अशा 'ग्रीन बॉक्स' उपायांवर केवळ २.६६ अब्ज डॉलर्स खर्च करतो. याउलट अमेरिका अशाच प्रकारच्या गुंतवणुकीवर १०० अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक खर्च करते. त्यामुळे अमेरिकेतील शेतकऱ्यांना थेट आणि अप्रत्यक्ष अशा दोन्ही प्रकारच्या सहाय्याचा मोठा लाभ मिळतो. एकूण कृषी सहाय्याचा विचार केला तर अमेरिकेत प्रति शेतकरी खर्च सुमारे ७०,५०० डॉलर्स आहे, तर भारतात तो केवळ ४६८ डॉलर्स इतकाच आहे. त्यामुळे समस्या केवळ डब्ल्यूटीओच्या ५-१० टक्के मर्यादेची नसून, उपलब्ध आणि अमर्यादित 'ग्रीन बॉक्स' गुंतवणुकीचा पुरेसा वापर न करण्याची आहे.

केंद्र सरकारने कृषी खर्च २००८-०९ मधील ११,९१५ कोटींवरून २०२४-२५ मध्ये १,२२,५२८ कोटींवर नेला आहे, पण त्यातील ७३ टक्क्यांहून अधिक रक्कम सबसिडी आणि कल्याणकारी योजनांवर खर्च होते पायाभूत सुविधांवर नव्हे. उलट, 'कृषी अभ्यास फाउंडेशन'चा अहवाल सांगतो की, २०२२-२३ मध्ये खताची सबसिडी २.५ लाख कोटींवरून थेट १.६ लाख कोटींवर आणली गेली. अन्न सबसिडी २.७ लाख कोटींवरून २ लाख कोटींवर घटवली गेली. म्हणजे एकीकडे कर्जमाफीचा डंका पिटायचा आणि दुसरीकडे खतावरचे अनुदान चुपचाप कमी करायचे हा दुटप्पीपणा नाही का?

### कर्जमुक्तीकडे वाटचाल

शेतकरी कर्जात अडकण्याचे प्रमुख कारण म्हणजे वाढता उत्पादन खर्च.बियाणे, खते, कीटकनाशके आणि सिंचन यासाठी मोठी गुंतवणूक करावी लागते, तर उत्पन्न मात्र अनिश्चित असते. त्यामुळे उत्पादन खर्च कमी करणाऱ्या आणि आवश्यक निविष्ठा परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देणाऱ्या धोरणांना प्राधान्य देणे गरजेचे आहे.दरवर्षी हजारो शेतकरी बनावट आणि निकृष्ट बियाण्यांमुळे आर्थिक नुकसान सहन करतात. खर्च बुडतो आणि कर्ज वाढते. त्यामुळे भेसळयुक्त बियाण्यांच्या उत्पादन व विक्रीविरुद्ध कठोर अंमलबजावणी, दंडात्मक कारवाई आणि जबाबदारी निश्चित करणे अत्यावश्यक आहे. शेतकरी माल पिकवतो; पण योग्य साठवणुकीची सुविधा नसल्याने भाव पडल्यावर विक्री करणे सक्तीचे ठरते. कांदा, टोमॅटो आणि इतर नाशवंत पिकांमध्ये हे चित्र वारंवार दिसून येते. शीतगृहे, गोदामे, प्रक्रिया केंद्रे आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना बळकटी दिल्यास शेतकऱ्यांची बाजारात घासाघीस करण्याची क्षमता वाढू शकते आणि त्याला योग्य वेळी माल विकण्याचा पर्याय उपलब्ध होऊ शकतो.

शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत महत्त्वाची असली, तरी संशोधन, तंत्रज्ञान, सिंचन, पायाभूत सुविधा आणि सहकारी संस्थांमधील गुंतवणूक अधिक परिणामकारक ठरते. अशा गुंतवणुकीमुळे उत्पादकता वाढते, खर्च कमी होतो आणि उत्पन्न अधिक स्थिर राहते. त्यामुळे कर्जमाफीच्या चक्रात अडकण्याऐवजी शेतकऱ्याला स्वावलंबी करणाऱ्या उपायांवर भर देणे आवश्यक आहे.

### अर्थशास्त्रापेक्षा माणुसकी महत्त्वाची

२०२३ मध्ये आत्महत्या केलेल्यांपैकी ६६.२ टक्के लोकांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा कमी होते. म्हणजे महिन्याला ९,००० रुपयांपेक्षा कमी. या शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली काय किंवा न दिली काय उद्या सकाळी त्याला पुन्हा उठून पेरायचे आहे. पुन्हा खत लागेल, पुन्हा बियाणे लागेल, पुन्हा पाणी लागेल. कर्जमाफी म्हणजे आज रात्री भूक भागवण्यासाठी घरात डाळ आणण्यासारखे आहे. पण उद्यासाठी शेत नांगरणे, पिकाला पाणी देणे, बाजारात न्याय्य भाव मिळवणे यासाठी कर्जमाफी उपयोगाची नाही.

शेतकरी विशेष सवलत मागत नाही. तो फक्त एक न्याय्य संधी मागतो. पण जेव्हा खत घेणे आणि मुलाचे शाळेचे शुल्क भरणे यातून एकच निवडायची वेळ येते आणि दोन्ही हातचे जाते तेव्हा ती व्यवस्थेची शोकांतिका आहे.

### कर्जमाफी नको, कर्जमुक्ती द्या

महाराष्ट्रात गेल्या दशकात तीनदा कर्जमाफी दिली गेली- एकत्रित ९० हजार कोटींहून अधिक. तरीही दर पाच वर्षांनी नवीन मागणी येते कारण ही व्यवस्था कायमस्वरूपी होत चालली आहे. जोपर्यंत आपण खर्च कमी करणे, दर्जेदार बियाणे मोफत देणे, भेसळखोरांवर कठोर कारवाई, शीतगृहांची साखळी उभारणे, थेट बाजार व्यवस्था, ग्रीन बॉक्स गुंतवणूक वाढवणे या मार्गाने जात नाही, तोपर्यंत कर्जमाफी हा एक न थांबणारा खर्च आहे. प्रश्न पैशांचा नाहीच आहे, प्रश्न प्राधान्यक्रमांचा आहे. शेतकऱ्याचे जुने कर्ज पुसायचे की त्याला कायमचे कर्जमुक्त करायचे हा प्रश्न आहे? कर्जमाफी निवडणुका जिंकवून देऊ शकते पण कर्जमुक्ती राष्ट्र घडवते. आता प्रश्न हाच आहे निवडणुका जिंकून स्वतःला घडवायचे की शेतकऱ्यांना कर्जापासून मुक्त करून देशाला घडवायचे.

**ॲड. गणेश पंडीत**

## हे तर 'सडक्या' मानसिकतेचे 'उदात्तीकरण'!

सध्या राज्यात इंधन दरवाढ,महागाई, कांदा प्रश्न, शेतक-यांची कर्जमाफी, पेपरफुटी, रस्त्यावरील पांढरे पट्टे आदी विषयांवर विरोधकांनी आंदोलनाचा धडाका उडवला आहे तर दुसरीकडे 'सत्ताधारी' मात्र विधान परिषदेच्या 'गॅनेज' राजकारणात मश्गुल आहेत. हे कमी पडले की काय म्हणून, स्वतःला मोठा विनोदवीर म्हणवून घेणा-या प्रणीत मोरे नावाच्या एका 'विकृत घुबडा'चा एक घाणेरडा व्हिडिओ समाज माध्यमावर प्रचंड व्हायरल झाला. आणि समाजात एकच खळबळ उडाली. अश्लील, बिभत्स हे शब्दही कमी पडतील, अशा या व्हिडिओने 'स्टॅण्डअप कॉमेडी'च्या नावाखाली कसे 'बाजारु' विनोद खपवले जातात, हा घाणेरडा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आणला आहे. हा त्याचा पहिलाच व्हिडिओ नाही. या आधींच्या कार्यक्रमांतही त्याने पाणचट, आणि घाणेरडे विनोद सादर केलेले आहेत. सध्या त्याच्या चर्चे असणा-या व्हिडिओने मात्र बिभत्सपणाचा 'नंगानाच' काय असतो? हेच दाखवून दिले. सेजल पवार नामक या प्रशिक्षित डॉक्टर महिलेने (?) मनुष्याच्या नग्न मृतदेहाचा अभ्यास करताना, आम्ही त्याच्या लिंगाची साईझ आणि इतर गोष्टींवर कसे विनोद करतो, हे शरमेची काडीचीही तमा न बाळगता हास्य करत सांगितले. या विकृत बयेने आपली डॉक्टर होण्याची अजिबात लायकी नाही, हे तर दाखवून दिलेच. पण, महिला जातीला आपण एक कलंक आहोत, हेही सिद्ध केले.

या मोरेला यापूर्वी सोलापूरकरांनी प्रसाद दिला होता. त्याच्यावर याआधीही काही गुन्हे दाखल आहेत. अशा नालायक विनोदविरांना काही बंधने घालायला हवेत. अन्यथा, उद्या विनोद हा अश्लीलतेचा कारखाना होऊ नये, इतकेच. मराठी साहित्यात पु. ल. देशपांडे, प्र. के. अत्रे, चिं. वि. जोशी, वसंत कानेटकर, वि. आ. बुवा, राम गणेश गडकरी, द. मा. मिरासदार, शंकर पाटील आदी महान व दिग्गज लेखकांनी मराठी साहित्यात आपल्या निर्मळ आणि उपरोधिक विनोदाने वाचकांना खळखळून हसवलेले आहे. या लेखकांनी मराठी विनोदी साहित्याला समृद्ध केले आहे. पुढच्या पिढीला या समृद्ध साहित्याऐवजी या नालायकांचे अश्लील आणि बिभत्स विनोद ऐकायला लागू नये हीच अपेक्षा.

**प्रदीप खोलमकर, नाशिक**
मो-८७६७५९२९८०

## विकासापुढे राजकीय हितसंबंध दुय्यमच हवेत!


पश्चिम बंगालमध्ये झालेल्या सत्तापरिवर्तनानंतर, कोलकाता येथील नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील १३६ वर्षे जुनी 'बांकरा मशीद' सुरक्षेच्या कारणास्तव व धावपट्टीच्या विस्तारासाठी स्थलांतरित करण्याचा ऐतिहासिक निर्णय विमानतळ प्राधिकरणाने घेतला आहे.वास्तविक पाहता, एका आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आत अशा प्रकारे मशीद अस्तित्वात असणे आणि तिथे रोज प्रार्थना चालणे, ही बाब सामान्य भारतीयांसाठी अत्यंत आश्चर्यकारक आहे. ज्या ठिकाणी अत्यंत कडेकोट सुरक्षा असते, तिथे रोज तिन्ही सांजेला लोक प्रार्थना करण्यासाठी जातात, ही वस्तुस्थिती राज्यातील राजकीय सत्तांतरामुळेच पहिल्यांदाच देशवासीयांसमोर आली; अन्यथा हा विषय ...ाच पडद्याआड राहिला असता. विशेष म्हणजे, या अतिसंवेदनशील भागात नमाज पठणासाठी रोज तीन ते चार वेळा नमाजींना विमानतळाच्या मुख्य प्रवेशद्वारावर ओळखपत्र तपासून, कडक सुरक्षा व्यवस्थेत विशेष बसने थेट सरकार खर्चाने आत नेले जात होते. तत्कालीन ममता बॅनर्जी सरकारने ...वळ मतपेढीच्या राजकारणामुळे या गंभीर बाबीवर कधीच ब्र काढला नाही.कोलकाता उच्च न्यायालयाने याबाबत स्पष्ट आदेश देऊनही तत्कालीन राज्य सरकारने त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. मात्र, राज्यात नवे सरकार अस्तित्वात आल्यानंतर तातडीने जमीन उपलब्ध करून देण्यात आली. तसेच लष्करी आणि धोरणात्मक दृष्ट्या अतिसंवेदनशील असलेला 'चिकन नेक' (सिलिगुडी कॉरिडॉर) हा भूभागही सुरक्षेच्या कारणास्तव केंद्र सरकारकडे हस्तांतरित करण्यात आला.हा केवळ एका मशिदीचे स्थलांतर किंवा कुंपण बांधण्याचा विषय नाही, तर 'राष्ट्रीय सुरक्षा आणि देशाचे हित हे कोणत्याही राजकीय फायद्यापेक्षा किंवा धार्मिक तुष्टीकरणापेक्षा नेहमीच सर्वोच्च असले पाहिजे,' हाच स्पष्ट संदेश या घडामोडीतून मिळतो. सत्ता कोणाचीही असो, देशाच्या सुरक्षेपुढे कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, हीच आजच्या काळाची गरज आहे.

**अविनाश देशपांडे**

## बंगालनंतर महाराष्ट्रात पुढे काय?

भारताच्या संसदीय इतिहासात ही पहिलीच घटना आहे. अवघ्या दोन वर्षांपूर्वी निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेला, ज्याचा एकही आमदार, खासदार किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेचा निवडून आलेला प्रतिनिधी नाही, असा एक तसा अपरिचित पक्ष आता सत्ताधारी एनडीए (NDA) आघाडीतील दुसरा सर्वात मोठा पक्ष बनण्याच्या मार्गावर आहे! तब्बल २० खासदार असलेला हा पक्ष! ममता बॅनर्जींच्या टीएमसी (TMC) मधून बाहेर पडून, हे सर्वजण आता एनसीपीआय (NCPI) च्या झेंड्याखाली 'राष्ट्रवादी' (Nationalists) बनले आहेत! या पक्षाचे अध्यक्ष आहेत श्री. उत्तिया कुंडू! एनसीपीआयच्या संस्थापकांनी हे नाव नक्कीच खूप विचारपूर्वक निवडले असणार: 'नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया' (Nationalist Citizens Party of India)!

बंडखोर मानले जाणारे टीएमसीचे खासदार लोकसभेच्या अध्यक्षांना भेटले आहेत आणि त्यांनी या नवीन पक्षाचा संसदीय गट म्हणून मान्यता मिळवण्यासाठी तसेच स्वतंत्र आसनव्यवस्था मिळावी यासाठी औपचारिक विनंती सादर केली आहे!सुदीप बंडोपाध्याय, शताब्दी रॉय, काकोली घोष, युसूफ पठाण आणि सायनी घोष यांसारखे दिग्गज राजकारणी आता ममता बॅनर्जींऐवजी श्री. कुंडू यांच्या नेतृत्वाखाली देशाची आणि विशेषतः बंगालची सेवा करतील! त्यांना



याचे 'फळ' नक्कीच मिळेल.

भाजप आणि एनडीए सरकारच्या वरिष्ठ नेतृत्वाने विशेषतः पंतप्रधान मोदींना यापूर्वीच स्पष्ट केले होते की,जरी १३१ वी घटनादुरुस्ती (मतदारसंघांची पुनर्रचना, महिला आरक्षण इत्यादींशी संबंधित वादग्रस्त विधेयक) यावेळी संसदेत मंजूर होऊ शकली नाही, तरीही 'आम्ही आशा सोडलेली नाही. हा आमचा संकल्प आहे आणि आम्ही तो नक्कीच पूर्ण करू!'

आता महाराष्ट्रात पुढे काय घडते ते पाहूया. कोणास ठाऊक, कदाचित दक्षिणेतही काहीतरी घडू शकेल! अशी चर्चा आहे की तिथेही प्रयत्न सुरू आहेत! जेव्हा समाजात 'लोक' स्वतःच केवळ एका 'यंत्रात' रूपांतरित होत असतात, तेव्हा बिचारी 'लोकशाही' काय करणार?जर लोकच 'यंत्रवत' झाले, तर समाजातील वाढता अंधार कोण दूर करणार? समाजाला चैतन्य कुठून मिळणार?अशा काळात, समाज आणि लोकांना वेढलेला अंधार केवळ काजव्यांच्या प्रकाशाने दूर होणार नाही; त्यासाठी गरज आहे अशा प्रचंड प्रकाशझोतांची (beacons), जे या गडद अंधारात मार्ग दाखवू शकतील!

**-उर्मिलेश**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### विद्यापीठात महाराणा प्रताप जयंती

**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात राष्ट्रगौरव, शूरवीर, महापराक्रमी महाराणा प्रताप यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले.जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, अधीक्षक डॉ. धनंजय पाटील तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.संचालन व महाराणा प्रताप यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.



### सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष?

**खल्लार-** लोतवाडा येथिल बस थांब्याजवळ १७जून रोजी दुपारपासून मुख्य रस्त्यावर बाभूळचे झाड पाडले असून पडलेल्या झाडामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. आज दुसरा दिवस निघूनसुद्धा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षपणामुळे मुख्य रस्त्यावर बाभूळचे झाड तसेच पडून असल्याने या मार्गावरील वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे.




### महाराजा दाहिर सेन यांना हौतात्म्य दिनानिमित्त अभिवादन

**अमरावती-** राजापेठ येथील भाजप कार्यालयात महाराजा दाहिर सेन यांच्या हौतात्म्य दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी भाजप कार्यकर्ते, भारतीय सिंधु सभा आणि भाजप सिनियर सेलच्या पदाधिकाऱ्यांनी महाराजा दाहिर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. 'भारत माता की जय' व 'वंदे मातरम'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ओमप्रकाश सदुभाई पुंशी होते. त्यांनी आपल्या भाषणात सिंधचे शेवटचे हिंदू राजे महाराजा दाहिर सेन यांनी मातृभूमीच्या रक्षणासाठी दिलेल्या बलिदानाचे स्मरण करून त्यांना आदरांजली अर्पण केली.यावेळी तुलसी साधवानी, रमेश टेबरे, शुभम, दीपाली लांडगे, संगीता गायकवाड, सुनील तायडे, राजेश आखेगावकर, प्रणव लांडे, अशोकराव देशमुख, नीलेश चौधरी, राजेश्वर निसातणे, रविराज वाघमारे, संजय आहुजा, गुलशन कुकरेजा आदी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल भारतीय सिंधु सभेच्या वतीने रमेश टेबरे व तुलसी साधवानी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### शिक्षकांनी स्वखर्चाने केली शाळा परिसराची सफाई

**खल्लार-** नजिकच्या वडूरा येथिल जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळेच्या शिक्षकांनी स्वखर्चाने शाळा परिसराची सफाई केली.वडूरा येथिल शाळा परिसरामध्ये मोठ मोठी बंगाली काट्या वाढलेल्या होत्या तसेच शाळेचा अर्धा परिसर हा लहाळ गवतांनी व्यापला होता. यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेच्या बाबतीत प्रश्न निर्माण झालेला होता.यावर उपाय म्हणून येथिल शाळेवरील कार्यरत असलेल्या शिक्षकांच्या आर्थिक मदतीच्या साह्याने शाळा परिसरामध्ये वाढलेल्या मोठमोठ्या बंगाली काट्या व लहाळ गवतांनी व्यापलेला परिसर जेसीबीच्या सहाय्याने साफ करण्यात आला.तसेच अस्ताव्यस्त पडलेल्या जुन्या बांधकामाचा मलमा पाणी साचलेल्या डबक्यात जमा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या आणि शाळेविषयी तळमळ असलेल्या शिक्षकांच्या कामाचे गावात कौतुक होत आहे.

## जुळया शहरातील स्पीड ब्रेकर ठरतायत अपघाताचे कारण

# उघडे पडलेल्या खिळयांमुळे वाहनाचे टायर पंक्चर

## नागरिकांकडून तातडीच्या दुरुस्तीची मागणी

अचलपूर-परतवाडा शहरातील स्पीड ब्रेकरमधील उघडे पडलेले खिळे नागरिकांच्या जीवाशी खेळणारे ठरत आहेत. या खिळ्यांमुळे दुचाकी व चारचाकी वाहनांचे टायर पंक्चर होऊन अपघाताचा धोका वाढला आहे. संबंधित प्रशासनाने याची तातडीने दखल घेऊन धोकादायक स्पीड ब्रेकरची दुरुस्ती करावी. यामुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली आहे.नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने स्थानिक प्रशासनाने ठोस उपाययोजना राबविण्याची गरज आहे.

**-सागर पुरोहित**

**अचलपूर/वार्ताहर**

**अचलपूर-** परतवाडा शहरातील विविध रस्त्यांवर बसविण्यात आलेल्या स्पीड ब्रेकरमधील लोखंडी खिळे व बोल्ट उघडे पडल्याने वाहनचालकांसाठी मोठी डोकेदुखी निर्माण झाली आहे. या उघड्या खिळ्यांमुळे दुचाकी तसेच चारचाकी वाहनांचे टायर पंक्चर होण्याच्या घटना सातत्याने घडत असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

विशेषतः रात्रीच्या वेळी हे खिळे दिसून येत नसल्याने वाहनचालकांना अचानक टायर पंक्चर होण्याचा सामना करावा लागत आहे, अनेक दुचाकीस्वारांचा तोल जाण्याची शक्यता निर्माण होत असून गंभीर अपघाताचा धोका वाढला आहे. वाहनधारकांना टायर दुरुस्तीवर अनावश्यक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. स्थानिक प्रशासकिय अधिकाऱ्यांचे या मार्गावरुन येणे-जाणे नियमित आहे. मात्र हे अधिकारी नागरिकांच्या तक्रारीची वाट पाहत तर नाही ना? काही दिवसापूर्वी



एक दुचाकी चालकाची गाडीच्या टायरमध्ये खिळा जाऊन अडकला. तरी सुध्दा या थोकादायक स्पीड ब्रेकरची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. जुळ्या शहरातील प्रमुख मार्गावरील अशा स्पीड ब्रेकरची तातडीने पाहणी करून उघडे पडलेले खिळे काढावेत किंवा सुरक्षित पद्धतीने दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी आणि वाहनधारकांची गैरसोय करण्यासाठी नगर परिषद व संबंधित बांधकाम विभागाने त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## शहर स्वच्छतेच्या मार्गावर

# नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांचे नियोजन यशस्वी

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

गेल्या चार वर्षापासून कचरा आणि तुंबलेल्या नाल्यांच्या समस्येने त्रस्त असलेले अंजनगाव सुर्जी शहर आता स्वच्छतेच्या मार्गावर आले आहे. नवनिर्वाचित नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांच्या पुढाकाराने नगरपरिषद प्रशासनाने हाती घेतलेल्या मोहिमेमुळे शहराचे चित्र पालटले.

शहरातील विविध भागांत जागोजागी कचऱ्याचे ढीग साचल्याने घाणीचे साम्राज्य निर्माण झाले होते. नाल्यातील गटार तुंबून सांडपाणी थेट रस्त्यावर येत असल्याने दुर्गंधी आणि रोगराईचा धोका वाढला होता. नागरिक वारंवार तक्रारी




करूनही ठोस उपाययोजना होत नव्हती.नगराध्यक्षपदी अविनाश गायगोले विराजमान झाल्यानंतर त्यांनी आरोग्य निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक यांच्यासह बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. कचरा उचलणाऱ्या कंत्राटदाराला कडक शब्दांत समज देऊन कामाचे सुयोग्य नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. शहरातील प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र कर्मचारी नेमून त्यांच्यावर कचरा संकलन व नाली सफाईची जबाबदारी निश्चित करण्यात आली. या मोहिमेत नगरपरिषद प्रशासनातील अधिकारी पाणी पुरवठा व मिलिंद वानखडे अभियंता स्वच्छता, स्वप्नील श्रीवास्तव स्वच्छता निरीक्षक, सुरज हातेकर स्वच्छता निरीक्षक यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. नगराध्यक्ष गायगोले व अधिकाऱ्यांच्या समन्वयामुळे कामाला गती मिळाली. याबाबत बोलताना नगराध्यक्ष अविनाश गायगोले म्हणाले,'नागरिकांनी सहकार्य केले तर येणाऱ्या काही दिवसांत अंजनगाव सुर्जी पूर्णपणे स्वच्छ होईल. राज्यातील सुंदर आणि स्वच्छ शहर म्हणून अंजनगाव सुर्जीची ओळख निर्माण करणे हे आमचे ध्येय आहे.'स्वच्छतेसोबतच सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २० जूनला राष्ट्रीय परिसवाद

**अमरावती-** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती यांच्या वतीने इंडियन कौन्सिल फॉर फिलॉसॉफिकल रिसर्च (ICPR), नवी दिल्ली यांच्या सहयोगाने योग आणि तत्त्वज्ञान : सैद्धांतिक व व्यावहारिक दृष्टीकोन या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. हा परिसंवाद दि. २० जून २०२६ रोजी दुपारी १ वाजता स्व. सोमेश्वर पुसतकर सभागृहात होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे तर उद्घाटक म्हणून डॉ. संजय चोपकर उपस्थित राहतील. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. माधुरी चेंडके, डॉ. सुनील लबडे आणि परिसंवादाचे समन्वयक नितीन काळे उपस्थित राहणार आहेत.परिसंवादात डॉ. सोनाली ठाकरे (इंगळे), पूजा मस्के, डॉ. अरुण खोडसकर आणि डॉ. प्रणिता शिंदे हे भारतीय तत्त्वज्ञान, नैतिकता, योग आणि आयुर्वेद यांच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन करतील. सदर परिसंवाद पूर्णतः विनामूल्य आहे. योग, भारतीय तत्त्वज्ञान आणि समग्र आरोग्याविषयी जनजागृती हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## पीएलएफएस'आणि 'एएसयूएसई' सर्वेक्षण

# नागरिकांनी माहिती देऊन सहकार्य करण्याचे जिल्हाधिकारी यांचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत राज्यात 'नियतकालिक श्रम शक्ती सर्वेक्षण' आणि 'असंघटीत क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण' एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत राबविले जाणार आहे. या राष्ट्रीय कार्यात विभागातील नागरिकांनी सर्वेक्षणासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची आखणी करण्यासाठी ही सर्वेक्षणे अत्यंत मोलाची ठरणार आहेत. या सर्वेक्षणांमध्ये नियतकालिक श्रम शक्ती सर्वेक्षण अंतर्गत निवडक कुटुंबांकडून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे श्रम बाजाराचे महत्त्वाचे निर्देशांक तयार केले जातील. यामध्ये प्रामुख्याने श्रम शक्ती सहभाग दर, कामगार-लोकसंख्या गुणोत्तर, बेरोजगारी द या घटकांची अचूक आकडेवारी संकलित केली जाईल, ज्यामुळे भविष्यातील रोजगार धोरणांना दिशा मिळेल. असंघटीत क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण अंतर्गत राज्यातील उत्पादन, व्यापार आणि इतर सेवा क्षेत्रातील असंघटीत व बिगर-कृषि आस्थापनांच्या आर्थिक आणि कार्यात्मक वैशिष्ट्यांची आकडेवारी गोळा केली जाणार आहे. यामुळे असंघटीत क्षेत्रातील उद्योगांच्या विकासासाठी योजना आखणे सोपे होईल.या सर्वेक्षणांची माहिती गोळा करण्यासाठी अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयांतर्गत `Ipsos Research Private Limited' या नामांकित संस्थेची शासनाने निवड केली आहे. या संस्थेमार्फत नियुक्त केलेले अन्वेषक आणि पर्यवेक्षक केवळ 'नमुना पद्धतीने' निवडलेल्या ग्रामीण भागातील गावांना आणि शहरातील विशिष्ट वॉर्डामधील कुटुंबांना व आस्थापनांना प्रत्यक्ष भेट देऊन विहित प्रपत्रात माहिती गोळा करणार आहेत. या सर्वेक्षणा अंतर्गत कुटुंब प्रमुख आणि उद्योग,आस्थापना प्रमुख यांच्या उपलब्धतेसाठी नियुक्त कर्मचारी रविवार व शासकीय सुट्टीच्या दिवशीही भेटी देऊ शकतात. सर्वेक्षणादरम्यान नागरिकांकडून किंवा उद्योगांकडून मिळालेली वैयक्तिक व व्यावसायिक माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल. त्याचा वापर केवळ सांख्यिकी उद्देशांसाठी आणि शासकीय योजनांच्या नियोजनासाठीच केला जाईल. असे जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले आहे.

# स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांचे विविध मागण्यांसाठी

## आ.बच्चूभाऊ कडू यांना निवेदन

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर शहरातील संत गाडगेबाबा ज्ञानसागर सार्वजनिक वाचनालयात अचलपूर तालुक्यातील नाचे तर विविध भागातून विद्यार्थी मोठ्या संख्येने स्पर्धा परीक्षेची तयारी करतात.या विद्यार्थ्यांचा वतीने शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आ. बच्चू कडू यांना विविध मागण्याचे निवेदन देण्यात आले.

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,राज्यात विविध महानगरपालिका, नगरपालिकांमधील तसेच पोलीस विभागातील अनेक पदे दीर्घकाळापासून रिक्त आहेत. त्यामुळे प्रशासनावर अतिरिक्त ताण निर्माण होत असून नागरिक सेवांवर त्याचा परिणाम होत आहे. आणि राज्यातील अनेक युवक व विद्यार्थी रोजगाराच्या संधीच्या प्रतीक्षेत आहेत.यामुळे शासनाकडे



स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एक समान भरती नियमावली लागू करून रिक्त पदांची भरती प्रक्रिया सुरू करण्यासाठी तसेच पोलीस शिपाई, चालक, कारागृह शिपाई व इतर पदांसाठी पोलीस भरती २०२६ ची जाहिरात तात्काळ प्रसिद्ध करण्याचा मागणीचा उल्लेख आहे. आणि यापूर्वी ही विधानपरिषद आ. बच्चू कडू यांनी केलेल्या पाठपुराव्याबाबत ही विद्यार्थ्यांच्या वतीने आभार मानण्यात आहे. सोबतच राज्यातील विविध विभागांतील सर्व गट-क सरळसेवा परीक्षा एमपीएससी मार्फत घेण्यात येणार असल्याने, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संबंधित परीक्षांचा अभ्यासक्रम लवकरात लवकर जाहीर करावा व एमपीएससी मार्फत घेण्यात येणाऱ्या गट-क सरळसेवा पदांची जाहिरात प्रसिद्ध करण्याची मागणी विधानपरिषद आ. बच्चू कडू यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.यावेळी माजी बांधकाम सभापती बल्लू जवंजाळ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## राष्ट्रसंताचे गुरुकुंज आश्रम पाहून मंत्रमुग्ध झाले जिल्हाधिकारी

**गुरुकुंज मोझरी/वार्ताहर**

मानवतेचे महान पुजारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या गुरुकुंज आश्रमाला अमरावती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी नुकतीच भेट दिली.यावेळी संपूर्ण आश्रम परिसर पाहून,सामुदायिक प्रार्थनेला उपस्थित राहून माहिती जाणून घेतली असता ते मंत्रमुग्ध झाले.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचा गावमुक्काम कार्यक्रम मोझरी ग्राम येथे आयोजित करण्यात आला होता.त्यानिमित्त त्यांनी गुरुकुंज आश्रम येथे नियोजित दौऱ्यावर असतांना सायंकाळी भेट दिली.यावेळी सर्वप्रथम जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी राष्ट्रसंताच्या महासमाधीचे दर्शन घेतले व सामुदायिक प्रार्थनेला उपस्थिती दर्शविली.यावेळी आध्यात्मिक वातावरण पाहून व आश्रमिय परिसराची माहिती जाणून घेतल्यानंतर अक्षरशः ते भारावून गेले होते.त्यानंतर अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाला सुद्धा त्यांनी भेट देऊन पद्मश्री पुरस्कारप्राप्त जनार्दनपंत बोथे गुरुजी यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी बोथे गुरुजी यांनी राष्ट्रसंताच्या सहवासातील महत्वपूर्ण प्रसंग,महाराजांचे स्वातंत्र चळवळीतील योगदान



व आदी सर्व महत्वपूर्ण कार्याची माहिती सांगितली. यावेळी जिल्हाधिकारी यांच्यासह उपस्थित उपविभागीय अधिकारी दादासाहेब दराडे,तहसीलदार मयुर कळसे यांनी जनार्दनपंत बोथे गुरुजी यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.यावेळी संपूर्ण आश्रमिय परिसर पाहून व सामुदायिक प्रार्थनेतील आध्यात्मिक वातावरणाचा अनुभव घेऊन मी मंत्रमुग्ध झाल्याची प्रतिक्रिया जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

## आणिबाणी निषेध दिनानिमित्त २९ जून रोजी व्याख्यानाचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**

भारतीय लोकतंत्र सेनानी संघ, अमरावती जिल्हा आणि आ.राजेश वानखेडे मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'आणिबाणी निषेध दिना' निमित्त सोमवार, २९ जून २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता मोर्शी रोड येथील मांगल्य (स्व. बाबासाहेब वऱ्हाडे सभागृह) येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभाग संघचालक चंद्रशेखर भोंदू राहणार आहेत. '२५ जून १९७५ ते २१ मार्च १९७७ या काळातील आणिबाणी : भारतीय लोकशाहीवरील काळाकुट्ट अध्याय' या विषयावर माजी विदर्भ प्रांत प्रचारक तथा माजी महाराष्ट्र प्रदेश भाजप संघटन महामंत्री प्रा. रवि भुसारी यांचे मार्गदर्शन होणार आहे.सदर कार्यक्रमाला प्रमुख अतिथी राज्यसभा खा. डॉ. अनिलजी बोंडे, आ. राजेश वानखेडे, तिवसा विधानसभा मतदारसंघ तथा भारतीय लोकतंत्र सेनानी संघाचे प्रदेशाध्यक्ष मा. मधुसूदन उमेकर यांचे उपस्थितीत संपन्न होणार आहे. सदर कार्यक्रमाला समस्त लोकतंत्र सेनानींनी आणि हितचिंतकांनी तथा लोकशाही, लोकतंत्रा विषयी आस्था बाळगणा-या प्रेमी जनांनी सहका-यां सह आवर्जून उपस्थितीत रहावे. त्या काळ्याकुट्ट काळाचा आढावा घेऊन भविष्यात भारतीय लोकतंत्र तथा भारतीय संविधान कलंकित होणार नाही ही भावना जागृत करण्यासाठी आत्मीयतेने जास्तीत जास्त संख्येने उपस्थिती लाभणार आहे. लोकशाही आणि संविधानाविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमास लोकतंत्र सेनानी, हितचिंतक तसेच लोकशाहीप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष श्रीकृष्ण जोगळेकर, जिल्हा महासचिव विठ्ठलराव पोकळे, प्रदेश कार्यालय मंत्री श्रीकांत कुटुंबे तसेच आयोजकांनी केले आहे.

# जी.एच.रायसोनी विद्यापीठात एआय एकिकरणावर पाच दिवसीय एफडीपी कार्यक्रम

**अमरावती/का.प्र.**

जी एच रायसोनी विद्यापीठ, अमरावती येथील कंप्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाने 'उच्च शिक्षणात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे एकीकरण: शैक्षणिक रणनीती, उपकरणे व नैतिक चौकट' या विषयावर पाच दिवसीय संकुल विकास कार्यक्रम (एफडीपी) यशस्वीरीत्या आयोजित केला. हा कार्यक्रम भारतीय विद्यापीठ संघ (एआययू) आणि विद्यापीठाच्या शैक्षणिक व प्रशासकीय विकास केंद्र (एएडीसी) यांच्या संयुक्त सहकार्याने पार पडला.

कार्यक्रमाचे उद्दिष्ट शिक्षक, संशोधक आणि शैक्षणिक प्रशासकांना उच्च शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) प्रभावी एकीकरण करण्यासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्य आणि व्यावहारिक प्रशिक्षण देणे हे होते. यात विविध संस्थांमधील ६६ हून अधिक शिक्षक व संशोधकांनी सहभाग घेतला.कार्यक्रमादरम्यान नामवंत विशेषज्ञांनी विचारप्रवर्तक सत्रे घेतली. यात रामदेवबाबा विद्यापीठ, नागपूर येथील डॉ. निसर्ग गजानन गांधेवर, एमडीबी इलेक्ट्रोसॉफ्ट प्रा. लि. चे संस्थापक मंगेश भारती, श्री पिलर ग्लोबल प्रा. लि. चे सीनियर




ॲनालिस्ट प्रीतम गोहात्रे, पीसीईटी पिंपरी चिंचवड विद्यापीठातील प्रोफेसर व इंडस्ट्री इन्स्टिटयूट इंटरॅक्शन व आंतरराष्ट्रीय संबंध विभागाचे संचालक डॉ. प्रणव चरखा, मेटाक्यूब

सोल्युशन्स प्रा. लि. चे सीनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर सचिन देशमुख आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कंप्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. मोहम्मद अतीक यांचा समावेश होता. सत्रांमध्ये एआयच्या मूलभूत संकल्पना, शिक्षणात मशीन लर्निंगचे उपयोजन, एआय-सहाय्यक सामग्री निर्मिती, बुद्धिमान मूल्यमापन पद्धती, वैयक्तिकृत शिक्षण मार्ग, संशोधन सहाय्यक साधने आणि शैक्षणिक तंत्रज्ञानातील उभरते ट्रेंड्स यासारख्या विषयांवर सखोल चर्चा झाली.

प्रतिभागकांना विविध एआय प्लॅटफॉर्म्स आणि टूल्सचे व्यावहारिक प्रशिक्षण देण्यात आले, ज्यामुळे शिक्षण प्रक्रिया अधिक प्रभावी, विद्यार्थ्यांची सहभागिता वाढवणे आणि नियमित शैक्षणिक कामे स्वयंचलित करण्यास मदत होईल.कार्यक्रमाचा समारोप प्रतिभागकांच्या फीडबॅक सत्र आणि समापन समारोहाने झाला.

कार्यक्रम समन्वयक डॉ. जयंत मेहरे आणि डॉ. अजय कुमार यांनी विश्वविद्यालय व्यवस्थापन, कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, कुलसचिव डॉ. स्नेहील जायसवाल, विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. प्रशांत अवचट आणि इंजिनिअरिंग स्कूलचे डीन डॉ. अमित गायकवाड यांचे सततचे सहकार्य आणि प्रोत्साहनाबद्दल आभार व्यक्त केले.

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सच

अकोला जिल्हा विशेष

# महानगरात महाराणा प्रताप जयंती उत्साहात साजरी

■ प्रतिनिधी | अकोला ■

### शिवसेनेतर्फे महाराणा प्रताप जयंती उत्साहात साजरी


**अकोला :** हिंदवी स्वाभिमानाचे प्रतीक, मेवाडचे पराक्रमी योद्धे तथा हिंदूसूर्य महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना अकोला महानगरच्या वतीने महाराणा प्रताप बगीचा, सिटी कोतवाली चौक येथे अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या शौर्य, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेच्या कार्याला अभिवादन करण्यात आले.

अकोला जिल्हा संपर्क मंत्री नामदार प्रतापराव सरनाईक, माजी मंत्री संजय राठोड, विदर्भ नेते आमदार बच्चू कडू, शिवसेना उपनेते गोपी किसनजी बाजोरिया, जिल्हा संपर्कप्रमुख तथा माजी आमदार राजन



साळवी, जिल्हा विशेष प्रभारी ललितभाऊ वानखडे, जिल्हाप्रमुख चंद्रशेखर पांडे गुरुजी तसेच सहसंपर्कप्रमुख अश्विन नवले यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शिवसेना महानगरप्रमुख राजेश मिश्रा यांनी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. महाराणा प्रताप हे स्वाभिमान, राष्ट्रभक्ती आणि संघर्षाचे जिवंत प्रतीक असून त्यांच्या पराक्रमातून आजच्या पिढीने प्रेरणा घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला महिला सेना प्रमुख तथा नगरसेविका उषाताई विरक, नगरसेवक सागर भरुका, संतोष अनासने, डॉ. अशोक ओळंबे, गजानन चव्हाण, गजानन बोराडे, निशा गिरल, गोटू अग्रवाल, रमेश गायकवाड, देविदास बोदळे, पप्पू चौधरी, नीता अग्रवाल, महेश बघेरे, फिरोज पठाण, संजय अग्रवाल, किरण ठाकूर, विजय दुबे, प्रकाश वानखडे, राखी पाटेकर, कुणाल शिंदे, नाना देशमुख, मधुकर सोनारगन, अनिल देशमुख, पवन पवार यांच्यासह शिवसैनिक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान 'जय भवानी, जय शिवाजी' तसेच 'महाराणा प्रताप अमर रहे' या घोषणांनी परिसर दणाणून गेला. उपस्थितांनी महाराणा प्रताप यांच्या शौर्य, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेच्या आदर्शांवर चालण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाची माहिती अनिल मालगे यांनी दिली.



### मनपात महाराणा प्रतापसिंह जयंती उत्साहात साजरी

**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या वतीने बुधवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृहात महाराणा प्रतापसिंह जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. कार्यक्रमात महाराणा प्रतापसिंह यांच्या शौर्य, पराक्रम आणि राष्ट्रनिष्ठेच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. तसेच त्यांच्या आदर्शांवर चालण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. याप्रसंगी संजय चव्हाण, गोपाल बाहेकर, विशाल शिरसाट, दीपक शिरसाट, रवि शिंदे, पूर्णाजी पाटील, प्रफुल शिरसाट, विश्वनाथ सुतवणे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील नागरिकांची उपस्थिती लाभली असून, जयंतीनिमित्त सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.



### शौर्य, स्वाभिमानाचा आदर्श जपण्याचे आवाहन

**अकोला :** क्रांतिसूर्य महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त शहरातील महाराणा प्रताप पार्क येथे बुधवारी अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी आमदार रणधीर सावरकर आणि खासदार अनुप धोत्रे यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाला महानगराध्यक्ष जयंतराव मसने, अ‍ॅड. सुभाषसिंग ठाकूर यांच्यासह विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. यावेळी महाराणा प्रताप यांच्या कार्याचा व शौर्यपरंपरेचा गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना आमदार रणधीर सावरकर म्हणाले की, 'महाराणा प्रताप यांचे शौर्य, स्वाभिमान आणि मातृभूमीप्रती असलेली निष्ठा आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांमधून राष्ट्रभक्ती आणि स्वाभिमानाचे संस्कार समाजात रुजविण्याची गरज आहे.'

खासदार अनुप धोत्रे यांनीही महाराणा प्रताप यांच्या पराक्रमाचा गौरव करत त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास उषाताई विरक, बादलसिंग ठाकूर, विनोदसिंग ठाकूर, किशोर मांगटे पाटील, कल्पनाताई गोटफोडे, हेमंत शर्मा, माधव मानकर, विवेक भरणे, मनोज भिसे, संतोष पांडे, कृष्णा पांडे, मनोज शाहू, करण शाहू, गिरीराज तिवारी, देवेंद्र तिवारी, बंशी चव्हाण, नितेश पाली, निशा कडी, चंदा ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन माधव मानकर व गिरीश जोशी यांनी केले. उपस्थितांनी महाराणा प्रताप यांच्या स्मृतींना अभिवादन करत त्यांच्या आदर्शांचे पालन करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## एस.आर. पाटील कॉलेजच्या अनधिकृत बांधकामावर मनपाची कारवाई

### ३२४ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम निष्कासित; पोलिस बंदोबस्तात मोहीम

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिकेच्या दक्षिण झोन प्रशासनाने सहकार नगर परिसरातील एस.आर. पाटील कॉलेजच्या अनधिकृत बांधकामावर बुधवारी निष्कासनाची कारवाई केली. मंजूर नकाशापेक्षा अधिक बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्यानंतर ही कारवाई पोलिस बंदोबस्तात करण्यात आली.

महानगरपालिका प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, विदर्भ ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मालकीच्या मौजे मलकापूर येथील सर्व्हे क्रमांक २६/२ मधील भूखंड क्रमांक ५० वर एस.आर. पाटील कॉलेजचे बांधकाम करण्यात आले आहे. या ठिकाणी मंजूर नकाशानुसार १४१.०६ चौरस मीटर बांधकामास परवानगी



होती. मात्र प्रत्यक्ष पाहणीत ४६५.४० चौरस मीटर बांधकाम उभारण्यात आल्याचे आढळले. त्यामुळे तब्बल ३२४.३४ चौरस मीटर अतिरिक्त व अनधिकृत बांधकाम केल्याचे स्पष्ट झाले. या पार्श्वभूमीवर दक्षिण झोनचे सहायक आयुक्त गणेश शहाणे व देविदास निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षिण झोन कार्यालय आणि मनपाच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने संयुक्तपणे निष्कासनाची कारवाई राबविली. कारवाईदरम्यान सहायक अतिक्रमण अधिकारी चंद्रशेखर इंगळे, प्रवीण मिश्रा, कनिष्ठ अभियंते प्रतीक कटियारमल, गौरव बडे, रूपेश इंगळे, गुलाम मुस्तफा, आकाश धुळभरे, स्वप्नील पवार, सोनू गायकवाड, नंदू तायडे तसेच खदान पोलिस ठाण्याचे कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय अतिक्रमण विभाग व दक्षिण झोन कार्यालयातील कर्मचाऱ्यांनीही कारवाईत सहभाग घेतला. मनपाच्या या कारवाईमुळे शहरातील अनधिकृत बांधकामांवर प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

## स्मार्ट मीटरवरून महिला काँग्रेस आक्रमक

### 'सक्ती केल्यास तीव्र आंदोलन'चा इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

महावितरणकडून शहरातील वीज ग्राहकांचे पारंपरिक मीटर बदलून स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येत असताना, त्याविरोधात अकोला शहर महिला काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली आहे. नागरिकांना विश्वासात न घेता, पुरेशी माहिती न देता आणि पारदर्शकता न ठेवता स्मार्ट मीटर बसविण्याची घाई सुरू असल्याचा आरोप करत महिला काँग्रेसच्या शहराध्यक्षा कशीश खान यांनी महावितरणला इशारा दिला आहे. माननीय आमदार साजिद खान पठाण यांच्या नेतृत्वाखाली यासंदर्भात निवेदन देण्यात आले.

अलीकडे शहरातील अनेक वीज ग्राहकांना विद्यमान मीटर बदलून स्मार्ट मीटर बसविण्याबाबत संदेश पाठविण्यात येत आहेत. मात्र या प्रक्रियेबाबत ग्राहकांच्या मनात अनेक शंका निर्माण झाल्या असून, त्यांचे समाधान न करता मीटर बदलण्याची मोहीम राबविली जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

याबाबत भूमिका स्पष्ट करताना कशीश खान म्हणाल्या, 'आधुनिक तंत्रज्ञानाला आमचा विरोध नाही. मात्र नागरिकांच्या संमतीशिवाय, त्यांना योग्य माहिती न देता आणि त्यांच्या हक्कांकडे दुर्लक्ष करून कोणताही निर्णय त्यांच्यावर लादला जाऊ नये.' तर स्मार्ट मीटर बसविण्यामागील उद्देश, भविष्यातील बिलिंग पद्धतीतील बदल, वेळेनुसार वीजदर लागू होणार का, तांत्रिक बिघाड झाल्यास जबाबदारी कोणाची राहणार, तसेच चुकीचे बिल आल्यास ग्राहकांनी दाद कुठे मागायची, अशा अनेक प्रश्नांची उत्तरे महावितरणने स्पष्टपणे द्यावीत, अशी मागणी महिला काँग्रेसने केली आहे.

नागरिकांना विश्वासात न घेता किंवा दबाव टाकून स्मार्ट मीटर बसविण्याचे काम सुरू राहिल्यास लोकशाही मार्गाने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही कशीश खान यांनी दिला. 'वीज ही नागरिकांची मूलभूत सेवा आहे. त्यामुळे माहिती, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि न्याय मिळालाच पाहिजे,' असे त्या म्हणाल्या.

यावेळी अ‍ॅनी इंगळे, शहाना शेख, रेखा डोंगरे, रंजना चावरे, सलमा खान, आशना परवीन, सिमरन आदींसह महिला काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्या उपस्थित होत्या.



**महिला काँग्रेसच्या प्रमुख मागण्या**

प्रत्येक ग्राहकाला मीटर बदलण्यामागील कारण लेखी स्वरूपात कळविणे, अधिकृत कर्मचारी व कंत्राटदारांची माहिती जाहीर करणे, जुना व नवीन मीटर रीडिंगची लेखी प्रत देणे, स्मार्ट मीटरबाबत जनजागृती मोहीम राबविणे, तक्रार निवारणासाठी स्वतंत्र हेल्पलाइन सुरू करणे आणि मीटर बदलताना कोणत्याही प्रकारची अतिरिक्त आर्थिक आकारणी केली जाणार नसल्याची हमी देणे, या प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

**अकोला महानगरपालिका, अकोला**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोला**

**निविदा सुचना क्र. ०९, (२६-२७)**

आयुक्त, अकोला महानगरपालिका मनपा निधी अंतर्गत ०८ काम या कामांकरीता निविदा मागविण्यात येत आहे. करीता विस्तृत माहितीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोलाच्या निविदा शाखेच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर तसेच खालील नमुद संकेत स्थळावर भेट द्यावी.

Portal https://amcakola.in

**कार्यकारी अभियंता**
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/साबावि/२२६/२०२६,
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : १७/०६/२०२६

## सायबर तपासाच्या बळावर हरवलेला युवक मुंबईत सापडला

### मुर्तिजापूर शहर पोलिसांची तत्पर कारवाई; कुटुंबीयांना दिलासा

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

कौटुंबिक कारणावरून नाराज होऊन घरातून निघून गेलेल्या २६ वर्षीय युवकाचा शोध घेण्यात मुर्तिजापूर शहर पोलिसांना यश आले आहे. सायबर तपासाच्या मदतीने युवक मुंबईत असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्याला सुखरूप शोधून काढण्यात आले. या कारवाईमुळे कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे.

प्राप्त माहितीनुसार, शहरातील एका कुटुंबातील २६ वर्षीय युवक काही कौटुंबिक कारणामुळे नाराज होता. रागाच्या भरात त्याने घरातील कोणालाही माहिती न देता घर सोडले. दिवसभर उलटूनही तो घरी परतला नसल्याने कुटुंबीयांनी मित्रमंडळी व नातेवाईकांकडे चौकशी सुरू केली. मात्र त्याचा काहीच मागमूस लागला नाही. त्यातच युवकाचा मोबाईल फोनही बंद लागत असल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली. अखेर दुसऱ्या दिवशी युवकाच्या वडिलांनी मुर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन मुलगा हरवल्याची तक्रार दाखल केली. तक्रार प्राप्त होताच नुकतेच ठाणेदारपदाची सूत्रे हाती घेतलेल्या पोलीस निरीक्षक जोशी यांनी प्रकरण तपासाला सुरुवात केली.

सायबर तपासातील अनुभवाच्या बळावर त्यांनी तांत्रिक विश्लेषण व डिजिटल माहितीच्या आधारे युवकाच्या हालचालींचा मागोवा घेतला. तपासादरम्यान युवक मुर्तिजापूरहून मुंबईकडे गेल्याचे स्पष्ट झाले. पुढील पडताळणीत तो मुंबई परिसरात असल्याची खात्री झाली. पोलिसांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे युवकाच्या नातेवाईकांशी संपर्क साधून त्यांना संबंधित ठिकाणी जाण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार नातेवाईकांनी शोधमोहीम राबवून युवकाचा शोध घेतला. युवक सुखरूप असल्याची खात्री झाल्यानंतर त्याचे वडिलांशी व्हिडिओ कॉलद्वारे बोलणे करून देण्यात आले. मुलगा सुरक्षित असल्याचे समजताच कुटुंबीयांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. अनेक तासांच्या चिंतेनंतर मुलाचा चेहरा पाहून वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणात पोलीस निरीक्षक जोशी यांनी दाखविलेली तत्परता, संवेदनशीलता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कौतुकास्पद ठरला आहे. अल्पावधीतच नागरिकाभिमुख पोलिसिंगचा प्रत्यय देत त्यांनी हरवलेल्या युवकाचा शोध लावला. युवकाच्या कुटुंबीयांनी पोलीस निरीक्षक जोशी तसेच मुर्तिजापूर शहर पोलिसांचे आभार व्यक्त केले आहेत.

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८२४/२०२६ प्रोसेस नं.७५९३/२०२६
चौ.ता. २८/०७/२०२६ दिनांक : १५/०६/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती अश्विनी नितिन कान्हे २. अनित नितिन कान्हे दोघेही रा. साईबाबा व्यायाम शाळेजवळ, राजेश्वर मंदिराच्या मागे, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नितिन भैय्याजी कान्हे
**पत्ता :-** रा. साईबाबा व्यायाम शाळेजवळ, राजेश्वर मंदिराच्या मागे, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नितिन भैय्याजी कान्हे यांचे दि. ०५/०४/२०२६ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १५/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १९१**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## आश्वासनांचे चार महिने ; आता आत्मदहनाचा इशारा!

### अमिनपूर ग्रामस्थांचा संताप ; १९ जूनला बीडीओ कार्यालयात टोकाचे आंदोलन करण्याचा निर्धार

■ प्रतिनिधी | अकोट ■

मुंडगाव ग्रामपंचायतीने दिलेले लेखी आश्वासन हवेत विरल्याचा आरोप करत अमिनपूर येथील महिला व पुरुषांनी आता थेट आत्मदहनाचा इशारा दिला आहे. गावठाण जागेवरील अतिक्रमण हटवून पात्र लाभार्थ्यांना जागा देण्याचे आश्वासन चार महिन्यांपूर्वी देण्यात आले होते. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने संतप्त ग्रामस्थांनी १९ जून रोजी अकोट पंचायत समितीतील गटविकास अधिकारी यांच्या दालनात आत्मदहन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

अमिनपूर येथील सिंधुबाई सोनोने, तोताराम सरकटे व सुरेश सरकटे यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी यापूर्वी मुंडगाव ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण छेडले होते. चार दिवसांच्या उपोषणानंतर ग्रामपंचायतीने १५ दिवसांत अतिक्रमण हटवून नियमानुसार जागा उपलब्ध करून देण्याचे लेखी आश्वासन दिले होते. या आश्वासनानंतर उपोषण मागे घेण्यात आले. मात्र, चार महिने उलटूनही प्रश्न जैसे थेच राहिल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.



ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधित ग्रामसेवक दीर्घ रजेवर गेल्याने प्रकरण आणखी रखडले. दरम्यान प्रभारी ग्रामसेवकाची नियुक्तीही करण्यात आली नाही. त्यानंतर अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावण्यात आल्या; परंतु प्रत्यक्ष कारवाई झाली नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे.

याबाबत १५ जून रोजी गटविकास अधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. १८ जूनपर्यंत अतिक्रमण हटवून नियमानुसार जागा उपलब्ध करून न दिल्यास १९ जून रोजी आत्मदहन करण्यात येईल, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, अकोट ग्रामीण व शहर पोलीस ठाणे तसेच संबंधित ग्रामपंचायतीला देण्यात आल्या आहेत. निवेदनात ग्रामसेवक सैय्यद नजाकत, गटविकास अधिकारी रमाकांत माळी आणि विस्तार अधिकारी बहुरे यांना जबाबदार धरण्यात आले आहे. त्यामुळे प्रशासनासमोर नवे संकट उभे ठाकले असून, आता प्रत्यक्ष कारवाई होते की पुन्हा आश्वासनांचीच मालिका सुरू राहते, याकडे लक्ष लागले आहे.

'अतिक्रमणधारकांना २४ तासांची अंतिम नोटीस बजावण्यात आली आहे. नोटीस कालावधी संपल्यानंतरही अतिक्रमण कायम राहिल्यास पोलिसांच्या मदतीने कारवाई केली जाईल. त्यासाठी तीन दिवसांचा अवधी द्यावा.'

**- सैय्यद नजाकत,** ग्रामसेवक, मुंडगाव

'चार महिन्यांपासून केवळ आश्वासनेच मिळत आहेत. आता तीन दिवसांत प्रश्न निकाली निघाला नाही तर आम्ही आत्मदहनाचा निर्णय कायम ठेवणार आहोत.'

**- सिंधुबाई सोनोने**

'प्रशासनाच्या दिरंगाईमुळे आम्हाला वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत. आता आणखी विलंब सहन केला जाणार नाही.'

**तोताराम सरकटे**

'आम्हाला आमचा हक्काचा भूखंड हवा आहे. प्रशासनाने तातडीने न्याय द्यावा, अन्यथा १९ जूनला आत्मदहन करू.'

**- सुरेश सरकटे**

'तीन दिवसांत अतिक्रमण हटविण्याची प्रक्रिया पूर्ण करून पात्रांना नियमानुसार जागा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल.'

**- अनिल गाढे,** प्रभारी सरपंच

## संक्षिप्त

### ५ सबमर्सिबल मोटारपंपांची चोरी

**वर्धा-**पुजई शिवारातील शेतकऱ्यांच्या विहिरींमधून अज्ञात चोरट्यांनी पाच सबमर्सिबल मोटारपंप चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. या चोरीमुळे संबंधित शेतकऱ्यांचे सुमारे ५१ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. परिसरात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दिलीप सुकळकर, धनराज कुबडे, राहुल बिरे, नितीन सुकळकर आणि कमलाकर देशमुख यांच्या शेतातील विहिरींमधून मोटारपंप लंपास करण्यात आले. सकाळी शेतात गेल्यानंतर मोटारपंप चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या प्रकारामुळे सिंचन व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तक्रारीवरून सेवाग्राम पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

**आष्टी-**नापिकी आणि वाढत्या कर्जाच्या ओझ्यामुळे एका शेतकऱ्याने कीटकनाशक प्राशन करून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना बोटोना शिवारात घडली. अनिल भोने (५२, रा. सुसुंद्रा) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. अनिल भोने यांनी शेतीसाठी स्टेट बँक ऑफ इंडियाकडून कर्ज घेतले होते. मात्र, सलग नापिकीमुळे आर्थिक अडचणी वाढल्या होत्या. कर्जफेडीची चिंता आणि उत्पन्नाचा अभाव यामुळे ते मानसिक तणावाखाली होते. अखेर त्यांनी शेतातच कीटकनाशक प्राशन करून जीवनयात्रा संपविली. त्यांना उपचारासाठी नेण्याचा प्रयत्न करण्यात आला,मात्र त्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. तक्रारीवरून आष्टी पोलिसांनी नोंद घेतली असून पुढील तपास सुरू केला आहे.

### ३०० रुपयांच्या वादातून काठीने मारहाण

**वर्धा-**अवघ्या ३०० रुपयांच्या व्यवहारावरून झालेल्या वादातून एका व्यक्तीला काठीने मारहाण करण्यात आल्याची घटना म्हसाळा येथील प्रबुद्धनगर परिसरात घडली. जलाउद्दीन अन्सारी (४५, रा. नागसेननगर) असे जखमीचे नाव आहे. जलाउद्दीन अन्सारी आणि बंडू लष्कर यांनी मिळून सफाईचे काम घेतले होते. कामाचे पैसे वाटप केल्यानंतर बंडू याने आणखी ३०० रुपयांची मागणी केली. मात्र, जलाउद्दीन यांनी नकार दिल्याने दोघांमध्ये वाद निर्माण झाला. काही वेळातच हा वाद उफाळून आला आणि आरोपीने काठीने मारहाण केली. या मारहाणीत जलाउद्दीन जखमी झाले. त्यांच्यावर उपचार करण्यात आले असून घटनेनंतर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. सेवाग्राम पोलिसांनी गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

### फोटो काढण्याच्या नादात दोघे जखमी

**सेलू-**मोबाईलवर फोटो काढत असताना ट्रॅक्टरवरील नियंत्रण सुटल्याने कारला जोरदार धडक बसून दोन जण जखमी झाल्याची घटना कोटंबा शिवारात घडली. किशोर जुगनाके (५३) व भूषण पाचपोर, दोघेही बुटीबोरी येथील रहिवासी, हे या अपघातात जखमी झाले. किशोर जुगनाके हे भूषण पाचपोर यांच्या कारचे चालक असून दोघे जुनोनाकडे जात होते. त्याचवेळी समोरून येणाऱ्या ट्रॅक्टरचालकाने मोबाईलवर फोटो काढण्यास सुरुवात केली. फोटो काढण्यात गुंतल्याने त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ट्रॅक्टरने कारला समोरून धडक दिली. अपघातात दोघे जखमी झाले असून कारचे सुमारे १० लाख रुपयांचे नुकसान झाले. प्रकरणी ट्रॅक्टर मालक नरेंद्र वांदीले यांच्याविरुद्ध दहेगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### मनाविरुद्ध लग्नाच्या कारणातून भावास मारहाण

**हिंगणघाट-**कुटुंबीयांच्या इच्छेविरुद्ध विवाह केल्याच्या कारणातून एका व्यक्तीला त्याच्याच भावाने मारहाण केल्याची घटना कडाजना येथे घडली. राहुल डबले (३४, रा. हिंगणघाट) असे जखमीचे नाव आहे. राहुल डबले हे पत्नीसह आपल्या घरी आले होते. त्यावेळी त्यांचा भाऊ प्रवीण डबले घरी पोहोचला. कुटुंबीयांच्या मनाविरुद्ध लग्न केल्याबाबत त्याने राहुल यांच्याशी वाद घातला. वाद विकोपाला गेल्यानंतर प्रवीण याने स्टीलच्या डब्याने राहुल यांच्या डोक्यावर व शरीरावर मारहाण केली. या घटनेत राहुल जखमी झाले. त्यांच्यावर उपचार करण्यात आले असून प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले. तक्रारीवरून हिंगणघाट आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### किरकोळ कारणातून युवकाला मारहाण

**वर्धा-** दुचाकीला कट लागल्याच्या किरकोळ कारणावरून एका युवकाला तिघांनी बेदम मारहाण केल्याची घटना निर्मल बेकरी चौक परिसरात घडली. नितीन कुळे (३५, रा. जुनोना) असे जखमी युवकाचे नाव आहे. नितीन कुळे आणि त्यांचा मित्र बबन कुडसंगे हे दुचाकीने बोरगावकडे जात होते. दरम्यान, रस्त्यावरून जात असताना दुसऱ्या वाहनाला कट लागल्याचा आरोप करत तिघा अनोळखी इसमांनी त्यांना अडविले.

# मान्सूनची प्रतिक्षा लांबली; शेतकरी चिंतेत

## मुंबईसह राज्यात २२ ते २९ जूनदरम्यान सक्रिय होण्याची शक्यता

**वर्धा/जनमाध्यम**

राज्यासह वर्धा जिल्ह्यातील शेतकरी आणि नागरिकांना मान्सूनच्या पावसाची प्रतीक्षा आणखी काही दिवस करावी लागणार आहे. रखडलेल्या मान्सूनची वाटचाल अपेक्षेपेक्षा मंदावल्याने तो आता २२ ते २९ जूनदरम्यान मुंबईसह उर्वरित महाराष्ट्रात सक्रिय होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. त्यामुळे खरीप हंगामाच्या तयारीत असलेल्या शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

तळकोकणात ६ जून रोजी मान्सूनचे आगमन झाल्यानंतर तो वेगाने पुढे सरकेल, अशी अपेक्षा होती. मात्र मान्सूनचे वारे कमकुवत झाल्याने गेल्या काही दिवसांपासून त्याची प्रगती मंदावली आहे. वायव्य दिशेकडून येणारे उष्ण व कोरडे वारे, अनुकूल हवामान प्रणालीचा अभाव आणि ढगांची कमी घनता यामुळे मान्सूनचा प्रवास रखडल्याचे हवामान तज्ज्ञांचे मत आहे.

हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार, यापूर्वी २०१९ आणि २०२३ मध्येही मान्सून



२५ जूननंतर राज्यात सक्रिय झाला होता. यंदाही अशीच परिस्थिती निर्माण होत असल्याने पेरणीसाठी पावसाची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता आहे. सध्या वर्धा जिल्ह्यासह विदर्भात उष्ण आणि दमट हवामान कायम असून नागरिक उकाड्याने हैराण झाले आहेत.

पुढील चार ते पाच दिवसांत राज्यातील काही भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळण्याची शक्यता असली, तरी व्यापक आणि समाधानकारक पावसासाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार असल्याचे संकेत हवामान विभागाने दिले आहेत. त्यामुळे खरीप हंगामाची सुरुवात आणि पेरणीचे नियोजन यावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

गोटपॉक्स लसिकरणासाठी पशुपालकांना आवाहन

# लम्पी त्वचा रोग प्रतिबंधकरीता गोटपॉक्स लसिकरण मोहीम

**वर्धा/जनमाध्यम**

लम्पी त्वचारोग हा संसर्गजन्य आजार असून त्याचा पशुधनाच्या आरोग्यावर तसेच पशुपालकांच्या आर्थिक उत्पन्नावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व पशुपालकांनी जवळच्या पशूवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून आपल्या गायवर्गीय जनावरांचे लसीकरण करुन घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यात लम्पी त्वचारोग प्रतिबंधक लसीकरण मोहिम युध्दपातळीवर राबविण्यात येत आहे.

राज्यातील पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत लसीचे वितरण नियोजन पध्दतीने सुरु करण्यात येणार असून जिल्ह्यातील सर्व पात्र जनावरांचे लसीकरण तातडीने पुर्ण करण्यासाठी विभागाचे अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत.

२१ व्या पशुगणनेनुसार जिल्ह्यात एकुण गायवर्गीय पशुधनाची संख्या २ लाख ११ हजार ७१७ इतकी विचारात घेऊन प्राप्त झालेल्या लसीच्या आधारे लसीकरण मोहिमेला वेग देण्यात येणार आहे, असे जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय उपायुक्तांनी कळविले आहे.

# सिमेंट रस्त्यामुळे घरांमध्ये पाणी मुरण्याचा धोका

## डासांचा प्रादूर्भाव वाढला; भिंती कोसळण्याची भीती, नागरिकांचा प्रशासनाला इशारा

**आष्टी(शहीद)/जनमाध्यम**

आष्टी येथील प्रभात क्रमांक १५ परिसरात सिमेंट रस्त्याच्या कामामुळे निर्माण झालेल्या पाणी साचण्याच्या समस्येने नागरिक हैराण झाले आहेत. रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात घाण पाणी साचल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढला असून डेंग्यू व मलेरियासारख्या साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. तसेच साचलेले पाणी घरांच्या भिंतींमध्ये मुरत असल्याने भविष्यात भिंती कोसळण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

खासदार निधीतून करण्यात आलेल्या सिमेंट रस्त्याच्या बांधकामादरम्यान पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आली नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. रस्त्याच्या कडेला नाली किंवा पाईपद्वारे पाणी वाहून जाण्याची व्यवस्था करणे अपेक्षित होते. मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याने आज परिसरातील नागरिकांना त्रास



सहन करावा लागत आहे. समाजसेवक बाबाराव डहाके यांच्या घरासमोर तसेच नगरसेविका माधुरी सोनटक्के यांच्या ये-जा करण्याच्या मुख्य मार्गावरच घाण पाण्याचे डबके साचले आहे. या पाण्याचा शेजारील घरांच्या भिंतींवर परिणाम होत असून आगामी पावसाळ्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिसरातील नागरिकांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेवर नाराजी व्यक्त करत तातडीने पाहणी करून पाण्याचा निचरा करण्याची प्रभावी व्यवस्था करण्याची मागणी केली आहे. अन्यथा नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता इशाराही त्यांनी दिला आहे.या संदर्भात अमोल डहाके, बाबाराव डहाके, मोहन खारकर, सुरेश तांबस्कर, सचिन पाचघरे, सचिन गुप्ता यांच्यासह अनेक नागरिकांनी प्रशासनाकडे तक्रार नोंदवून त्वरित कारवाईची मागणी केली आहे.

# पशुपालकांनी पशूचे मान्सूनपूर्व लसीकरण करुन घ्यावे; लसीकरण मोहिमेचा शुभारंभ

**वर्धा/जनमाध्यम**

पावसाळ्यात जनावरांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते व संसर्ग पसरण्याचा धोका वाढतो. त्यामुळे ऐनवेळी येणारे संकट आणि होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पशुपालकांनी आपल्या गाई, म्हशी, शेळ्या व मेंढ्यांचे मान्सूनपूर्व लसीकरण करुन घ्यावे, यासाठी जवळच्या शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हा व तालुका पातळीवर आवश्यकतेनुसार लसीचा पुरेसा साठा उपलब्ध असून पशवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची पथके तयार करण्यात आली आहे. पथके प्रत्यक्ष गावागावांत व गोठ्यांपर्यंत पोहोचून घर ते घर पध्दतीने लस टोचणी करत आहेत. एकाही जनावराचे लसीकरण सुटणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पशुधनाला विविध संसर्गजन्य आजारांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागाच्यावतीने राज्यात 'मान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम' युद्धपातळीवर व मोहीम स्वरूपात सुरू करण्यात आली आहे. पावसाळ्यापूर्वी होणाऱ्या घटसर्प व फऱ्या यांसारख्या घातक आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी तसेच राज्यातील पशुधनाचे आरोग्य राखण्यासाठी व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी निश्‍चित केलेल्या लक्ष्यांकित उद्दिष्टांच्या शंभर टक्के पुर्तीसाठी विभागाने काटेकोर नियोजन केले आहे.

लसीची गुणवत्ता व प्रभाव उत्तम राहण्यासाठी शितसाखळी व्यवस्थापन अत्यंत चाख ठेवण्यात आले असून राज्यस्तरापासून ते थेट ग्रामीण भागातील उपकेंद्रांपर्यंत लस पोहोचवताना आवश्यक तापमान राखले जाईल, यासाठी अद्ययावत कोल्ड बॉक्सचा वापर केला जात आहे, असे असे जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय उपायुक्तांनी कळविले आहे.

# अधिक मास संपताच विवाहसोहळ्यांना वेग

## जून-जुलैत केवळ १२ शुभ मुहूर्त; लग्नसराईची तयारी

**वर्धा/जनमाध्यम**

अधिक मासामुळे गेल्या महिनाभरापासून थांबलेले विवाहसोहळे आता पुन्हा सुरू होणार आहेत. १५ जून रोजी अधिक मास समाप्त झाल्यानंतर विवाहासाठी शुभ मुहूर्तांना सुरुवात झाली असून जून आणि जुलै या दोन महिन्यांत लग्नासाठी केवळ १२ शुभ मुहूर्त उपलब्ध असल्याने वर्धा जिल्ह्यासह राज्यभरातील विवाह मंडप, मंगल कार्यालये आणि संबंधित व्यावसायिकांमध्ये लगबग वाढली आहे. पंचांगानुसार, १६ जूनपासून ज्येष्ठ शुक्ल पक्ष सुरू झाला असून विवाहासाठी पहिला शुभ मुहूर्त २१ जून रोजी आहे. जून महिन्यात २१, २२, २३, २५, २६, २७ आणि २९ जून असे एकूण आठ शुभ दिवस उपलब्ध आहेत. तर जुलै महिन्यात १, ६, ७ आणि ११ जुलै असे केवळ चार शुभ मुहूर्त आहेत. त्यामुळे या कालावधीत विवाहसोहळ्यांची मोठी गर्दी अपेक्षित आहे. विशेष म्हणजे २५ जुलैपासून चातुर्मासाला सुरुवात होत असल्याने त्यानंतर चार महिन्यांसाठी



विवाहासह बहुतांश शुभकार्ये टाळली जातात. त्यामुळे अनेक कुटुंबांनी चातुर्मासापूर्वीच विवाह उरकण्याचे नियोजन सुरू केले आहे. परिणामी मंगल कार्यालये, बँड पथके, केटरर्स, सजावट व्यावसायिक आणि इतर सेवा पुरवठादारांकडे चौकशी व बुकिंगचे प्रमाण वाढले आहे.

वर्धा जिल्ह्यातही लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून सोन्याचे दागिने, वस्त्रखरेदी आणि विवाह साहित्याच्या खरेदीला वेग येण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. मोजक्या शुभ मुहूर्तांमुळे यंदाच्या विवाह हंगामात मोठी गर्दी होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# दारूच्या नशेत इसमाची आत्महत्या

**सेलू -** कोटंबा शिवारात एका इसमाने दारूच्या नशेत गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली. महादेव डोंगरे (४८, रा. कोटंबा) असे मृताचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार,महादेव डोंगरे हे दारूच्या नशेत होते. त्यानंतर त्यांनी शिवारातील झाडाला गळफास घेऊन जीवन संपाविले. काही वेळाने परिसरातील नागरिकांच्या निदर्शनास हा प्रकार आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला.शवविच्छेदनासाठी मृतदेह ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिस त्याचा तपास करीत आहेत. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे. प्रकरणी सेलू पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

# शालेय पोषण आहार कामगारांच्या मागण्यांसाठी खा.अमर काळेंचे आदिती तटकरे यांना पत्र

**वर्धा/जनमाध्यम**

राज्यातील मध्यान्न भोजन (शालेय पोषण आहार) योजनेत कार्यरत कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी खासदार अमर काळे यांनी पुढाकार घेतला आहे. महाराष्ट्र शालेय पोषण आहार कामगार संघटना फेडरेशन (सीआयटीयू) यांनी दिलेल्या निवेदनाची दखल घेत खासदार काळे यांनी राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांना पत्र पाठवून तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची



मागणी केली आहे. संघटनेच्या निवेदनानुसार, ५ जुलै २०२४ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत शालेय पोषण आहार कामगारांच्या मानधनात दरमहा एक हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, या निर्णयाची अद्याप पूर्ण अंमलबजावणी झालेली नसल्याने वाढीव मानधन तत्काळ लागू करावे व थकीत फरकाची रक्कमही अदा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत सात तास सेवा बजावणाऱ्या कामगारांना किमान १८ हजार रुपये मासिक मानधन द्यावे, दहा महिन्यांऐवजी वर्षभराचे मानधन मंजूर करावे, विद्यार्थी पटसंख्येच्या निकषामुळे कमी करण्यात आलेल्या कामगारांना पुन्हा सेवेत घ्यावे तसेच पेन्शन, भविष्य निर्वाह निधी, आरोग्य सेवा व इतर सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ लागू करावा, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत.कामगारांच्या न्याय्य मागण्यांवर शासनाने संवेदनशीलतेने विचार करून लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# शेतकऱ्यांनी पुरेसा पाऊस झाल्याशिवाय खरीप पेरणी करू नये

## एल निनोच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

भारतीय हवामान विभागाच्या सुधारित अंदाजानुसार २० जून पर्यंत मान्सून विदर्भात दाखल होण्याची दाट शक्यता वर्तविली आहे. मात्र एल निनोच्या प्रभावामुळे एकूण पाऊस सरासरीच्या ९२ टक्के म्हणजेच नेहमीपेक्षा कमी राहण्याचा आणि पावसाचा मोठा खंड पडण्याचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी केवळ सुरुवातीच्या हलक्या पावसावर घाईघाईने पेरणी करू नये, जोपर्यंत शेतात सलग व चांगला ८० ते १०० मिमी प्रभावी पाऊस होत नाही, तोपर्यंत प्रत्यक्ष पेरणी टाळावी, असे आवाहन कृषि विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

अपुऱ्या ओलाव्यामध्ये पेरणी केल्यास बियाणे वाया जाऊन शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते. याकरिता कृषी विज्ञान केंद्राने वर्तवलेल्या तांत्रिक शिफारशींचा आधार घेऊनच शेतकऱ्यांनी या हंगामात पीक व पेरणीचे नियोजन करावे. पावसाच्या लहरीपणामुळे पेरणीस उशीर झाल्यास पिकांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होतो.

**सोयाबीन :** सोयाबीन पेरणीसाठी २५ जून ते ८ जुलै हा कालावधी सर्वाधिक योग्य व शिफारसीत आहे. जर पेरणी ९ जुलै ते २२ जुलै या काळात लांबली तर सोयाबीनच्या उत्पादनात ३६ टक्क्यांपर्यंत मोठी घट येऊ शकते. २५ जुलैनंतर सोयाबीनची पेरणी पूर्णपणे टाळावी.

**कापूस :** कपाशीची पेरणी १० जुलैपर्यंत आटोपून घ्यावी. पेरणी १५ जुलैपर्यंत लांबल्यास कपाशीच्या उत्पादनात २४ टक्क्यांपर्यंत घट होण्याची शक्यता असते. मध्यम ते हलक्या जमिनीत कपाशीसाठी अति सघन लागवड पद्धतीचा (90x15 सें.मी.) अवलंब करावा.कमी पाऊस आणि कोरड्या हवामानात तग धरू शकतील अशा कमी कालावधीच्या सुधारित वाणांची निवड करावी. त्यात साधारणपणे सोयाबीनचे पीडीकेव्ही अंबा, सुवर्ण सोया हे वाण तर तूर पिकाचे पीडीकेव्ही आश्लेषा, बीडीएन-७१६, बीडीएन-७११ वाण उपयुक्त आहे.

**हवामान अनुकूल आंतरपीक पद्धती :** उत्पादनाची जोखीम कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी सलग पेरणीऐवजी आंतरपीक पद्धतीचा वापर करावा. यामध्ये सोयाबीन अधिक तूर (४:२), कपाशी अधिक सोयाबीन/उडीद/मूग (१:१), ज्वारी अधिक तूर (३:३ किंवा ४:२) किंवा कापूस अधिक तूर (६:१) किंवा ८:१) या पद्धतींचा प्रामुख्याने अवलंब करावा.

**ओलावा संवर्धन आणि ताण व्यवस्थापन :** पेरणीसाठी अनिवार्यपणे बीबीएफ यंत्राचा वापर करावा. यामुळे अतिवृष्टी झाल्यास पाण्याचा निचरा होतो आणि पावसाचा खंड पडल्यास जमिनीत ओलावा जास्त काळ टिकून राहतो. यंत्र उपलब्ध नसल्यास ६:१ पद्धत वापरावी. कापूस व तूर पिकात वखराच्या साहाय्याने वेळेवर हलकी डवरणी करावी, जेणेकरून जमिनीतील भेगा बुजून पाण्याचे बाष्पीभवन रोखता येईल.

ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात पावसाचा खंड पडल्यास पिकाचा ताण कमी करण्यासाठी पोटॅशिअम नायट्रेट १५० ते २०० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी किंवा १९:१९:१९ (५० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी) या विद्राव्य खतांची फवारणी करावी. तसेच नॅनो युरिया व नॅनो डीएपीचा वापर करावा.

**बीजप्रक्रिया अत्यंत अनिवार्य :** पेरणीपूर्वी बियाणाला बुरशीनाशक, कीटकनाशक आणि त्यानंतर रायझोबियम व पीएसबी या जैविक खतांची क्रमाने बीजप्रक्रिया करणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे पिकाची सुरुवातीची रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि रासायनिक खतांवरील खर्च कमी होतो. हवामान, कीड नियंत्रण आणि तांत्रिक सल्ल्यासाठी कृषी विभागाच्या महाविस्तार एआय ॲपचा वापर करावा. अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी सहाय्यक कृषी अधिकारी, उप कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी किंवा कृषी विज्ञान केंद्र, सेलसुरा यांच्याशी संपर्क साधावा, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी कळविले आहे.

**नावात बदल**

माझे पूर्वी SHEIKH RAFE HARUN असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील SHEIKH RAFE SHEIKH HARUN नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता : वॉर्ड नं ८ हिंगणघाट फैल पुलगाव ता देवळी जिल्हा वर्धा ४४२३०२**

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर R6644259 वरील माझे SHEIKH AASIF SHEIKH MEHBOOB KURESHI असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील SHEIKH AASIF SHEIKH MEHBOOB नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता : रहेमानिया मस्जिद जवळ पुलफैल वर्धा ४४२००१**

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २०१**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अचलपूर-परतवाड्यात शासकीय तांदळाचा काळाबाजार

**अचलपूर/वार्ताहर**

केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून राज्यातील रेशनधारकांना तांदूळ व गहू निःशुल्क वितरित करण्यात येत आहे. स्वस्त धान्य दुकानांमार्फत प्रत्येक रेशनधारकास दरमहा ३ किलो तांदूळ व २ किलो गहू दिला जातो. एका कुटुंबात चार सदस्य असल्यास १२ किलो तांदूळ व ८ किलो गहू मिळते. बहुतांश रेशनधारक या धान्याचा वापर करतात, तर काही लाभार्थ्यांकडे तांदूळ मोठ्या प्रमाणात शिल्लक राहतो. हा शिल्लक तांदूळ अचलपूर-परतवाडा शहरातील काही व्यापारी रेशनधारक व स्वस्त धान्य दुकानदारांशी संपर्क साधून खरेदी करीत असल्याची चर्चा आहे. तसेच काही रेशन दुकानदार आपल्या संपर्कातील इतर रेशन दुकानदारांच्या माध्यमातून हा तांदूळ खरेदी करीत असल्याची माहिती पुढे येत आहे. मात्र, अनेक प्रामाणिक रेशन दुकानदार शासनाच्या नियमानुसार लाभार्थ्यांना धान्याचे वितरण करीत आहेत. हजारो क्विंटल शासकीय तांदूळ अवैधरित्या जमा करून मध्यप्रदेशसह इतर राज्यांत पाठविला जात असल्याची माहिती असून, या अवैध खरेदी-विक्रीचे केंद्र बैतूल मार्गावरील काही दुकाने व गोदामे असल्याचे सांगितले जात आहे.

अचलपूर शहरातही शासकीय तांदळाचा अवैध वापर होत असल्याची चर्चा असून, काही दालमिलच्या नावाखाली तांदळाचा अवैध साठा करण्यात आल्याची माहिती पुढे आली आहे. पुरवठा विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष घातल्यास मोठ्या प्रमाणावरील हा अवैध तांदूळ व्यापार उघडकीस येण्याची शक्यता आहे. या तांदूळ तस्करी प्रकरणाची पोलिस व पुरवठा विभागाने सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

---

प्रोसेस नं.१३९८/२०२६
दिवाणी न्यायालय व स्तर, दर्यापूर
दि.१७.०६.२०२६

## जाहीर नोटीस

वि.सहदिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय
किरकोळ अर्ज क्र./२३५/२०२६ दिनांक १८.०७.२०२६

**अर्जदार** - १. सविता पुरणसिंग राठोड, वय ४६ वर्षे, धंदा - घरकाम
२. धिरज पुरणसिंग राठोड वय ३६ वर्षे, धंदा - मजुरी
३. गोपाल पुरणसिंग राठोड वय २० वर्षे, धंदा - मजुरी
सर्व रा.टाकोनकार पुरा, दर्यापूर ता.दर्यापूर, जि.अमरावती

**--- विरुध्द ---**

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **पुरणसिंग रामकृष्ण राठोड** हे दिनांक **२३.१२.२०२०** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१७.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुजी, मौजे मुऱ्हा खु. येथील भूमापन गट नं.१०७ याचे एकुण क्षेत्र ०१ हे.६७ आर यापैकी लिहून देणार **१) विनोद महादेव पांडे** यांचे मालकीचे क्षेत्र ०१ हे.६७ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वादद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.
अमरावती
दिनांक १७.०६.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
ॲडव्होकेट के.डी.शिराळे,
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बॅंकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुजी, मौजे मुऱ्हा खु. येथील भूमापन गट नं.९८ याचे एकुण क्षेत्र ०० हे.७५ आर यापैकी लिहून देणार **१) गोपाल पुरुषोत्तम नवले** यांचे मालकीचे क्षेत्र ०० हे.७५ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वादद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.
अमरावती
दिनांक १७.०६.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
ॲडव्होकेट के.डी.शिराळे,
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बॅंकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुजी, मौजे मुऱ्हा खु. येथील भूमापन गट नं.१०२ याचे एकुण क्षेत्र ०० हे.६३ आर यापैकी लिहून देणार **१) विनोद महादेव पांडे** यांचे मालकीचे क्षेत्र ०० हे.६३ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वादद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.
अमरावती
दिनांक १७.०६.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
ॲडव्होकेट के.डी.शिराळे,
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बॅंकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी खालील नमुद मालमत्ता (शेतजमीन) **जयकुमार रामकृष्ण झासकर,** रा.वायगांव, ता.भातकुली, जि.अमरावती यांच्याकडून खरेदी करण्याचा सौदा केलेला आहे.

**शेतजमिनीचे वर्णन** - नोंदणी तुकडी भातकुली कचेरीचे व जिल्हा परिषद अमरावतीचे हद्दीतील ग्रामपंचायत वायगांव असलेले मौजे दगडागड, प्रगणे पुर्णा नगर, ता.भातकुली, जि.अमरावती येथील भूमापन क्र. व उपविभाग ६०, भो.वर्ग-१, मधील ० हे.८१ आर + पो.ख.०.०२ आर असे एकूण ०.८३ हे.आर, आकार रु.४.७० पैसे शेतजमीन असून यापैकी माझ्या मालकी व ताब्यातील उत्तर-दक्षिण वाटणीची पश्चिमेकडील भागाची ०.४० हे.आर + पो.ख.०.०२ आर. आकार रु.२.३२, काळी कोरडवाहू शेतजमीन झाडाझुडपासह व तदंगभूत वस्तुसह, याची चतुःसिमा

पुर्वेस - विक्रांत रामकृष्ण अढाऊ यांचे शेत
पश्चिमेस - समाधान महादेव झासकरे यांचे शेत
उत्तरेस - वायगांव विशी रस्ता यांचे शेत
दक्षिणेस - आतीश रविंद्र हजारे यांचे शेत

उपरोक्त नमुद शेतजमिनीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, गहाण, बोझा, वारस हक्क, जप्ती, कर्ज, ताबा, बक्षीस पत्र, मृत्यूपत्र, सरकारी, निमसरकारी कर्ज, न्यायालयीन प्रकरण, वादविवाद, लिज पेन्डंट अथवा कोणत्याही कुठल्याही प्रकारचा अधिकार असल्यास सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ०७ दिवसांचे आत पूर्ण लेखी पुराव्यासह कागदोपत्री वरील नमुद पत्त्यावर संपर्क साधावा. मुदतीनंतर माझे पक्षकार सदहू शेतजमिनीची खरेदी करण्यास स्वतंत्र राहतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

(ॲड.बी.एस.तिवारी)
कार्या.- मोरबाग, अमरावती
ता.जि.अमरावती
मो.९४०५३५०८११

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.३६०/२०२६ ने.ता.१४.०७.२०२६

**अर्जदार** - १. श्रीमती शालू पंडीत शिंदे, वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम
२. राहूल पंडीत शिंदे, वय २५ वर्षे, धंदा - शेती
३. मिना पंडीत शिंदे, वय ३० वर्षे, धंदा - घरकाम
४. श्रीमती रंगुबाई मोतीराम शिंदे, वय ७० वर्षे, धंदा - घरकाम
सर्व रा.खोपडा, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडील तर अर्जदार नं.४ चा मुलगा नामे **पंडीत मोतीराम शिंदे** हे दि.**१६.०३.२०२६** रोजी **खोपडा** ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १५.०६.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
**एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--

पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

## उपविभागीय अधिकारी, अचलपूर यांचे कार्यालय

क्रमांक-भु.सं./अ.का./कावी-३३८/२०२६ दिनांकः-१२/०६/२०२६

### कलम ११ अधिसुचना

(भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)

**क्रमांक - भु.सं.प्र.क्र. ०६/४७/२०२४-२५ मौजा असदपूर, ता. अचलपूर**

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसुचना महसुल व वन विभाग क्र संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे ज्याचा निर्देश 'उक्त अधिसूचना' असा करण्यात आला आहे.) याव्दारे, असे अधिसूचीत केले आहे की, उक्त अधिनियामाच्या कलम ३ च्या खंड (झेड ओ) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी एखादया जिल्हयातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमिन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या **अमरावती** जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यास या सोबत जोडलेल्या **अनुसुची एक मध्ये** अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश **'उक्त जमिन'** असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा केला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या **अनुसुची दोन मध्ये** दिलेले आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावीत भुमीसंपादनाच्या अनुषगांने प्रकरणातील नमुद सर्व्हे क्रमांकातील जमीनीच्या भूसंपादनामुळे बाधीत व्यक्तीचे विस्थापन होत आहे. त्याची कारणे या सोबत जोडलेल्या **अनुसुचि तीन मध्ये** दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल या अनुसुचिमध्ये कारणे नमुद करावीत.)

आणि ज्याअर्थी, सामाजीक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसुचि चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील या सोबत जोडलेल्या **अनुसूची पाचमध्ये** दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर या अनुसुचिमध्ये तपशिल नमुद करावा.)

त्याअर्थी आता असे घोषीत करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती हि अधिसूचना प्रसिध्द दिनांकापासुन ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधी पर्यत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातुन सुट देता येईल.

परंतु, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लघंन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडुन भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (५) अनुसार जिल्हाधिकारी भुमीसंपादन, पुनर्वसन पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश **'उक्त नियम'** असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भुमिअभिलेखा च्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषीत करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमा कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमा खालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी अचलपूर** म्हणुन मला पदनिर्देशित केलेले आहे.

**अनुसुचि - एक**
**जमिनीचे वर्णन**
**गाव :- असदपूर तालुकाः अचलपूर जिल्हाः- अमरावती**
**भू.सं.प्र.क्र. ०६/४७/२०२४-२५ असदपूर**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर / गट नंबर | हे. आर |
|---|---|---|
| १ | ५१० | ०.१४ |
| २ | ५१५ | ०.९१ |
| ३ | ५१७पै | ०.१२६ |
| | ५१७पै | ०.११७ |
| | ५१७पै | ०.१२६ |
| | ५१७पै | ०.११७ |
| | ५१७पै | ०.१२६ |
| | ५१७पै | ०.११७ |
| ४ | ५१९ | ०.५४ |
| ५ | ५२० | ०.३३ |
| ६ | ५३० | १.२६ |
| ७ | ५३१ | ३.२० |
| ८ | ५३३ | २.६३ |
| | | ९.७३९ |

**अनुसुची दोन**
**सार्वजनीक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :-** चंद्रभागा बॅरेज बृहत लघु प्रकल्प

**प्रकल्प कार्याचे वर्णन :-** चंद्रभागा बॅरेज बृहत लघु प्रकल्प अंशतः बाधीत प्रकल्पाचे कामाकरीता

**सामाजाला मिळणारे लाभः-** या मध्यम प्रकल्पाद्वारे जमिनीस प्रत्यक्ष सिंचनाचा फायदा होत असुन लाभ क्षेत्रातील संबधीत शेतकऱ्यांचे जिवनमान उचंवणार आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढुन कृषि संपत्तीत वाढ होईल. पिण्याचे पाण्याचा पुरवठा, उद्योगास पाणीपुरवठा, मत्स्यव्यवसाय, पशुसंर्वधनामध्ये वाढ, कुटिर उद्योगास फायदा व रोजगार निर्मीती इत्यादी ग्रामिण पायाभुत सुविधांचा लाभ होईल.

**अनुसुची तीन**

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे** -प्रस्तावात नमुद प्रकरणातील भुसंपादित सर्व्हे क्रमांक मधील जमिनीमुळे बाधीत व्यक्तीचे विस्थापन होत नसल्यामुळे माहिती निरंक

**अनुसुची चार**
**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४अ महसुल व वन विभाग मुंबई दिनांक १३ मार्च २०१५ मधील अधिसुचने अन्वये सुट देण्यात आली आहे.

**अनुसुची पाच**
**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

**(अ) प्रशासक म्हणुन नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम :-** प्रस्तावात नमुद भुसंपादित सर्व्हेक्रमांक मधील जमीन प्रकल्पाकरिता संपादित करावयाची असल्यामुळे व प्रस्तावित जमिनीत पुनर्वसन व पुनर्वसाहत होत नाही म्हणून प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.

**(ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- निरंक**

(क) ज्या अधिसुचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशिलः- **निरंक**

टिप - उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक :- /०६/२०२६
ठिकाणः- अचलपूर

**(बळवंत अरखराव)**
**उपविभागीय अधिकारी तथा**
**भुसंपादन अधिकारी, अचलपूर**

जिमाका./अम./जाहि./३७/२०२६

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २८०**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

गुरुवार, दि. १८ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# ‘बोलो जुबा केसरी’वर तुकाराम मुंढेंचा दणका

**तरुण पिढीच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांना कायद्याचा इशारा! ग्राहक संरक्षण आणि सामाजिक जबाबदारीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ विवेक वानखडे

**यवतमाळ, दि. १७ : १४ मार्च रोजी दैनिक जनमाध्यम मध्ये माझा लेख प्रकाशित झाला त्यामध्ये ‘तरुण पिढी, सरकार व प्रसार माध्यमांची जबाबदारी’ या लेखातून तरुण पिढीवर पानमसाला, गुटखा आणि सेलिब्रिटींच्या जाहिरातींचा होणारा दुष्परिणाम अधोरेखित करण्यात आला होता.**



हा लेख त्यांनी वाचला नसावा मात्र त्याच अनुषंगाने अन्न व औषध प्रशासन (FDA) कमिशनर(आयुक्त) तुकाराम मुंढे यांनी केलेल्या धडाकेबाज कारवाईमुळे सामाजिक जबाबदारी, ग्राहक हक्क आणि मानवाधिकारांच्या अंमलबजावणीचा नवा आदर्श निर्माण झाल्याची भावना व्यक्त होत आहे. २३ मे रोजी FDA आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर अवघ्या काही दिवसांत मुंढे यांनी २०३ कारवाया करून १०२ जणांना अटक केली. या कारवाईमुळे भेसळमाफिया आणि पानमसाला उद्योगात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, ‘बोलो जुबा केसरी’ या जाहिरातींद्वारे पाच रुपयांच्या पाउचमध्ये केसर असल्याचा दावा करणाऱ्या कंपन्यांच्या जाहिरातींवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याप्रकरणी विमल अग्रवाल, तसेच अभिनेते शाहरुख खान, अजय देवगण आणि टायगर श्रॉफ यांना नोटिसा बजावण्यात आल्याने देशभर चर्चा रंगली आहे. आजची तरुण पिढी चित्रपट कलाकारांना आदर्श मानते. त्यांच्या बोलण्यापासून, वेशभूषेपासून ते खाण्यापिण्याच्या सवयींपर्यंत अनेक बाबींचे अनुकरण केले जाते. अशा परिस्थितीत पानमसाल्यासारख्या आरोग्यास अपायकारक उत्पादनांच्या जाहिरातींमधून तरुणांना चुकीचा संदेश जात असल्याची चिंता व्यक्त




केली जात आहे. स्वतः या उत्पादनांचे सेवन न करणारे सेलिब्रिटी केवळ आर्थिक फायद्यासाठी अशा जाहिराती करतात, हा नैतिकतेचाही प्रश्न बनला आहे. ASCI (Advertising Standards Council of India) च्या नियमानुसार पानमसाल्याच्या जाहिरातींवर थेट बंदी नसली, तरी FSSAI (Food Safety and Standards Authority of India) च्या नियमांनुसार आरोग्यविषयक इशारा देणे बंधनकारक आहे. प्रत्यक्षात अनेक जाहिरातींमध्ये या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे दिसून येत आहे.यापूर्वी दिल्ली सरकारनेही काही नामवंत कलाकारांना अशा जाहिराती न करण्याबाबत पत्रे दिली होती. तर अमिताभ बच्चन यांनी ‘कमला पसंत’च्या जाहिरातीवर टीका होताच करार रद्द करून मानधन परत केले होते. त्यामुळे सामाजिक जबाबदारी जपणाऱ्या आणि केवळ आर्थिक लाभासाठी जाहिराती करणाऱ्या कलाकारांमधील फरक अधोरेखित झाला आहे. पाच रुपयांच्या पाउचमध्ये महागडा केसर असल्याचा दावा कितपत खरा आहे, ग्राहकांची दिशाभूल झाली आहे का, आणि याप्रकरणी फसवणुकीचे गुन्हे दाखल होतील का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेला हा लढा केवळ भेसळविरोधी नाही, तर तरुण पिढीच्या आरोग्याचे, ग्राहकांच्या हक्कांचे आणि समाजहिताचे संरक्षण करणारा लोकहिताचा लढा असल्याचे मत नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## पुसद मध्ये वरळी-मटक्याचे जाळे फोफावले..!

### अवैध धंद्यांवर धाडसत्राची नागरिकांची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. १७ :** शहर पोलीस स्टेशन हद्दीतील इटावा परिसर, भिलवाडी, आठवडी बाजार तसेच शहरातील काही भागांत कथित वरळी-मटका व इतर अवैध धंद्यांचे जाळे दिवसेंदिवस वाढत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

अनेक ठिकाणी खुलेआम मटक्याचे काउंटर सुरू असून सकाळपासून रात्री उशिरापर्यंत संशयास्पद हालचाली सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे काही शाळांच्या परिसरा लगतही मटक्याचे व्यवहार सुरू असल्याची चर्चा असून यामुळे विद्यार्थी आणि युवकांवर विपरीत परिणाम होण्याची भीती पालकांनी व्यक्त केली आहे. इटावा बिट परिसरात सुमारे दहा मटक्याचे काउंटर सुरू असून त्यामागे काही प्रभावशाली व्यक्ती व राजकीय पाठबळ असल्याचे आरोपही होत आहेत. मात्र, या दाव्यांची अधिकृत पुष्टी झालेली नाही. दरम्यान, जिल्ह्यातील इतर अवैध धंद्यांवर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेकडून कारवाया होत असताना कथित मटका व्यवसायावर अपेक्षित कारवाई होत नसल्याने नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सामाजिक कार्यकर्त्यांच्या मते, जुगाराच्या विळख्यात अडकून अनेक कुटुंबे आर्थिक आणि सामाजिक संकटात सापडतात. याप्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निष्पक्ष चौकशी करून अचानक धाडसत्र राबवावे, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि अवैध धंद्यांना कायमस्वरूपी आळा घालावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

## ‘करोडोंच्या पुलात रेल्वे कंत्राटदारांची धूळखाऊ नीती..!

### शिंदीजवळील रेल्वे पुलाच्या संथ कामावर संताप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दारव्हा, दि. १७ :** दारव्हा–दिग्रस मार्गावरील शिंदी गावालगत सुरू असलेल्या रेल्वे पुलाच्या संथ आणि निष्काळजी बांधकामामुळे नागरिकांना अक्षरशः धुळीची शिक्षा भोगावी लागत आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून रखडलेल्या या कामामुळे परिसरातील वाहतूक धोकादायक बनली असून कंत्राटदाराच्या ढिसाळ नियोजना विरोधात ग्रामस्थ आणि वाहन चालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



पुलाच्या बांधकामामुळे वाहतुकीसाठी तयार करण्यात आलेला तात्पुरता पर्यायी रस्ता अत्यंत निकृष्ट दर्जाचा असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. रस्त्यावर गिट्टी, डांबरीकरण किंवा योग्य दाबणी न करता केवळ माती टाकण्यात आल्याने वाहनांची ये-जा होताच धुळीचे प्रचंड लोट उडत आहेत. परिणामी समोरून येणारी वाहने दिसेनाशी होत असून अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. धुळीमुळे दुचाकीस्वार, चारचाकी चालक आणि पादचारी यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा वाहनांवरील नियंत्रण सुटण्याच्या घटनाही घडल्याचे स्थानिकांनी सांगितले. गंभीर परिस्थिती असूनही कंत्राटदाराकडून पाण्याची फवारणी, रस्त्याची दुरुस्ती किंवा सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. करोडो रुपये खर्चाचा हा पूल अद्याप पूर्णत्वास न गेल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे. आणखी किती वर्षे धूळ खाऊन प्रवास करायचा?” असा सवाल वाहनचालकांनी उपस्थित केला आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून पुलाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे, पर्यायी रस्त्याची दर्जेदार दुरुस्ती करावी आणि धूळ नियंत्रणासाठी त्वरित उपाययोजना कराव्यात, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

## विमा-शि संघाच्या आंदोलनाचा धसका..!

### १५ वर्षांपासून रखडलेल्या भविष्य निर्वाह निधी चिठ्ठ्यांना अखेर गती!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी


**राळेगाव, दि. १७ :** विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे तब्बल पंधरा वर्षांपासून प्रलंबित असलेल्या शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधी (जीपीएफ) हिशोब चिठ्ठ्यांच्या कामाला अखेर गती मिळाली आहे. संघटनेने २५ जूनपासून बेमुदत ठिय्या आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर शिक्षण विभाग प्रशासन खडबडून जागे झाले असून रखडलेली प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू करण्यात आली आहे.

दिनांक ८ जून रोजी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने माध्यमिक शिक्षणाधिकारी व वेतन पथक अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले होते. या निवेदनात, जिल्ह्यातील प्रत्येक शिक्षकाला त्याच्या भविष्य निर्वाह निधीचा संपूर्ण हिशोब व चिठ्ठी प्रत्यक्ष हातात मिळेपर्यंत संघटनेचे पदाधिकारी कार्यालयातून उठणार नसल्याचा स्पष्ट इशारा देण्यात आला होता. संभाव्य आंदोलनाची गंभीर दखल घेत शिक्षणाधिकारी पागोरे यांनी वेतन पथक अधीक्षक वानखेडे तसेच संबंधित कर्मचाऱ्यांची तातडीची बैठक घेतली. बैठकीत प्रलंबित जीपीएफ हिशोब चिठ्ठ्यांचे काम तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार गेल्या आठ दिवसांत ५० शाळांच्या हिशोब चिठ्ठ्या तयार करण्यात आल्या असून आणखी ५० शाळांच्या चिठ्ठ्यांच्या वाटपाचे नियोजन जाहीर करण्यात आले आहे. दरम्यान, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत सातत्याने पाठपुरावा करणारे शिक्षक आमदार सुधाकरराव अडबाले यांनीही शिक्षण संचालकांना पत्र देऊन प्रकरणात लक्ष घालण्याची मागणी केली होती. त्यांच्या पाठपुराव्यामुळे ही जिल्ह्यातील प्रलंबित हिशोबांच्या कामाला गती मिळाल्याचे सांगितले जात आहे. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने २२ जूनपर्यंत सर्व प्रलंबित काम पूर्ण करण्याची मुदत प्रशासनाला दिली आहे. निर्धारित कालावधीत काम पूर्ण न झाल्यास २५ जूनपासून बेमुदत ठिय्या आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघाचे जिल्हाध्यक्ष पवन बन आणि जिल्हा कार्यवाह रामकृष्ण जिवतोडे यांनी दिला असल्याची माहिती श्रावण सिंग वडते यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. आंदोलनाच्या इशाऱ्यानेच पंधरा वर्षांचा प्रशासकीय कुंभकर्ण जागा झाला आता प्रत्येक शिक्षकाच्या हातात जीपीएफ हिशोब चिठ्ठी येईपर्यंत लढा सुरूच राहणार,अशी ठाम भूमिका विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने घेतली आहे.

## थोडक्यात

### झाडझुडप्यांच्या विळख्यात डीपी..,! पावसाळ्यापूर्वी उपाययोजना करा, अन्यथा अंधाराची भीती!

**झरी :** मुकुटबन परिसरातील सुमारे २५ ते ३० डीपी (विद्युत रोहित्र) योग्य देखभालीअभावी झाडझुडपे, वेलीं आणि कचऱ्याच्या विळख्यात अडकले आहेत. अनेक ठिकाणी वीजवाहिन्या आणि खांबही वृक्षांच्या फांद्यांनी वेढले गेल्याने पावसाळ्यात वीजपुरवठा वारंवार खंडित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. फ्यूज उडणे, डीओ पडणे आणि तांत्रिक बिघाडामुळे नागरिकांसह व्यापारी, लघुउद्योग व विजेवर अवलंबून असलेल्या व्यवसायांना मोठा फटका बसू शकतो. या पार्श्वभूमीवर मुकुटबन सहयोग ग्रुप व निसर्ग पर्यावरण मंडळाने महावितरण प्रशासनाला निवेदन देत पावसाळ्यापूर्वी डीपी परिसरातील झाडझुडपे हटविणे, वीजवाहिन्या मोकळ्या करणे तसेच डीपीमध्ये किटकॅट आणि फ्युज तारा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास मुकुटबन परिसराला वारंवार अंधाराचा सामना करावा लागू शकतो, असा इशारा निवेदनातून देण्यात आला.यावेळी निसर्ग पर्यावरण मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र गेडाम, उपाध्यक्ष विलास चिद्दलवार, नेताजी पारखी, संदीप धोटे, संदीप ठेंगडे, सुधाकर नरांजे, माधव चाटे, गणेश बेलेकार, चिंतामण पथाडे, महेश मेश्राम आणि व्यंकटेश येंगटीवार उपस्थित होते.



### आंतरराष्ट्रीय मल्लखांब दिनी प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन..

**पारंपरिक खेळाला जागतिक झेप देण्याचा संकल्प**

**यवतमाळ :** हनुमान व्यायाम शाळा क्रीडा मंडळात १५ जून रोजी आंतरराष्ट्रीय मल्लखांब दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या हस्ते नव्या मल्लखांब अकॅडमीच्या प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी आमदार मांगुळकर, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रताप पारस्कर, राजू देशपांडे, रवींद्र (पप्पू) तिवारी, प्रकाश दर्शनवार, दत्ता गाडगे व अभिजीत पवार उपस्थित होते. श्री हनुमान व बालमभट्ट दादा देवधर यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मल्लखांब अकॅडमीचे प्रमुख संजय सातारकर यांनी मल्लखांब हा महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेला अस्सल भारतीय खेळ असून त्याला जागतिक स्तरावर पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त केला. खेळाडूंनी दोरी व खांबावरील आकर्षक प्रात्यक्षिके सादर केली. राष्ट्रीय, विद्यापीठ व राज्यस्तरीय खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला पालक व क्रीडाप्रेमींची मोठी उपस्थिती लाभली.





### आ.धीरज लिंगाडे यांना शिक्षक महासंघाचे निवेदन

**यवतमाळ :** जिल्हा परिषद व राज्यस्तरीय शिक्षकांच्या विविध प्रलंबित समस्यांवर पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करून न्याय मिळवून द्यावा, अशी ठाम मागणी शिक्षक संघटना समन्वय महासंघाने पदवीधर मतदारसंघाचे विधान परिषदेचे आमदार धीरज लिंगाडे यांच्याकडे केली. जिल्हा परिषद सभागृहात आयोजित शिक्षक समस्या निवारण सभेदरम्यान महासंघाने निवेदन सादर करून १०, २० व ३० वर्षांची कालबद्ध वेतनश्रेणी, सर्व विषय शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी, सादिल व गणवेश अनुदानात वाढ, सण अग्रीम पूर्ववत सुरू करणे तसेच बीएलओ व जनगणना काम करणाऱ्या शिक्षकांना विमा संरक्षण देण्याची मागणी केली. बैठकीत शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी अनेक प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले. मात्र उर्वरित मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास शिक्षकांमधील असंतोष वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. यावेळी महासंघाचे किरण मानकर, नदीम पटेल, आसाराम चव्हाण, तुषार आत्राम, अवधूत वानखेडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## नगर परिषदेची स्पष्ट भूमिका ‘शिष्टाचार पाळा, परवानगीशिवाय चित्रीकरण नको’

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १७ :** दि. ११ जून २०२६ रोजी यवतमाळ नगर परिषदेच्या अध्यक्ष कक्षात घडलेल्या वादाच्या घटनेनंतर विविध माध्यमे आणि सामाजिक माध्यमांवर सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर नगर परिषद प्रशासनाने आपली अधिकृत भूमिका स्पष्ट केली आहे. अध्यक्ष पद हे लोकशाही व्यवस्थेतील सन्माननीय आणि जबाबदारीचे पद असून त्याच्या प्रतिष्ठेचे जतन करणे ही सर्व संबंधितांची सामूहिक जबाबदारी असल्याचे मुख्याधिकार शुभम क्यातमवार यांनी प्रशासनाच्या वतीने म्हटले आहे. प्रशासनाने स्पष्ट केले की, नगर परिषदेत विविध राजकीय पक्षांचे लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करीत असतात. त्यांच्या सूचना, अभिप्राय आणि




विकासकामांबाबतच्या मागण्यांचे स्वागतच केले जाते. मात्र, मतभेद व्यक्त करताना परस्पर सन्मान, शिष्टाचार आणि संस्थात्मक मर्यादांचे पालन होणे अत्यावश्यक आहे. नगराध्यक्षांच्या दालनात अथवा नगर परिषदेच्या कार्यालयीन परिसरात कोणत्याही प्रकारचे व्हिडिओ चित्रीकरण, ध्वनिमुद्रण किंवा थेट प्रक्षेपण करण्यापूर्वी संबंधित प्राधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तसेच, सामाजिक माध्यमांवर अपूर्ण, दिशाभूल करणारी किंवा एखाद्या व्यक्ती अथवा संस्थेची प्रतिमा मलीन करणारी माहिती प्रसारित करू नये, अन्यथा माहिती तंत्रज्ञान अधिनियम व इतर कायदेशीर तरतुदींनुसार कारवाई होऊ शकते, असा इशाराही देण्यात आला आहे.शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या हितासाठी सर्व पक्षांनी परस्पर सहकार्य, संवाद आणि सभ्यतेची भूमिका स्वीकारावी, असे आवाहन यवतमाळ नगर परिषद प्रशासनाने केले आहे.

## आरोप बिनबुडाचे, पालिकेला बीओटी प्रकल्पातून कोट्यवधींचे उत्पन्न

### - मुख्याधिकारी क्यातमवार यांचे स्पष्टीकरण

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १७ :** नेताजी मार्केट लगतची जागा ९० वर्षांसाठी ‘लीज’वर देण्याच्या निर्णयावरून सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांना यवतमाळ नगरपालिकेने १७ जुन रोजी पत्रकार परिषदेत उत्तर दिले. ही संपूर्ण प्रक्रिया शासनाच्या नियमांनुसार पार पडली असून, संबंधित जागेच्या ‘लीज’मधून पालिकेला तब्बल ९५ कोटी रुपये आणि भविष्यात दरवर्षी दोन ते तीन कोटी रुपयांचे कर उत्पन्न मिळणार असल्याची माहिती मुख्याधिकारी शुभम क्यातमवार यांनी दिली.



क्यातमवार म्हणाले की, या जागेवर व्यापारी संकुल उभारण्याची संकल्पना नगर पालिकेचीच होती. प्रारंभी १०६ कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. चार वेळा निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. मात्र विविध कारणांमुळे ती पूर्णत्वास जाऊ शकली नाही. शासनाच्या आवश्यक मंजुरीनंतर पुन्हा ९५ कोटी रुपयांच्या किमतीने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. दुसऱ्या प्रयत्नात तीन निविदाधारकांनी सहभाग घेतला आणि सर्वाधिक ९५ कोटी रुपयांची निविदा सादर करणाऱ्या छत्रपती संभाजीनगर येथील ‘सिमर प्राइड’ कंपनीची निवड करण्यात आली. या प्रकल्पाअंतर्गत चार मजली आधुनिक व्यापारी संकुलात ५६० गाळे, प्रत्येक गाळ्या साठी पार्किंग सुविधा आणि मल्टिप्लेक्सची उभारणी केली जाणार आहे. तसेच नगरपालिकेला अडीच हजार चौरस फुटांचे कार्यालयीन गाळेही उपलब्ध होणार आहेत. प्रकल्पाचा बांधकाम खर्च सुमारे दीडशे कोटी रुपये असून, कंत्राटदाराकडून जवळपास अडीचशे कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. पालिकेकडे स्वनिधी नसल्याने बीओटी तत्त्वावर हा निर्णय घेण्यात आला असून, याबाबत पसरविल्या जाणाऱ्या अफवा आणि आरोप पूर्णपणे बिनबुडाचे असल्याचे मुख्याधिकारी क्यातमवार यांनी स्पष्ट केले.

## नगरपरिषद- महसूल प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे इंग्रज कालीन पांदण रस्ता गिळंकृत..!

**आनंदाशिष नगर ले-आऊट मंजुरी रद्द करण्याची मागणी**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. १७ :** पुसद शहरालगतच्या मौजा पुराड खंड-२ येथील शेत सर्वे क्रमांक १०/४ मधील आनंदाशिष नगर या निवासी ले-आऊटसंदर्भात गंभीर अनियमिततेचा आरोप करत काही सामाजिक कार्यकर्त्यांनी नगरपरिषद व महसूल प्रशासनाकडे तक्रार दाखल केली आहे. इंग्रजकालीन ३३ मीटर रुंदीचा पांदण रस्ता अतिक्रमित करून प्लॉट विक्री केली जात असल्याने ग्राहकांची फसवणूक होत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला असून, संबंधित ले-आऊटची अंतिम मंजुरी रद्द करून पांदण रस्ता तातडीने मोकळा करण्याची मागणी करण्यात आली आहे.




तक्रारीनुसार, आनंद अशोकराव शिरमवार व आशिष अशोकराव शिरमवार यांनी १२ ऑगस्ट २०२४ रोजी नगरपरिषदेकडे ले-आऊट मंजुरीसाठी अर्ज सादर केला होता. त्यानंतर १३ नोव्हेंबर २०२४ रोजी निवासी प्रकल्पासाठी अंतिम अभिन्यास मंजुरी देण्यात आली. मात्र, उपअधीक्षक भूमी अभिलेख, पुसद यांनी १ डिसेंबर २०२३ रोजी दिलेल्या पत्रानुसार संबंधित सर्वे क्रमांकांना लागून ३३ मीटर रुंदीचा इंग्रज कालीन पांदण रस्ता अस्तित्वात असल्याचे नमूद केले होते. सामाजिक कार्यकर्त्यांचा आरोप आहे की, हा पांदण रस्ता ताब्यात घेऊन त्या ठिकाणी प्लॉटची आखणी करण्यात आली असून सिमेंट-विटांच्या पक्क्या बांधकामाद्वारे रस्त्याचे अस्तित्वच नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच मोजणी नकाशात पांदण रस्त्याचा उल्लेख नसल्याने भूमी अभिलेख विभागाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. नगरपरिषदेच्या अंतिम मंजुरी आदेशातील अट क्रमांक ४ नुसार, अभिन्यासाच्या हद्दी व क्षेत्रफळाबाबत कोणताही वाद किंवा तफावत आढळल्यास मंजुरी रद्द समजण्यात येईल, अशी स्पष्ट तरतूद आहे. असे असतानाही प्रशासनाने कोणतीही कारवाई न केल्याचा आरोप तक्रारकर्त्यांनी केला आहे. या प्रकरणी २९ जानेवारी २०२६ रोजी तक्रार आणि ४ मे २०२६ रोजी स्मरणपत्र देऊनही पाच महिन्यांपासून कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. त्यामुळे मुख्याधिकारी, तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी यांच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित करत तक्रारकर्त्यांनी आता जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे दाद मागण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान, संबंधित आरोपांबाबत प्रशासन आणि ले-आऊट धारकांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

## अल्पवयीन मुलीचा छळ; पांढरकवड्यात तरुणावर 'पोक्सो'

**पांढरकवडा, दि. १७ :** इंस्टाग्रामवर १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचा सतत मॅसेज पाठवून लैंगिक छळ करणाऱ्या जय प्रभाकर भुरे (वय २१, रा. सायखेडा, ता. केळापूर) या तरुणाविरुद्ध पांढरकवडा पोलिसांनी पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला. आरोपी मागील दोन महिन्यांपासून पीडितेच्या मनाविरुद्ध मॅसेज पाठवून मानसिक त्रास देत होता. १६ जून रोजी त्याने पुन्हा कॉल करून दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. अखेर पीडितेच्या वडिलांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सचिन रघुपती करत आहेत.

# अमरावती स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक आज

## -मतदानासाठी जिल्हा प्रशासनाची तयारी पूर्ण

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अमरावती स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया दिनांक १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत पार पडणार आहे. जिल्हा प्रशासनाने मतदानाची सर्व तयारी पूर्ण केली असून, सर्व मतदान पथके पोलीस बंदोबस्तात साहित्यासह केंद्रांवर रवाना झाली आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली आहे. सहाय्यक निवडणूक निर्णय



अधिकारी म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे आहेत. या निवडणुकीत शांततेत व सुरळीतपणे मतदान करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

या निवडणुकीत एकूण ३ उमेदवार रिंगणात असून, प्रत्यक्ष मतदान पसंतीक्रम पद्धतीने होणार आहे. यामध्ये मतदारांना उमेदवारांच्या संख्येइतके पसंतीक्रम देण्याची मुभा असेल. या मतदारसंघांत एकूण ४५१ मतदार असून, यामध्ये २२६ महिला व २२५ पुरुष मतदारांचा समावेश आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, नगरपंचायत आणि महानगरपालिकेचे सदस्य या निवडणुकीत मतदान करतात. मतदानाकरिता उपविभाग स्तरावर एकूण ७ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. यामध्ये धारणी मतदान केंद्रावर ४२ मतदार (२० पुरुष, २२ स्त्री), अचलपूर ☞ (पान २ वर)

## आज 'ड्राय डे'

### जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश-

भारत निवडणूक आयोगाने अमरावती स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या विधान परिषदेची निवडणूक घोषित केली आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यात मतदानाच्या दिवशी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आदेश जारी केले असून, त्यानुसार संपूर्ण जिल्ह्यात 'कोरडा दिवस' पाळण्यात येणार आहे.या आदेशानुसार, गुरुवार, १८ जून २०२६ रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत म्हणजेच मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अमरावती जिल्ह्यातील सर्व ठोक आणि किरकोळ मद्यविक्रीची दुकाने पूर्णपणे बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पूर्वी जारी करण्यात आलेल्या आदेशांमध्ये अंशतः बदल करून प्रशासनाने हा सुधारित निर्णय घेतला आहे. संबंधित सर्व अबकारी अनुज्ञप्तीधारकांनी या आदेशाची काटेकोरपणे नोंद घ्यावी, असे प्रशासनातर्फे स्पष्ट करण्यात आले ☞ (पान २ वर)

# सरपंच अपात्रतेच्या आदेशावर उच्च न्यायालयाची स्थगिती

## तुळजापूर जहागीरच्या राजकारणात नवे वळण; २५ जूनच्या सुनावणीकडे लक्ष

**अचलपूर/प्रतिनिधीः-** तालुक्यातील तुळजापूर जहागीर ग्रामपंचायतीचे सरपंच तथा सदस्य ज्ञानेश्वर सुभाष ढेपे यांना अपात्र ठरविण्याच्या आदेशाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अंतरिम स्थगिती दिल्याने ग्रामपंचायत राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. न्यायमूर्ती प्रफुल्ल एस. खुबळकर यांनी दिलेल्या या आदेशामुळे ढेपे यांना तात्पुरता दिलासा मिळाला असून, प्रकरणाची पुढील सुनावणी २५ जून २०२६ रोजी होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अतिरिक्त आयुक्त, अमरावती विभाग यांनी २५ मे २०२६ रोजी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ मधील कलम १४ (१) (ज-



३) अंतर्गत ज्ञानेश्वर ढेपे यांना ग्रामपंचायत सदस्य व सरपंच पदासाठी अपात्र ठरविण्याचा आदेश दिला होता. या आदेशाविरोधात ढेपे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका दाखल करून न्याय मागितला.

याचिकाकर्त्यांच्या वतीने न्यायालयात असा युक्तिवाद करण्यात आला की, अपात्रतेचा निर्णय घेताना विस्तार अधिकाऱ्यांचे २४ ऑगस्ट २०२३ व १३ एप्रिल २०२६ चे अहवाल विचारात घेण्यात आले. मात्र, अंतिम सुनावणी पूर्ण झाल्यानंतर सादर करण्यात आलेल्या अहवालावर आपली बाजू मांडण्याची संधी याचिकाकर्त्यांना देण्यात आली नव्हती. त्यामुळे नैसर्गिक न्यायाच्या ☞ (पान २ वर)

# शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या समर्थनात संयुक्त किसान मोर्चा ची निदर्शने

**अमरावती/प्रतिनिधीः-** संयुक्त किसान मोर्चा अमरावतीच्या वतीने १७ जूनला विभागीय आयुक्त यांचे कार्यालयावर निदर्शने करण्यात आली. शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ चे पार्श्वभूमीवर शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी १५ जून पासून बुलढाणा येथे त्यांचे निवासस्थानी आमरण उपोषण आरंभले असून ,त्यांचे आमरण उपोषणाला आज तिसरा दिवस आहे . नैसर्गिक दृष्ट्या प्रकृती




खालावत आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने त्यांची उचित दखल घ्यावी. त्यांचेशी सन्मानाने चर्चा करावी. अशी मागणी मुख्यमंत्र्यांचे नावे दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

शेतकरी कर्जमाफी महाराष्ट्राला नवी नाही . त्याच्या तपशिलाचा केंद्रबिंदू शेतकरी हित आहे का? हा प्रमुख मुद्दा आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची नावे असलेली शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ ही शेतकऱ्यांच्या हिताची कमी व बँकांच्या हिताची जास्त आहे. जणू काही ही योजना, बँक कर्ज वसुली योजना ठरली आहे .दोन लाखाचे वरची रक्कम प्रथम बँकेत भरा नंतरच लाभ देऊ. अशी भूमिका सरकारने घेतली आहे. नियमित कर्ज भरणाऱ्यांना ही तेवढाच लाभ द्यावा. कर्जमुक्ती योजना २०१९☞ (पान २ वर)

# शिवसेनेच्या कार्यकर्त्यावर लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला, अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल

**उमरखेड/प्रतिनिधीः-** शहरातील हनुमान नगर येथील रहिवासी छत्रपती शिवाजी महाराज अश्वारुढ पुतळा कृति समितीचे उपाध्यक्ष आणि शिवसेना जेष्ठ कार्यकर्ते रमेश गुलाबसिंग चव्हाण (वय ६०) यांच्यावर तीन अज्ञात हल्लेखोरांनी चाकू व लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला केल्याची घटना मंगळवारी १६ जून रात्री च्या दरम्यान घडली. या प्रकरणी उमरखेड पोलीस ठाण्यात तीन अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा





दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, रमेश चव्हाण हे मंगळवारी रात्री आपल्या दुचाकीने घरी जात असताना काही अज्ञात युवक त्यांचा पाठलाग करत असल्याचा त्यांना संशय आला. आदर्श नगर रस्त्यात नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांच्या शासकीय निवासस्थानाजवळ पोहोचताच तीन युवकांनी त्यांच्या दुचाकीसमोर वाहन आडवे लावून त्यांना अडविले . यावेळी आरोपींनी शिवीगाळ करत चव्हाण यांच्या गळ्यावर चाकू लावला. त्यांनी प्रतिकार केल्यानंतर आरोपींनी ☞ (पान २ वर)

# चिरोडी येथील गोशाळा अधिकृत आहे का?

## -माजी सरपंच व ग्रामस्थ यांनी प्रशासनाला विचारला जाब

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** तालुक्यातील चिरोडी येथे मागील दोन वर्षा पासून गोशाळा सुरू असून याबाबत गोशाळा धारकांनी कुठल्याही प्रकारची ग्रामपंचायतची परवानगी घेतलेली नाही. गोशाळा धारकांनी मोठ्या प्रमाणात बांधकाम केले असून, त्या ठिकाणी कालवड व गाई आणल्या जातात.

पण ही गोशाळा खरंच अधिकृत आहे का? असा सवाल ग्रामपंचायत माजी सरपंच तथा प्रशासक अर्चना दारासिंग राठोड यांनी प्रशासनाला केला आहे. सदर ठिकाणी गोशाळा



असल्यामुळे त्या ठिकाणी पकडलेले जनावरे व गाय सुद्धा ठेवली जातात. परंतु रोज चराई साठी वन विभागाच्या जंगलात जातात. अनेकदा रात्री या ठिकाणावरून ४०७ ट्रक द्वारे जनावरे भरून बाहेर नेले जातात. गावातील नागरिकांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी अमरावती व पशुसंवर्धन विकास अधिकारी यांना याबाबत निवेदन दिले आहे.

इतक्या मोठ्या प्रमाणात बांधण्यात आलेली गोशाळा खरंच अधिकृत आहे का? असा संतप्त सवाल येथील नागरिकांनी व माजी ☞ (पान २ वर)

# शाळा सुरू होण्यापूर्वीच पाठ्यपुस्तके द्या


## भारती गाठे यांची मागणी


**अचलपूर/प्रतिनिधीः-** राज्य शासनाने यंदा शाळा सुरू होण्याची तारीख बदलून ३० जून निश्चित केली असली तरी जिल्ह्यासह राज्या तील अनेक भागांत पाठ्य पुस्तकांचा तुटवडा अद्याप कायम असल्याचे चित्र आहे. त्यामुळे शाळा सुरू होण्यापूर्वीच सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके उपलब्ध करून द्यावीत, अशी



मागणी पुढे येत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार अभ्यासक्रमात बदल करण्यात आल्याने नवीन पाठ्य पुस्तकांची निर्मिती करण्यात आली आहे. मात्र, ही पुस्तके अद्याप सर्व शाळांपर्यंत पोहोचलेली नसल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेषतः☞ (पान २ वर)

# चांदूर बाजारात वादळी पावसाचा धुमाकूळ





## -वीज पडून दोन गाईचा मृत्यू

**बेलोरा/प्रतिनिधीः-** चांदूरबाजार परिसरात दिनांक १७ जुन ला दुपारी सहा वाजेनंतर वादळी पाऊस व जोरदार वाऱ्याने परिसरामध्ये धुमाकूळ घातला. पावसासह जोरदार वाऱ्याचा तडाखा परिसरातील शेतकऱ्यांना बसला आहे. अनेक रस्त्यावर झाडे कोसळून पडल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाला. बेलोरा-चांदूरबाजार रस्त्यावर ठेकेदारांनी माती टाकल्यामुळे येणाऱ्या सर्व वाहतुकीस चिखलामुळे अडथळा निर्माण झाला आहे.

या वादळी पावसामुळे वीज पडून मिर्जापुर☞ (पान २ वर)

# शेतकरी संघटनेने केले मुख्यमंत्र्यांच्या पुतळ्याचे दहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाचा



वणवा आता चांगलाच भडकला आहे. ठीक ठिकाणी शेतकरी रस्त्यावर उतरून फसव्या कर्जमाफीचा जीआर जाळत आहेत. अशातच शहरात शेतकरी संघटनेने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मुख्यमंत्र्यांच्या पुतळ्याचे दहन केले. शेतकरी संघटनेने सरकार विरोधात एल्गार पुकारला आहे. रविकांत तुपकर यांच्या आंदोलनाला संघटनेने आपला पाठिंबा दिला ☞ (पान २ वर)

# कोणार्क कंपनी विरोधात सफाई कामगारांचे आंदोलन

## वेतन न मिळाल्याने प्रभाग १ मध्ये काम बंद



**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक एक मध्ये कार्यरत स्वच्छता कामगारांनी आज बुधवार १७ जून रोजी ४५ दिवस झाल्याने मानधन न मिळाल्यामुळे कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. कर्मचाऱ्यांनी अचानक काम बंद आंदोलन केल्यामुळे☞ (पान २ वर)

# खाजगी कोचिंग संस्थांकडून होणारी आर्थिक लूट थांबवा

## -प्रहारचे जिल्हाधिकारी यांना निवेदन



**अमरावती/प्रतिनिधीः-** आकाश एज्युकेशन सर्विसेस लिमिटेड या खाजगी कोचिंग संस्थेकडून फि च्या नावाखाली आर्थिक शोषण होत आहे. जबरदस्तीने कर्ज, भ्रामक जाहिराती व विद्यार्थ्यांची सुरक्षा भंग होत असल्याने या संपूर्ण प्रकाराची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी प्रहार जनशक्ती पार्टीच्या वतीने जिल्हाधिकारी यांना आज बुधवार १७ जून रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, २०२४ मधील पेपर लीक व गैर व्यवस्थेमुळे संपूर्ण देशातील विद्यार्थी व पालकांच्या शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास उडाला आहे. शहरातील☞ (पान २ वर)

# उपवर्गीकरणाविरोधात संयुक्त महामोर्चा

## -शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी





**अमरावती/प्रतिनिधीः-** अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाला विरोध आणि बहुजन समाजाच्या न्याय मागण्या मान्य करण्याकरिता कृती समितीच्या वतीने आज बुधवार १७ जून रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत महामोर्चा काढला. मोर्च्याच्या माध्यमातून जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून विविध मागण्या करण्यात आल्या आहे. उपवर्गीकरण संविधान विरोधी आहे.... उपवर्गीकरण रद्द करा रद्द करा... आम्ही एससीच्या ५९ जाती एक संघ आहोत अंतिम श्वासापर्यंत लढत राहू... सामाजिक न्याय विभागाचा पळवलेल्या निधी परत करा... यासह इतर फलके हातात घेऊन मोर्चामध्ये समाज बांधव सहभागी झाले. निवेदनात, उपवर्गीकरण प्रक्रिया☞ (पान २ वर)

# चांदूर बाजारात ५.३२ लाखांचा अवैध गुटखा जप्त

**चांदुरबाजार/प्रतिनिधीः-** ग्रामीण पोलिसांनी अवैध गुटखा विक्री आणि साठवणुकी विरोधात मोठी कार्यवाही करत ब्राह्मणवाडा थडी येथील एका घरावर धाड मारून प्रतिबंधित केलेला गुटखा, पान मसाला आणि सुगंधी तंबाखूचा मोठा साठा जप्त केला आहे. या कार्यवाही मध्ये एकूण ५ लाख ३२ हजार ४२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ५ आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यात सुरू असलेल्या विशेष



मोहीम अंतर्गत ब्राह्मणवाडा थडी पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारावर शारदापूर येथील मोहम्मद हाफिज सौदागर यांच्या घरावर धाड मारली. झडती दरम्यान घरात मोठ्या प्रमाणात शासनाने विक्रीस व साठवणुकीस बंदी घातलेला गुटखा, पान मसाला आणि विविध प्रकारची सुगंधी तंबाखू आढळून आली. पोलिसांनी तत्काळ हा साठा जप्त करत पंचनामा केला. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल मध्ये प्रीमियम पान मसाला, मास्टर ब्लेंडिंग पानमसाला, विमल पान मसाला, हॉट प्रीमियम पान मसाला, बाजीराव गोल्ड इम्पेरियल पान मसाला तसेच विविध सुगंधी तंबाखूचा समावेश आहे. प्राथमिक तपासात अवैध साठ्या प्रकरणी मोहम्मद मुतल्लीफ ☞ (पान २ वर)